म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



REFBK-0025176

# गिरिदुर्गाच्या पहाऱ्यातून

आनंद पाळंदे

आनंद
पाळंदे

REFBK-0025176

# गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून



दुर्ग
भैरवाच्या
पहाऱ्यात

पहाऱ्यातून



# प्रकाशकाचे मनोगत

'मुंबई ग्राहक पंचायत' हे नाव आता सर्वदूर परिचित झाले आहे. एस. टी. दरवाढ, वीज दरवाढ (इंधन समायोजन आकार), रेल्वे वाहतूक–विशेषत: उपनगरीय रेल्वे वाहतूक तोटयात नसून नफ्यात असल्याबद्दलचे संशोधन, घरगुती गॅसचा प्रश्न, मुंबईतील प्रदूषण असे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न पंचायतीने अभ्यासाकरिता घेतले आहेत व ते तडीस नेण्याचा प्रयत्न नेटाने चालू आहे. तसेच जीवनावश्यक वस्तु प्रत्येक महिन्याला बृहन्मुंबईतील ग्राहकांना देऊन त्यांचे शारीरिक आरोग्य नीट राहण्याकरिता पंचायत गेल्या दशकापेक्षाही अधिक काळ वितरणाचे कार्य करीत आहे. शारीरिक आरोग्याप्रमाणेच ग्राहकाच्या मानसिक आरोग्याची जोपासना व्हावी या दृष्टीने 'ग्रंथमित्र' वाजवी दर पुस्तक योजना या संस्थेने गेल्या वर्षीपासून हाती घेतली आहे.

मनावर संस्कार करणारे एक महत्त्वाचे साधन म्हणून ग्रंथवाचनाला व ग्रंथमैत्रीला मानवी जीवनात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दूरदर्शन, चित्रपट, रंगभूमि, आकाशवाणी इत्यादि साधने ग्रंथाची जागा घेतील असा भ्रम अनेकांना झाला होता. परंतु या साधनांचा विपुल प्रसार होऊन देखील ग्रंथाची निर्मिति, विक्री व वाचन यात सतत वाढच होत आहे कारण ग्रंथ आपल्याला असं काही देतात, की जे ही साधने देऊ शकत नाहीत. ग्रंथमैत्रीचे हे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ मराठी साहित्यिक गंगाधर गाडगीळांच्या मार्गदर्शनाखाली 'ग्रंथमित्र' योजना नेटाने वाटचाल करीत आहे ग्रंथाच्या मैत्रीचे महत्त्व वाचकांना पटवून द्यावे व प्रत्येकाला घरी स्वत:चा ग्रंथसंग्रह करता यावा, यासाठी पुस्तके स्वल्प किंमतीत उपलब्ध करून देणे हा 'ग्रंथमित्र' योजनेचा महत्त्वाचा भाग आहे. पुस्तके स्वत: विकत घेऊन व मित्रांनाही विकत घ्यायला सांगून 'ग्रंथमित्र' योजना सतत कार्यान्वित राहावी यासाठी आपला सक्रिय सहभाग द्यावा अशी विनंती.

घरातल्या छोटेखानी ग्रंथसंग्रहात अक्षर साहित्य, बालवाङ्मय, स्त्रियांचे सौन्दर्य व आरोग्यविषयक साहित्य, निरनिराळ्या व्यवसायाची माहिती, गृहोपयोगी वस्तूंची दुरुस्ती, विचारप्रवर्तक परंतु बांधिलकीमुक्त साहित्य यांचा समावेश तर अवश्य असलाच पाहिजे. अशा तऱ्हेने वाङ्मय यापुढे देण्याचा आमचा प्रयत्न राहील. त्याला अनुलक्षून नेमक्या कोणत्या विषयावरील ग्रंथ आपल्याला हवे आहेत याबद्दल स्पष्ट सूचना आम्हाला कळवाव्यात. बहुसंख्याक वाचकांचे मनोगत जाणून घेऊन व त्यांचा कल लक्षात घेऊन त्याप्रमाणे पुढील प्रकाशनासाठी त्यांचा उपयोग करून घ्यावा या उद्देशाने आपणाकडून सूचना मागवीत आहोत.

□ □

गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून

लेखक :

आनंद पाळंदे
२/३ एरंडवणे, कर्वे मार्ग, पुणे ४

'ग्रंथमित्र' प्रकाशन

© श्री. रमाकांत वासुदेव पाळंदे

मुखपृष्ठ व सजावट . शिरीष घाटे, पुणे

प्रकाशचित्रे व नकाशे आनंद पाळंदे

पहिली आवृत्ति १९८६

मूल्य रु. ३०

या पुस्तकाला श्री. गो. नी. दांडेकर यांनी पुरस्कार लिहिला आहे. याबद्दल लेखक व प्रकाशक त्यांचे आभारी आहेत

मुद्रक

मु. श. दाते
यशवंत मुद्रणालय
१८३५ सदाशिव पेठ, पुणे ३०

प्रकाशक .

प्रा. विजय आपटे, मानद संचालक
मुंबई ग्राहक पंचायत पुरस्कृत
ग्रंथमित्र प्रकाशन
४२, कोकण नगर
ले. प्रकाश कोटणीस मार्ग
माहीम, मुंबई ४०००१६

•• गंगोत्री हिमालयात 'सतोपंथ' हे
७०७५ मीटर उंचीचे अवघड शिखर
सर करण्यासाठी मोहिमेवर गेलेले
साहसी गिर्यारोहक
भरत मांधरे
मिनू मेहता
व
नंदू पागे
हिमकडा कोसळून मे १९८६ मध्ये मृत्युमुखी पडले.
••• त्यांच्या स्मृतीस अर्पण

संग्रहालय ठाणे
२९।११।८६

गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून

लेखक :

आनंद पाळंदे
२/३ एरंडवणे, कर्वे मार्ग, पुणे ४

'ग्रंथमित्र' प्रकाशन

© श्री. रमाकांत वासुदेव पाळंदे

मुखपृष्ठ व सजावट : शिरीष घाटे, पुणे

प्रकाशचित्रे व नकाशे आनंद पाळंदे

पहिली आवृत्ति १९८६

मूल्य रु. ३०

या पुस्तकाला श्री. गो. नी दांडेकर यांनी पुरस्कार लिहिला आहे. याबद्दल लेखक व प्रकाशक त्यांचे आभारी आहेत

मुद्रक

मु. श. दाते
यशवंत मुद्रणालय
१८३५ सदाशिव पेठ, पुणे ३०

प्रकाशक

प्रा. विजय आपटे, मानद संचालक
मुंबई ग्राहक पंचायत पुरस्कृत
ग्रंथमित्र प्रकाशन
४२, कोकण नगर
के. प्रकाश कोटणीस मार्ग
माहीम, मुंबई ४०००१६

गंगोत्री हिमालयात 'सतोपंथ' हे
७०७५ मीटर उंचीचे अवघड शिखर
सर करण्यासाठी मोहिमेवर गेलेले
साहसी गिर्यारोहक
भरत माधरे
मिनू मेहता
व
नंदु पागे
हिमकडा कोसळून मे १९८६ मध्ये मृत्युमुखी पडले.
... त्यांच्या स्मृतीस अर्पण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# पायथ्याशी

गिर्यारोहण या खेळाची महती आता अधिकाधिक पटू लागली आहे ही सुखावह गोष्ट आहे. १९८१ मध्ये माझे 'आव्हान' हे गिरिभ्रमणावरील पुस्तक प्रसिद्ध झाले, त्याला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता अशा पुस्तकाची गरज होतीच म्हणून या दुसऱ्या पुस्तकाचा प्रपंच.

योग्य पद्धतीने गिरिभ्रमण प्रारंभ करणारा डोंगरयात्री पुढे गिर्यारोहक बनण्याची शक्यता असते आणि गिर्यारोहणातील सर्वोच्च आनंद किंवा कामगिरी हिमशिखराच्या चढाईत आहे म्हणूनच सह्याद्रीप्रमाणे हिमालयातील चढायांचाही अनुभव या पुस्तकात नोंदला आहे. सह्याद्रीतील सराव हिमालयातील चढाईत निश्चितच उपयोगी पडतो. खरे म्हणजे कोणत्याही ऋतूत पण शक्यतो पावसाळा किंवा पावसाळ्यानंतर लगेच गिरिभ्रमणाला सुरुवात करावी हे चांगले. या ऋतूमध्ये उन्हाचा त्रास कमी होतो. हिरवागार निसर्ग, खळाळते पाणी यांमुळे सर्वत्र चैतन्य असते अशा वेळी लागलेली डोंगराची ओढ पुढे कायम राहते.

संघातील सदस्य चारपेक्षा कमी नसावेत पण सहादेखील जास्त होतात. गिरिभ्रमण प्रवेश एक दिवसाच्या छोट्या छोट्या यात्रांमधून करावा. आपल्या गावाजवळच्या टेकड्या किंवा पायवाटांनी जाता येतील, अशी पर्यटन स्थळेही निवडण्यास हरकत नाही. या यात्रांमध्ये सामग्रीची जमवाजमव करणे, चालण्याचा योग्य वेग-ताल याची समज वाढविणे, चुलीवर चहा-नाश्ता बनविणे या गोष्टींना सराव करावा. यानंतर ५०/६० कि.मी अंतरातील डोंगरचढाईकडे वळावे. सुदैवाने माथ्यावर पाणी असणारे गिरिदुर्ग यासाठी उपलब्ध आहेत. या डोंगरचढायांतून अडचणीतून मार्ग शोधणे, आभाळाखाली उघड्यावर मुक्काम करणे, चढाईसाठी पाठीचा कणा व पाय यांची तयारी करणे या बाबींचा सराव होईल.

याचवेळी योग्य मार्गदर्शनाखाली कातळारोहणातील थरार आणि दोरतंत्र शिकणे चांगले. स्थानिक संस्थांची शिबिरे यासाठी उपयुक्त ठरतील कातळारोहणातील थरार हा अनुभवानेच कळतो आणि आवाक्याबाहेर धाडस केले तर यात प्राणाशी गाठ आहे हे निश्चित अर्थात् हळुहळू आपला आवाका वाढविणे हाच यावर उपाय

उत्तरकाशी, दार्जिलिंग, मनाली येथील संस्था गिर्यारोहणाचे प्राथमिक आणि प्रगत शिक्षण देतात. तेथे शिक्षण घ्यावे किंवा एखाद्या ज्येष्ठ सहकाऱ्याचे बोट धरून हिमालयात जावे पर्यटन व्यवसायासारख्या आयोजित आयत्या डोंगरयात्रांमध्ये गिर्यारोहणातील खरा थरार नाही. त्याऐवजी चार जणांनी एकत्र येऊन पुरेसा सराव करून अनुभव वाढवीत हिमालयातील अती उंचीची यात्रा करण्यात जास्त गमत आहे मात्र गिर्यारोहण पारगत होणे हे फार कष्टाचे आणि अखंड, सतत कित्येक वर्षांच्या अनुभवाचे काम आहे हे लक्षात ठेवणे बरे.

मीही अजून त्यात पायथ्याच धापतोय. शिखर अजून कितीतरी दूर आहे.

पुणे, जुलै १९८६ — आनंद पाळंदे

# पुरस्कार

डोंगर भटकायचे हे वेड कुणाला लागू नये. एकदा ते लागले की मग माणसाचे खरे उरत नाही. ऋतु, काळ, दिवस, रात्र, अवस, पुनव यापैकी कशाचाच विचार न करता तो डोंगर भटकू लागतो. सारखे डोंगर त्याला सादावीत असतात. आणि ते निमंत्रण मिळताक्षणी तो हाती सहज लागेल ते साधन वापरून डोंगर भटकायला निघतो. मग डोंगरापलीकडे दुसरे त्याला काही रुचेनासे होते. रात्रंदिवस तो विचारही डोंगरांचाच करतो. असे त्यांचे तन आणि मन डोंगराचेच होऊन जाते. त्याचे अंतरंग तर डोंगरमय होतेच. पण भाषाही डोंगरीच बनून जाते. सर्व प्रकारचे व्याकरणाचे नियम ती धुडकावून लावते. डोंगराचे आपले एक व्याकरण असते. ते त्याच्या अंगी मुरते. मग तो त्या भाषेत बोलू आणि लिहू लागतो. असे त्याचे जगावेगळे होऊन जाते.

मित्र आनंद पाळंदे हे कधीकाळी असे डोंगरांचे होऊन गेले. आता जन्मभर त्यांची त्यापासून सुटका नाही. भर पावसात ते कामशेत स्टेशनावर उतरून पाऊस अनुभवू लागतात. ते डोंगरधार गाठतात आणि एका अंगाने पाऊस उगवतो. त्याची एक लाट वर येते, आणि वेगाने डोंगर ओलांडून विरून जाते. अशा चळकावर चळका कोसळत राहतात. पण त्यांना न जुमानता पाळंदे डोंगर पार करीत असतात. डोंगरचे कातळकडे शेवाळलेले असतात. ते त्यांना रम्य दिसतात. मधेच ते निसरडे रान त्यांना भुईसपाट करते. पण ते पुन्हा उठून पावसाने सटकलेले अंग निरखीत निर्मळ झालेल्या वातावरणात वेडसे लेण्याची वाट चढू लागतात. भालेवाडीच्या खिडीत पाऊस पुन्हा पदर पसरतो. ही भेट डोंगरी व्याकरणाने सजलेली भाषा नागरांना ही साधायची नाही. कधी पाऊस रिमझिमतो, कधी तो झंझावातासारखा येतो. अशी पाठशिवणी सुरू असते.

पाळंदेंच्या वळखीचा आहे काळाभोर करवंदातला अमृतरस. तो चाखीत ते जंजिरे कुलाबा गाठतात. भरती-ओहोटीचे गणित ते माहीत करून घेतात आणि महाराष्ट्राच्या कान्होजी आंग्रे या दर्यासारंगाच्या समाधीचे दर्शन घेतात. तिथून ते थेट कनकेश्वर गाठतात. इथून मुंबई बंदरातल्या नौका ते न्याहाळतात.

त्यांच्या या भ्रमंतीतून तेराव्या शतकातील कोळे नरसिंहपूरचे नृसिंह मंदिरही सुटत नाही. या एकमेवाद्वितीय मंदिराचे शब्दचित्र ते रेखाटतात. त्याच सपाट्यात ते कर्नाळा गाठतात. त्याचा बुधला ते चढून जातात आणि माहितगाराला पटतील, अशा वरचा टेंबा चढायच्या खुणा सांगतात. मात्र तिथल्या अभयारण्यातील पक्ष्यांची इमजी भाषेतील नावेही ते नोंदतात. पुण्यागेजारचा

उपेक्षित मल्हारगडही ते पाहून येतात, आणि त्याचे अतिशय देखणे वर्णन करून जातात वाठारचे निंबाळकरांचे गढीवजा नक्षी वाडेही त्यांच्या दृष्टीतून सुटत नाहीत मराठा वास्तुकलेच्या या नामशेष होत चाललेल्या उत्तम नमुन्यांचे वर्णन ते करून जातात कधी त्यांच्या मनी येते की कात्रजच्या बोगद्यावरून डोंगर-रांगेने सिंहगड गाठावा कधी ते धनगरवाड्यावरचे ताक रिचवीत भीमा ते इंद्रायणी ही पायपीट करून, मग ती ते शब्दबद्ध करून ठेवतात भीमाशंकराचे सुंदर मंदिर त्यांची नजर खिळवून ठेवते तिथून वानरखिडीतून काट्यांशी झटापट करीत ते माजरसुंभा ओलांडून राजमाचीचा उजव्या हातास टाकून लोणावळे गाठतात. महाबळेश्वरचा परिसर हे तर त्याचे मर्मस्थान आहे. दात थडथड वाजवीत ते टायगर पाथ पकडतात रडतोंडीच्या घाटाने पारावरून ते प्रतापगडाची युद्धस्थली गाठतात आणि पुन्हा निसणीच्या वाटेने दिव्य करीत ते महाबळेश्वर गाठतात मढीमहालाचे दृश्य पाहून पाळंद्यांचीही दृष्टि स्थिर होत नाही 'कित्येक जावाक?' या प्रश्नाचे उत्तर ते 'गोरक्षसिद्धगडाक्' असे देतात. वरच्या गवतात मुक्काम केला हे ऐकताच वाडीकरांची बोटे तोंडात जातात, ती याच प्रवासात. वरंध-घाटास पायउतार होऊन ते मंगळगड आणि चंद्रगडास पोचतात

अशा या अनगड वाटा तुडवीत असता ते तिथली तिथली मानचित्रेही काढतात आणि ती मुद्दाम त्या त्या ठिकाणी देतात. रेलमार्ग, मोटारमार्ग, पायवाटा, किल्ले, मोठाली गावे ···सगळे सगळे

पाळंद्याचा विशेष असा की ही डोंगरभाषा त्यांना अगदी वश झाली आहे. त्याच्यासवे ती डोंगरकडे पार करते निसणीच्या वाटा चढते-उतरते पाठीवरची ओझी ती सहज वाहाते कधी ती निसर्गाला आनंदाची पावती देऊन टाकते. असे या डोंगरभटकंतीत ज्या ज्याशी म्हणून मैत्र व्हावे, त्या त्याशी पाळंद्यांचे घनिष्ठ मित्र निपजले आहे. या मैत्रापोटी द्यावे लागणारे मोलही त्यांनी पुरेपूर दिले आहे.

किती किल्ले या माणसाला माहीत आहेत ! याने ते राने तुडवीत पाहिले आहेत ! रायगडावर पुण्यापासून जायच्या चारी साही वाटा हा मनुष्य असंख्य वेळा तुडवून गेला आहे मधली सगळी मुक्कामे, धनगराचे वाडे याला ठावकी आहेत वाटेतले धमारे, घाट, डोंगरधारी, याला परिचित आहेत हरिश्चंद्रगड हा गड नव्हेच मुळी. तो एक पर्वतच आहे ज्याच्या भवतालून नद्या निघतात, आणि ज्यावर शिखरे आहेत, त्याला पर्वत म्हणायचे हरिश्चंद्र, तारामती आणि रोहिदास अशी तीन शिखरे असलेला आणि मंगळगंगा व मुळा अशा दोन नद्या शेजारून वाहणारा हा हरिश्चंद्रपर्वत आहे. त्यावर अर्थातच हा माणूस चार-दोनदा गेला आहे. त्या भवतालचे अजोबा डोंगर, मुडा, घनचक्कर, भैरवगड, कळसूबाई, अलंग, कुलंग मदनगड हे सगळे डोंगर हा माणूस भटकला आहे. एक

आमचे कराडचे देसाई वगळता या डोंगरवेड्या माणसाइतके डोंगर कुणी पाहिले असतील असे मला वाटत नाही. मात्र कोंबड किल्ल्यावरची आरपार गुहा पाळंद्याची पाहायची राहून गेली. कळसूबाईवर पाळंद्यांचे प्रेम रतनगड या माणसाला पाठ.

हडबीची शेंडी आणि लिंगाण्याचे शिखर ही दोन महाराष्ट्रातील आज-पर्यंत अजय शिखरे मानली जात असत. पैकी लिंगाण्यावर कसे चढायचे, धोके किती, किती ठिकाणी दोराचा आश्रय घ्यावा लागतो, वाटेत घळी किती, वर गेले की काय काय दिसते हे सर्व पाळंद्यानी आधी केले मग सांगितले नुसते सांगितले नाही तर त्याचा एक तपशीलवार नकाशाच काढून पुस्तकात दिला आहे. मी जर पेशवा असतो, तर या माणसाच्या पायात सोन्याचा तोडाच अडकवला असता !

त्याशिवाय हिमालय हिंडायचे वेडही या पुरुषाला लागले आहे एकट्याला नव्हे, तर पाळंदे, नाटेकर आणि देव अशी तीन कुटुंबे पहलगावला तंबू ठोकून राहिली. "ज्याला हिमालयाचे वेड लागले त्याचे काही खरे नाही या पाळंद्याचेही काही खरे नाही !"


दरवर्षी हजारो कथासंग्रह आणि कादंबऱ्या प्रसिद्ध होत असतात. त्याच्या त्या टिपरघाईत डोंगरकड्याचे व्यसन लागलेल्या मनाला तोषवितील अशी केवळ पाच दहा पुस्तकेच काय ती प्रकाशित होत असतात पाळंद्याकडून आम्ही वाट पहात आहोत ती त्यांनी केलेल्या नवनव्या साहसांची आणि त्याहून अधिक 'गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून' सारख्या वेधक शब्दचित्रांची. ती आमची इच्छा त्यांनी दरवर्षी एक तरी पुस्तक लिहून पुरवावी, अशी इच्छा व्यक्त करतो.

त्याबरोबरच मुंबई ग्राहक पंचायत पुरस्कृत 'ग्रंथमित्र' प्रकाशनाला हे असे वहिवाटीवेगळे पुस्तक प्रकाशित करण्याबद्दलही धन्यवाद देतो

(signature)

# वाटचाल


| प्रकरण | पृष्ठ |
| --- | --- |
| १) पाऊसपाण्याचे भ्रमण | १– ४ |
| २) मलिनागच्या परिसरात | ५– ७ |
| ३) कृष्णाकाठचे नृसिंहस्थान | ८– ९ |
| ४) पक्ष्याचा डोंगर-कर्नाळा | १०– १३ |
| ५) कऱ्हेपठारावरील मल्हारगड | १४– १८ |
| ६) वाठार निंबाळकर – नऊ वाड्यांचे ! | १९– २२ |
| ७) सतोषाच्या वाटेवर | २३– २७ |
| ८) कात्रजहून सिंहगड | २८– ३२ |
| ९) भीमा ते इंद्रायणी | ३३– ४० |
| १०) गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून | ४१– ४९ |
| ११) सिद्धगडचा प्रवास | ५०– ५६ |
| १२) मगळ-चद्राच्या प्रदेशात | ५७– ६६ |
| १३) कुकडी खोऱ्यात नाणेघाटात | ६७– ७३ |
| १४) रायगड डोंगरयात्रा | ७४– ७७ |
| १५) हरिश्चंद्रगडच्या परिसरात | ७८– ८३ |
| १६) तळकोकणातील डोंगरयात्रा | ८४– ९० |
| १७) निवडुंगाचे डोंगर | ९१– ९५ |
| १८) सात पहाडांच्या सावलीत | ९६–१०५ |
| १९) सुळका लिंगाण्याचा – एक सभान साहस | १०६–११५ |
| २०) निळे पाणी - हिरवी जमीन | ११६–१२३ |
| २१) लिदार घाटी | १२४–१३० |
| २२) हिमधारेच्या माथ्यावर | १३१–१३७ |
| २३) रुदुगैरा | १३८–१४४ |



भग्न अवशेष 'निंबाळकराचे वाठार'



चावडगडावरील तोरण

# गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून




आदिवासींचा भैरोबा भैरवगड, ठाणे

[library stamp]

# १. पाऊसपाख्यांचे भ्रमण

कामशेत रेल्वे स्टेशन – श्रावणातल्या पहिल्या दिनी कसे झळाळून गेले होते! पहाट उबरठ्यावर उभी होती. स्थानकाची छपरे शेवाळली, हिरवळली होती. रूळमार्गाला ढुशा देत इंद्रायणी तुडुंब भरून वाहत होती. दुसऱ्या बाजूला पुणे–मुंबई राजमार्ग झपाट्याने धावत होता. त्याची किंचित् विश्रांत वेळ पकडून आम्ही तो ओलांडला व गावापाठचे टेकाड चढलो. अवघ्या धरणीवर हिरवे आच्छादन पसरले होते. इंद्रायणी खोरे उजळले तरी डोंगर-माथे मात्र धुक्यातच मुडपून बसले होते. त्यामुळे ओळखीचे स्मित कोणाकडे करणार?




एक खिंड ओलांडून पलीकडल्या दांडाला लागलो. जुन्या मैत्रीला वाट दाद देत नव्हती. पायाखालून सारखी निसटायला बघत होती.

मुंबई मार्गावरील टायरची रपरप आणि रुळावरचा खडखडाट आमच्या कानापलीकडे केव्हाच गेला. कारण निसर्गीय नादसृष्टि आमच्या नजीकच उद्भवली. पावसाची भुरभूर, वाऱ्याची सूं सूं अन् पाखराच्या शिळा यांच्या मिश्रणातून ती उद्गारली.

डोंगरधार गाठली तेव्हा एका अंगाने पाऊस उगवू लागला. एक लाट वर आली आणि वेगाने डोंगर ओलांडून विरून गेली. त्यापाठोपाठ

लाटाच लाटा होत्या दुसऱ्या अंगाला त्या विरघळून जात. पावसाचा जोर वाढला, पण आम्ही त्याच्या काठावरून चालत होतो केवळ धक्का देण्यापलीकडे पाऊस वेग धरीत नव्हता.

पाऊस विरला तेव्हा समोर कुडवा डोंगर लख्ख दिसत होता त्याच्या उजवीकडे भातराशीचे त्रिकोणी शिखरही उघडले. आम्ही सहज मागे वळलो आणि डोळ्याच्या पाखरानी एका अभूतपूर्व दृश्याचा वेध घेतला। स्तिमित होणे, नजर खिळणे हे शब्दभांडार फारच कमी पडते इंद्रायणी अनेक वळसे, वेलांट्या, उकार घेत नागिणीसारखी पुढे सरकत होती पावसाळ्यात मेघाची आणि सूर्याची नेहमीच झटापट चाललेली असते. त्या क्षणी मात्र मेघपटलावर मात करून तो तेजोनिधि खाली डोकावला होता. कोटिसूर्याचे तेज त्या इंद्रायणीच्या पात्रात केन्द्रित झाले होते

" नव्हे तो विजेचा लोळ
तो तर तेजाचा कल्लोळ
नसे ते चमचमणे, नसे ते उजळणे
ते तर रविराजाचे कोसळणे
चैतन्याचा स्रोत तो मी अवलोकिला
जो क्षणभरच जलौघाला बिलगून गेला."

दिलीपच्या काव्यपक्ती ओठातून बाहेर येताहेत तोवर तो लोळ अतर्धान पावला. महाभारतातील सूर्यपुत्र कर्णाची जन्मकथा व्यासांना कदाचित् अशाच अनुभवातून स्फुरली की काय न कळे!

कुडव्याच्या डोंगरकडेलाच वाघदेव खिंड आहे. छोटेसे देऊळ आणि पाण्याचे टाके खिंडीत आहे. डोहाकडचे कातळकडे शेवाळल्याने रम्य दिसत होते. त्यातील खाचातून कित्येक जांभळ्या, पिवळ्या, पांढऱ्या गौरया (ग्लोरी लिली) उगवल्या होत्या. देवळापासून एक वाट माथ्याकडे भातराशीकडे जाते. दुसरी खिंडीतून पलीकडे उतरते. आम्ही मध्यमवर्गीय बनलो. अर्ध्या तासात बेडसे गाव तळात अन् उजवीकडे कड्याच्या पोटात लेणी दिसू लागली. लेण्याना एका जलौघाचे अर्घ्य मिळत होते गावाकडची वाट सोडून झुडुपात लपलेली वाट शोधीत लेण्याकडे निघालो.

तोंच खालच्या माळावरून 'वाट नाहीय्येऽ' असा केवढा तरी गलका झाला. वाट व्यवस्थित नव्हतीच, पण तेवढ्यासाठी जलौघाच्या उडी-वरून खालच्या गदारोळाकडे आमचे लक्ष वळले तर आम्ही माणसे कसली! प्रपाताला मध्येच एक पायरी होती. ती ओलांडली की लगेचच लेणे समोर होते. त्यामुळे तळातील गुराख्याकडे आम्ही विजयी स्मित केले खरे, पण तोपर्यंत पायाच्या तळव्यानी निसरड्या भूमीशी संगन-मत करून आम्हांला लोटांगण घडविले

महाराष्ट्रातील उत्तमातील उत्तम लेण्यात बेडस्याचा समावेश होतो. इसवी शभरमध्ये हे लेणे खोदण्यात आले. चैत्यगृह आणि प्रवेश-द्वारापाशीचे स्तभ यांची घडण अत्यत सुबक आहे

लेण्यात विसावतोय तोवर इतका वेळ विसावलेले मेघ नव्या दमाने कोसळू लागले पवना खोरे त्या धारानी भरून गेले. पावसातच लेण्याबाहेर पडलो. बाहेच स्तूपाशेजारीच छोटुल्या पायऱ्या होत्या. लेण्यांच्या माथ्यावर पोचलो तेव्हा वाघदेव खिंडीकडची वाट भेटली. तोपर्यंत पावसाने अंग झटकले वातावरण निर्मळ झाले आणि पवना तलाव डोळ्यात भरला त्यामागे तिकोनातुग दुर्ग निळाईत भिजले होते मळलेली वाट ही एक अजब चीज आहे. धुक्यापावसाने काही दिसेनासे झाले तरी पायाना ती जाणवत राहते त्यामुळेच भातराशीच्या दक्षिण उतारावरील झाडीतून आम्ही सहजच बाहेर पडू शकलो.

वचाक वचाक चिखलातून माळेवाडी गाठली. हंटर बुटांनी चिखलात मनसोक्त लोळून घेतले होते पण माळेवाडीच्या खिंडीत पावसाने पुन्हा पदर पसरला धो धो वर्षावात बुट पुन्हा लकाकले

विसापूरगड समोर असूनही दिसत नव्हता याच्या दोन्ही अंगांनी नागमोडीत जाता येते आम्ही उत्तरेकडची वाट पत्करली

विशाल ओहोळ सामोरा आला गडाचे दोन बाहू त्या ओहोळाला मिळण्यासाठी पुढे आले होते. माथ्यापाशी धुके टकरा देत होते आणि असख्य जलप्रपात ते धुके फोडीत कोसळत होते.

ओहोळाच्या माथ्यापर्यंत तटाचे दगडधोंडे पडले होते त्यावरुन पाण्याचा अखंड प्रवाह वाहत होता निम्म्यात पोचतोय तोवर झंझा-वातासारखा पाऊस आला. नखशिखांत भिजलो तरी कड्यावरून

कोसळणारे पाणी स्नान घडवीत होते माथ्याअलीकडे गुहेत घुसलो. गुहेत ओल होतीच, चुलीवरचा चहा गरम झाला तरी आम्ही गारठतच होतो. गुहेबाहेरच्या हनुमंताला मात्र त्याचे काहीच वाटत नव्हते. तो पावसात सतत उभा होता पाण्याच्या टाकीवरील ब्राह्मी शिलालेख पावसाच्या माऱ्याने झिजत होता.

बाहेर पडलो तेव्हा अंगात ओल मुरली होती. त्यावर वाऱ्यात मिसळलेल्या पाण्याचा मारा म्हणजे जखमेवर मीठच त्यामुळे धावतच माथ्याकडे गेलो पण माथा होताच कुठे ? दाट धुक्यात तो केव्हाच गडप झाला होता.

विसापूरचा विस्तार खूपच मोठा. त्यामुळे पाय नेतील तिकडे जाण्याची शक्यता धुक्यासारखीच दाट होती. पण पलीकडे वाहणाऱ्या ओढ्याने निमंत्रित केले आणि ते स्वीकारून निघालो गडाबाहेर पडायची वाटच मिळाली. अर्थात् ओढ्याने फसवून कड्यावरून उड्डाण केले होते. आम्ही त्याच्या कडेने उतरलो ते पवना खोऱ्याकडे

खिंडीपलीकडे लोहगड आणि पाऊस एकदमच उघडले. एरवी राखाडी तपकिरी झाकेत असणारा गड आता हिरवा जांभळा दिसत होता. त्यावरचे काळे पत्थर पाण्याने चमकत होते. मधूनच एखाद्या धवल प्रपाताने त्यावर रांगोळी रेखली होती.

पाऊस उघडला ही कल्पनाच ठरली. आम्ही लोह–विसा खिंडीत पोचलो तेव्हा तो लोहमाथ्यावर धडकला होता. गडाला सुंदर राजमार्ग आहे. पायथ्याला लोहवाडी. या गडासारखा पाच द्वारांनी सरक्षित गड दुसरा नाही. नाना फडणिसांनी करवून घेतलेले हे बांधकाम दुर्गांत अजोड आहे.

माथ्यावर प्रवेश धुके बाजूला सारावे तेव्हाच मिळत होता. बाटलीत कोंडलेला राक्षस बाहेर पडावा तसे ते धुके पाऊस मात्र पूर्ण थांबला होता तेवढ्यात मेघराजाचा सहकारी वरुण, मेघाची स्वारी येते आहे अशी फंदफितुरी करून गेला आणि मळवली गाठेतो. मेघाने तो राग आमच्यावर काढलाच. मात्र त्याचा उपयोग फारसा नव्हता. रूळमार्गांनी पुण्याची दिशा दाखविली होतीच.

□ □

# २. अलिबागच्या परिसरात

कोकण म्हणजे सह्याद्रि आणि सिंधुसागर याचा वरदहस्त लाभलेली अद्‌भुत भूमि. येथे वरून दिसणाऱ्या काटेरी दाट झाडीत, काळ्याभोर करवदातून भरला आहे अमृतरस ! येथल्यावरून ओबड-धोबड असणाऱ्या काळ्याकुट्ट दगडगोट्यांच्या प्रदेशात निपजतात टिळक-आगरकरासारखी नररत्ने ! उसळत्या लाटांचा महासागर आणि उत्तुंग सह्यकडे याचे अखंड द्वंद्वयुद्ध चाललेल्या या प्रदेशात जन्मतात बेदरकार शत्रूशी बेडरपणाने झुंज घेणारे बाळाजी विश्वनाथ अन् वासुदेव बळवत ! पोर्तुगीज व इंग्रज यांच्यावर दरारा गाजविणारे आणि कोकणपट्टी व सागरकिनारा यावर सत्ता गाजविणारे सरखेल कान्होजी आग्रे हेही येथेच जन्मले.

## आंग्र्यांचे अलिबाग

मराठ्यांचे सरखेल कान्होजी आग्रे यानी जेथून आपली सत्ता गाजविली ते स्थान म्हणजे रायगड (कुलाबा) जिल्ह्यातील अलिबाग होय मुंबई—गोवे महामार्गावर पेणजवळील वडखळ नाका येथे अलि-बागला जोडणारा राज्यमार्ग फुटतो

धरमतरची खाडी ओलाडून वळणदार नागमोडी रस्ता व गर्द झाडी यानी नटलेल्या 'कार्ले खिंडी' खिंडीतून सिंधुसागराला खेटूनच असलेल्या अलिबागला जातो नारळी-पोफळींनी नटलेल्या व सागराचा धीरगंभीर नाद सतत कानावर पडणाऱ्या अलिबागेत एक अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे श्रीबाग. श्रीबागेत कान्होजी आग्रे यांची समाधि आहे. शेजारीच त्यांच्या पत्नीचीही समाधि आहे.

अलिबागच्या नैर्ऋत्येला किलोमीटर अतरावर किनाऱ्यापासून आत जंजिरे-कुलाबा उभा आहे भरतीच्या वेळी चहूबाजूनी पाणी असते परंतु ओहोटीच्या वेळी मात्र पाणी जलदुर्गाच्या मागे जाते व किल्ल्यात

पायी जाता येते. भरतीची वा ओहोटीची वेळ तिथीवर अवलंबून असते. तिथीला पाऊणने गुणल्यास जी संख्या येईल ती वेळ पूर्ण भरतीची असते. उदाहरणार्थ, चतुर्थीला पहाटे तीनला पूर्ण भरती असते तर त्यानंतर ओहोटी सुरू होते तीन तासानी म्हणजे सहा वाजता सर्व पाणी निघून जाते व नंतरचे तीन तास पाणी येणार नाही. म्हणजे चतुर्थीला सकाळी सहा ते नऊच्या दरम्यान किल्ला पाहता येतो

या किल्ल्याला दोन दरवाजे आहेत. एक महाद्वार व दुसरा यशवंत दरवाजा. ईशान्येला असलेले महाद्वार भव्य व आकर्षक असून सागवानी आहे आतल्या अंगाला आणखी एक दार असून त्याखाली तळघर आहे पश्चिमेला यशवंत दरवाजा आहे. महाद्वार सोडताच देवीचे देऊळ लागते. देवीची मुद्रा शांत आणि आकर्षक आहे किल्ल्यात गणपतीचे सुबक मंदिर आहे येथे एकटा गणेश नसून गणेशपंचायतन आहे जवळच एक गोड्या पाण्याचा तलाव आहे. बुरुजावरून फेरी मारताना खांदेरी उंदेरीचे किल्ले व रेवदंड्याजवळील 'कोरलई किल्ला' दिसतो

## कनकेश्वर

महाराष्ट्रात जी काही विशेष प्रसिद्ध शिवमंदिरे आहेत त्यात कनकेश्वर मोडते. कनकेश्वराचे स्थान स्वयंभू आहे. नितांत रमणीय व निसर्गाचे लेणे ल्यालेले, असे हे कनकेश्वराचे स्थान आहे. अलिबागच्या ईशान्येला सागरानजीक एक उंचच्या उंच डोंगर दिसतो. तोच कनकेश्वराचा डोंगर. याची उंची ३८४ मीटर आहे पायथा गाठावयाचा म्हणजे अलिबाग रेवस रस्त्याने कनकेश्वर फाट्यावर उतरून सुमारे ३ कि मी चालावे लागते पायथ्याच्या मापगावपर्यंत गाडीमार्गही आहे टेकडी चढण्यास पायऱ्या आहेत या पायऱ्या १७७४ मध्ये राघोजी आंग्र्याच्या दिवाणानी बांधल्या पायथ्याशी कान्होजी आंग्र्याचे सहवासातील नारोपंत प्रधान यांची समाधि आहे.

काही अंतर चढल्यावर पायऱ्यांच्या उजव्या बाजूस नागोबाचा टप्पा आहे आणखी थोडे उंच गेले की गायमंडीचा टप्पा लागतो. एका खडकाच्या खळग्यामध्ये गायीचे पाऊल असून भोवती पाच लिंगे

आहेत हा खळगा नेहमी सूक्ष्म झऱ्याच्या वाहत्या पाण्याने भरलेला असतो नतर दाट झाडीतून जाताना पालेश्वराचे मंदिर लागते. येथे देवाला फक्त पालाच वाहतात येथून चारशे पावलावर उजव्या बाजूच्या कमानीतून आत गेल्यावर रामतीर्थ लागते. आणखी काही अतर चढताच शिवतीर्थ तळे दृष्टीला पडते ही पुष्करिणी अष्टकोनी असून बाहेरील भितीत आठ दरवाजाच्या खुणा दिसतात. याच्या पश्चिमेस कनकेश्वराचे भव्य व आकर्षक मदिर उभे आहे

हेमाडपंती बाधणीचे हे मदिर म्हणजे अप्रतिम कलाकौशल्याचा नमुना होय याला चादणीप्रमाणे टोके असलेला आकार आहे प्रत्येक कोपऱ्याच्या वरती वानराची आकृति असून कोनाडयात योगीची मूर्ति आहे. उत्तर बाजूला असलेल्या सिहमुखातून खालील कुंडात पाणी पडते, सर्व बाजूनी देवादिकांच्या मूर्ति आढळतात दक्षिण बाजूला सर्वांत वरच्या कोनाडयात भैरव, त्याखाली डावीकडील कोनाडयात ब्रह्मा व सावित्री आणि उजवीकडील कोनाडयात गायत्री सर्वांत खाली दोन हत्ती आढळतात याप्रमाणेच पूर्व बाजूला भैरव, शिव, सावित्री व खाली दोन हत्ती आहेत. उत्तर बाजूस भैरव, विष्णु, सरस्वती व खाली दोन हत्ती अशी रचना आहे मुख्य गाभाऱ्यात सुबक पिंडी आहे. सभामडप नवीन असून दाराशी दोन सिह व दोन द्वारपाल आढळतात. मंदिराच्या नैर्ऋत्येला भीमकुड आहे व उत्तरेला विष्णुतीर्थ आहे. तसेच मुख्य मदिराच्या वायव्येला रामेश्वराचे पुरातन देवालय आहे. टेकडीच्या माथ्यावर गेल्यावर मुबई बदरातील नौका दिसतात. कर्नाळा, माणिकगड, सागरगड आणि जलदुर्गही दिसतात दाट वनश्री आणि थड हवा याची मोहिनी इथून हलू देत नाही.

□ □

# ३. कृष्णाकाठचे नृसिंह स्थान

महालक्ष्मी कोल्हापुरासी । दक्षिण काशी करवीरसन्निध असे वरधा।
कोल्हग्रामी नृसिंहदेव । परमात्मा सदाशिव। तोचि असे प्रत्यक्ष ॥

श्रीनृसिंहसरस्वती स्वामींनी उल्लेखिलेल्या वरील तीर्थवर्णनात जो नृसिंहदेव उद्गारला आहे तो म्हणजे कृष्णाकाठच्या कोळे-नरसिंह-पूर गावचा हे स्थान आहे सांगली जिल्ह्यात वाळवे तालुक्यात. कऱ्हाड-रेठरे अथवा इस्लामपूर-नऱ्हे मार्गे इथे पोचता येते. दक्षिणमध्य रेल्वेचे भवानीनगर स्थानक इथून जवळच आहे

गाव अगदी छोटेसे पण कृष्णातीर मात्र लोभस लाभलेला आहे. कृष्णेच्या येथील अथांग डोहाच्या किनारीच नरसिंहाचे पुरातन देवालय आहे. सुमारे १३ व्या शतकातील हे देवालय आहे असे सांगतात.

## एकमेवाद्वितीय बांधणी

पश्चिम दारातून कृष्णेचे लपेटदार पात्र चित्त वेधते. मात्र तिच्या रौद्र स्वरूपापासून देवळाचे सरक्षण व्हावे यासाठी पाच बुरुजी तट बांधला आहे, तर आणखी वरच्या अंगाला जलौघाचा जोर ओसरण्यासाठी एक मोकळा बुरुज व घाट बांधला आहे. सर्वसाधारणपणे गाभारा व सभा-मंडप हे समोरासमोर असतात मात्र इथे गाभारा हा मंडपाच्या खाली भूमीत आहे. ही बांधणी एकमेवाद्वितीयच आहे. गाभाऱ्यात प्रवेश करण्यासाठी पश्चिम दाराजवळ मार्ग आहे याच्या पहिल्या पायरीवरच एक प्राचीन लेख आहे त्यात तीन पिढ्यातील लोकाची नावे आहेत.

पहिले तळघर अंबाबाईचे चार स्तंभावर उभारलेल्या ह्या मंडपातील कोनाड्यात जगदंबेची मूर्ति आहे. याच मंडपात इथे १८व्या शतकात वास्तव्य असलेल्या सिद्धेश्वर महाराजाच्या पादुका आहेत. यानंतर आणखी पायऱ्या उतरून भुयारी मार्गाने मंडपाच्या खाली असलेल्या गाभाऱ्यात पोचता येते व समोरच षोडशभुजी नृसिंहाची भव्य

मूर्ति दृष्टीस पडते. मूर्ति एकाच शाळिग्राम शिळेतून कोरलेली आहे. वठलेल्या नास्तिकालाही भक्तीची पालवी फुटावी असे हे ध्यान आहे.

इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील ही मूर्ति कलाकाराने अतिशय सजीव बनविली आहे. नरसिंहाच्या रौद्र भावाकडे पाहून नजर खाली गेली की मांडीवर घेतलेला दैत्य हिरण्यकश्यपू दिसतो. उजवा पाय लोंबता सोडून एका हाताच्या साहाय्याने दैत्याचा उजवा पाय जखडून त्याचे उदरविवरण आपल्या दोन्ही हातांची नखाग्रे रुतवून आवेशाने करीत असलेला नरसिंह पाहून पृथ्वी भयकंपित झाल्याचे वर्णन काही अतिशयोक्त वाटत नाही.

मूर्तीच्या इतर हातांत विविध अस्त्रे व वस्तु आहेत मुकुट, गळ्यातील माळा, बाजूबंद यावरील दागदागिने सुरेख कोरले आहेत. प्रभावळीत दशावतार तर पायाशी भूदेवी-गरुड अन् प्रल्हाद-लक्ष्मी अशाही मूर्ति कोरल्या आहेत मूर्तीच्या बरोबर वरती सभामंडपात दोन वृंदावने आहेत. ह्या वृंदावनापासून गाभाऱ्यापर्यंत पोकळ नळी आहे शुद्ध हवेसाठी ही योजना आहे.

## ज्वाला नरसिंह तीर्थ

ही सुलक्षणी सुबक मूर्ति निर्माण कशी झाली याची कथाही पाहण्यासारखी आहे कृष्णामाहात्म्य या पोथीत म्हटले आहे की, "याज्ञवल्क्य ऋषींना व्यास म्हणाले, माझा पिता पराशरऋषि यानी कृष्णातीरी काही कल्पवर्षांपूर्वी तीव्र तपश्चर्या केली. शंकर प्रसन्न होऊन त्यांनी वर देण्याची इच्छा प्रगटिली. पराशरांनी 'नरसिंह' स्वरूपात दर्शन मागितले तेव्हा शंकर गुप्त झाले. नंतर ऋषींना प्रभूंनी नृसिंह स्वरूपात दर्शन दिले. त्या वेळी शिळेतून ज्वाला निघत होत्या. त्यामुळे ते स्थान ज्वाला नरसिंहतीर्थ म्हणून प्रसिद्धीस आले."

पराशरानी मूर्ति नंतर कृष्णेच्या डोहात विसर्जित केली शके १०० च्या सुमारास कुंडिनपूर ऊर्फ कुंडल येथील भीम राजाने ती मूर्ति एका ब्राह्मण कुटुंबाला झालेल्या दृष्टान्तावरून कृष्णेतून वर काढली व या सिद्धभूमीवर तिची स्थापना केली पुढे तेराव्या शतकात वरील देऊळ यादववंशातील राजांनी बांधले. मच्छिंद्रगडाच्या डोंगर-यात्रेत किंचित् वेगळी वाट पत्करून कृष्णाकाठचे हे स्थान जरूर भेट देण्यासारखे आहे.

☐ ☐

## ४. पक्ष्यांचा डोंगर – कर्नाळा

'किलबिल किलबिल पक्षी बोलती, झुळझुळ झरे वाहती, पानोपानी फुले बहरती, फुलपाखरे वर भिर फिरती' असे एक स्वप्नील बालगीत आपल्या परिचयाचे आहे हे स्वप्न प्रत्यक्षात अवतरले आहे ते कर्नाळ्यास (रायगड जिल्ह्यात) पनवेलपासून सुमारे १०–१२ कि. मी. अंतरावर मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग कर्नाळ्याला अगदी खेटून गेला आहे त्यामुळे हे स्वप्न अनुभवणेही फारसे अवघड नाही.

पनवेलहून पेणला जाणाऱ्या राज्य परिवहन गाड्या कर्नाळ्याच्या पायथ्याशी थांबतात अथवा अव्याहत धावणाऱ्या ट्रकसमधून बेभान वाऱ्याची नशा अनुभवीनही तिथे पोचता येते किंवा निळ्या आभाळातून हळुवारपणे पुढे येणारा कर्नाळ्याचा सुळका बघत पायगाडीही अंतर सहजच काटते.

४०–५० किलोमीटर परिघातून कुठूनही ओळखू येणारे सृष्टीचे हे खुणावणारे बोट पायथ्यात पोचले की गुप्त होते. पक्ष्यांना जसे इथल्या दाट अरण्याने अभय दिले आहे तसे पूर्वीकाळी गडालाही.

पायथ्याला पर्यटन खात्याची विश्रामालये बाजूला सारून चढणीला लागले की राजमार्गावरील मोटारींची घरघर दूर पळते. निखळ शांततेत रुंद तांबडी वाट रानाच्या सावलीत झपाझपा पायाखालून सरकते

कर्नाळ्याची चढण फारशी नाही उंची अवघी ४६९ मीटर. त्यामुळे श्वासाचा आवाज चढण्याच्या आतच कर्नाळ्याच्या उत्तर धारेवरची मपाटी गाठता येते समोरच तटाचे आणि त्यातून उगवलेल्या सुळक्याचे दर्शन घडते पुन्हा चढण घेण्यापूर्वी एक देवीची घुमटीही जवळ आहे. गडाचे दार दिसले तरी त्याच्याकडे न जाता येथूनच मागे जाणारे महाभाग पुष्कळ असतात. खरे म्हणजे इथून सुळक्याच्या पायथ्यात

जायला फार तर काही मिनिटे लागतात आणि एवढ्याशा चढणीनंतर कर्नाळ्याच्या विविध अंगाचे जे दृश्य मिळते ते विस्मरणीय नाहीच नाही मात्र अशा लोकांसाठी मंगेशकरांच्या 'जैत रे जैत' चित्रपटाने मोठीच सोय केली आहे यात कर्नाळा परिसराचे असे जिवंत चित्रण केले आहे की प्रत्यक्ष पाहिलेल्यांना पुन प्रत्यय मिळावाच, पण न पाहिलेल्यांना ओढ लागावी.

कर्नाळ्याची चढाई पूर्वांगाने गुळसुद्याहूनही करता येते. पनवेलहून 'आपटे' येथे जाणारी गाडी आणि रूळमार्ग दोघेही गुळसुद्यातून जातात. इथून चाप्याची वाडी वा जमन्याची वाडी मार्गे कर्नाळ्यास पोचता येते हा मार्ग तसा अडचणीचा. डोंगरांचा सराव असणाऱ्यांनीच येथून जावे.

कर्नाळा दुर्गाला माथा सपाटी थोडीच आहे लाव्हारसाचा जाड थर माथ्यापाशी उघडा पडून कडे निर्माण झाले. या नैसर्गिक सरक्षणाचा उपयोग करून दुर्गबांधणी झाली कर्नाळ्यास या कड्याची उंची केवळ डोळ्यानी पाहण्याजोगी आहे. त्यामुळे भुईकोटासारखा याला सर्व परिघावर भक्कम तट बांधला आहे अशा तऱ्हेने पूर्णत तटवेष्टित असा हा एकमेव गिरिदुर्ग असावा.

आग्नेयेस आणि उत्तरेला गडाला माच्या आहेत उत्तर माचीतूनच गडात प्रवेश करण्याचा मार्ग आहे दारावर वाघशिल्पे कोरली आहेत. वरच्या दुर्गाच्या तटबंदीचे सरक्षण या दाराला ठेवले आहे. अशा सरक्षण योजनेपुढे शिवछत्रपतींचे मावळे देखील दबले गेले यात काय नवल ! मुंबईकर इंग्रजांनी सुरतला लिहिलेल्या पत्रात कर्नाळ्यावरील शिवचढाईचे वर्णन केले आहे ते असे ––

"त्याच्या (शिवाजी) लोकानी आमच्यापासून जवळच दिसणाऱ्या कर्नाळा नावाच्या डोंगरी किल्ल्याला वेढा घातला आहे. आमच्या समोरून रक्षणाकरिता फळ्या आणि चिखल याच्या भिंती बांधीत बांधीत ते तटाशी जाऊन भिडले आहेत या फळ्या ते लोक आपल्या-समोर धरीतात. थोड्या अवकाशातच ते हा किल्ला घेतील."

हे पत्र शके १५९२ चैत्र शु. १० चे आहे. अशा तऱ्हेच्या प्रयत्नानंतर तब्बल चार महिन्यांनी कर्नाळा स्वराज्यात आला. त्याची नोंद अशी –

"शके १५९२ साधारण संवत्सर आषाढ शु॥ १४ कर्नाळा घेतला."

पहिले दार आता चांगलेच मोडकळले आहे. दगडी तुळया पडत चालल्या आहेत एखाद्या पावसाळ्यात ही उत्तम कमान कोसळणार असे दिसते. इथे पूर्वी असणारा मराठी शिलालेख तर दडून गेलेला दिसतो. या माचीतून वरचा दुर्ग डावीकडे ठेवून सुळक्याला प्रदक्षिणा घालून आग्नेय माचीत जाता येते. वरच्या दुर्गातून मात्र सुळक्याच्या फक्त पूर्वांगानेच पलीकडे माचीत जाता येते. वरच्या दुर्गाच्या दारावर एक सुस्पष्ट फार्सी लेख आहे त्यात 'सय्यद नुरुद्दीन महमदखान हिजरी ११७४' असा उल्लेख आहे.

सुळक्याच्या पोटात किमान १२-१३ व्या शतकात खोदलेली पाण्याची टाकी आहेत मात्र इतिहासात याचा उल्लेख येतो तो इसवी १५४० मध्येच अहमदनगरच्या निजामशाहीची राजवट येथे त्या वेळी प्रस्थापित झाली. शिवछत्रपतीनंतर मुघल, आंग्रे, पेशवे असे हस्तान्तर होऊन कर्नल प्रॉथरने इ १८१८ मध्ये तो जिंकला.

कर्नाळ्याचे सर्वात लक्षवेधी स्थान म्हणजे माथ्यावरचा ५० मीटर उंचीचा सुळका. गिर्यारोहकाना हा मोह पाडतोच. तेथे मधाची असंख्य पोळी पहायला मिळतात. अर्थात् ही शोभिवत जागा चढणाऱ्याना त्रासदायक आहे.

सुळका पश्चिमेकडे कलता आहे. यामुळे वर चढण्याची वाट फक्त पूर्वेकडूनच. ठाकरानी मधाच्या आशेने केलेली ही वाट कातळारोहणाच्या दृष्टीने मध्यम अवघड आहे सुळक्याच्या पूर्व पायथ्याशी पाण्याच्या हौदावर वाकलेले एक झाड आहे या झाडातून वर कड्यावर पाऊल टाकावे लागते छातीएवढ्या उंचीची एक अवघड जागा पार केली की किंचित् सोपी चढण आणि मग कड्यातला एक कोपरा. येथे उत्तम खोबणी असल्या तरी कडा सरळ उभा असल्याने हा कोपरा कठीणच आहे. पुढे दोन मीटर उंचीचा एक भाग आहे झाडाजवळून

चढले की पुढे सोपा मार्ग आहे. पण हा भाग मधाच्या पोळ्यांना जवळचा आहे.

माथा छोटासा वर पोचले की सृष्टि ठेंगणी होते चहू अंगानी पायथ्यात पसरलेल्या गच्च अरण्यातून उगवलेल्या या सुळक्यावर उभे राहणे यात गंमत आहे. पहिल्यांदा डोळ्यात भरते ती पश्चिमेकडे मुंबई. त्या अलीकडे घारापुरी डोंगर दक्षिणेला साकशीगड, तर पूर्वेला माणिकगड. त्यामागे मुख्य सह्याद्री रांगेत नागफणी, राजमाची, ढाकगड. ईशान्येला माथेरान रांग तर जवळच आहे.

असे हे सुख ज्या पक्ष्याना रोजच बघण्यास मिळते ते भाग्यवानच. या भाग्यवंताना अभयारण्यातील पिंजऱ्याच्या बंदिवासात कसे वाटत असेल हे अनुभवण्यास या सुळक्यावरचे स्वातंत्र्य प्रथम अनुभवले पाहिजे हेच खरे.

कर्नाळा अभयारण्य पक्ष्याना विमुक्त करून दिलेले असले तरी वाढत्या पर्यटकांच्या गर्दीमुळे, विशेषतः ते घालीत असलेल्या गोंधळामुळे पक्ष्याना जणू नजरकैदेची शिक्षा झाली आहे शासकीय विश्रामधामाभोवती शांत वेळी निरीक्षण केल्यास खालील पक्षी दिसू शकतात

(१) कालशीर्ष कांचन(ब्लॅक हेडेड ओरिओल)(२) कोतवाल (रॅकेट टेल्ड ड्रोंगो)(३) जेरेडोनचा क्लेरॉप्सिस हिरवा (४) तांबडा विष्फुलिंग (ऑरेंज मिनिव्हेट)(५)हिरवा तांबट (ग्रीन बार्बेट)(६) सोनेरी पाठीचा काष्ठकूट(गोल्डन बॅक्ड वुडपेकर)(७) पचरंगी पोपट (ब्लॉसम हेडेड पॅरेट) (८) मोर (कॉमन पी फाऊल) (९)ससाणा (फाल्कन–हा सुळक्यावर आढळतो)(१०) खंड्या (किंगफिशर)


पिंजऱ्यात ठेवलेले पक्षी(जे स्थानिक नाहीत)पाहण्यापेक्षा रानातील पायवाटा धुंडाळत त्या पक्ष्यांच्या संगीतात आपलीही एखादी हळुवार लकेर मिसळण्यात अधिक आनंद मिळेल यात शंका नाही.

□ □

# ५. कऱ्हेपठारावरील मल्हारगड

मराठ्याचे युद्धतंत्र म्हटले म्हणजे नजरेसमोर येतो गनिमी कावा. मुघलाप्रमाणे मराठ्यानी अवजड युद्धसामग्रीचा हव्यास कधी फारसा धरला नाही. पण स्वराज्याच्या कक्षा जसजशा रुंदावल्या, युद्धक्षेत्र डोंगरदऱ्यातून सपाट मैदानावर सरकले अन् जरीपटका उत्तरेकडे फडकू लागला तेव्हा मराठ्यानीदेखील आपल्या भीमथडी दळाला जोड दिली ती तोफखान्याची!

पेशव्याच्या तोफखान्याचे नेतृत्व होते सरदार पानसे यांच्याकडे अन् पानशांचे गाव म्हणजे सोनोरी थेट प्राचीन सोनपुरीशी नाते जोडणारे




पुरंदर तालुक्यात सासवडच्या ईशान्येस सुमारे पाच किलोमीटर अंतरावर डोंगराच्या एका अर्धवर्तुळात आणि गर्द झाडीत ही सोनपुरी लपलेली आहे. सोनोरीच्याच पलीकडे उत्तरेस काही अंतरावर एका मोक्याच्या जागी एक दुर्ग बांधून काढला गेला आहे. याचे नाव 'मल्हारगड'

दिवेघाट चढून सासवडकडे जाताना डावीकडे दूरवर मल्हार-गडची तटवंदी दिसते किंवा पुणे-सोलापूर रस्त्यावरून लोणीकाळभोर-पासून उजवीकडे याचे दर्शन होते

सिंहगडापासून पश्चिम-पूर्व डोंगराची भुलेश्वर रांग पसरली आहे. तिच्यातच दिवेघाटाच्या पूर्वेस पाच किलोमीटर अंतरावर मल्हार-गड खडा आहे. याच्या उत्तर पायथ्याला चोराची आळंदी हे गाव अन् पुणे-कोल्हापूर रेल्वेमार्गावरील आळंदी स्थानक उत्तरेस आहे

चोराच्या आळंदीहून मल्हारगडकडे निघाले की एक ओढा ओलांडून गेल्यावर रेल्वेचा जुना मार्ग लागतो आणि गडाचा पायथा येतो. या बाजूने गडाचे कडे भिंतीसारखे सरळ आहेत इथूनच गडाचा दरवाजाही दृष्टीस पडतो गडाची चढण उभी, पण थेटपर्यंतची वाट दगडांनी उत्तम प्रकारे बांधून काढलेली आहे. त्यामुळे अर्ध्यापाऊण तासात गडाच्या डावीकडील खिंडीत पोहोचता येते. खिंडीत आले की कऱ्हे पठार दृष्टीस येते अन् दूरवर पुरंदर-वज्रगड.

कऱ्हे पठाराच्या बाजूने गडाची चढण पुण्याच्या पर्वतीएवढी. गडाच्या दरवाजाकडे जाणारा राजमार्ग याच बाजूने, पण खिंडीतूनच दगडगोटे तुडवीत चढून तटापर्यंत जाता येते. इथे एका डोंगरात दीड मीटर व्यासाची आरपार जागा आहे. आत बसले की उत्तरेकडील दरीतून जोरदार वारा येतो

तटाजवळ जाऊन पूर्व बुरजाला वळसा घालून उत्तरेच्या महा-द्वारात प्रवेश होतो. द्वार उंचेपुरे आहे तट सुमारे ४–५ मीटर उंच बांधणीचा पेशवेकालीन झोक लगेच दिसून येतो

मल्हारगडचा आकार त्रिकोणी दिवेघाटासारख्या महत्त्वाच्या मार्गावर नजर ठेवता यावी आणि स्वतःच्या सोनोरी गावाचेही संरक्षण व्हावे या उद्देशाने माधवराव कृष्ण व भिवराव यशवंत पानसे यांनी शके १६८५-८७ मध्ये हा गड बांधला. फावडी-कुदळीचे घाव जेव्हा डोंगरावर पडले तेव्हा अशी कथा आहे की एका ठिकाणाहून रक्त वाहू लागले. तेव्हा त्या ठिकाणी पानशांनी मल्हारी मार्तंडची प्रार्थना केली रक्त वाहणे बंद झाले आणि पानशांनी गडाचे नामकरण केले मल्हारगड.

मल्हारगडला नैसर्गिक संरक्षण नसल्याने दुहेरी तट बांधलेला आहे. पहिल्या प्रवेशद्वारातून पुढे गेले की सैनिकांच्या देवड्या लागतात अन् पुढे एक विहीर लागते. गडात एकूण तीन विहिरी अन् दक्षिण भागात एक बांधीव कुंड आहे.

गडाच्या मध्यभागी आतील तटाच्या दरवाजाने जाता येते. आत एक खंडोबाचे व एक महादेवाचे, अशी दोन मंदिरे आहेत खंडोबाची मूर्ति घोड्यावरील आहे. गडाच्या पश्चिम बुरुजावरून दिवेघाट, जाधवगढी अन् कानिफनाथाचे शिखर दिसून येते. तर नैऋत्येला पुरंदर वज्रगड व चंद्र-सूर्य पर्वत नजरेस येतात. सासवडही झाडीच्या पुंजक्यातून उठून दिसते.

श्रीमंत थोरले माधवराव पेशवे इ. १७७१-७२ मध्ये या गडाचे अवलोकन करण्यासाठी इथे आले होते. शिवाय उमाजी नाईक व वासुदेव बळवंत फडक्याचे क्रांतिकारक इथे आश्रयाला येत असत.

गडावरून उत्तरेला छान दरी दिसते पण दक्षिणेला दिसतात ते उघडे-बोडके डोंगर अन् वैराण रखरखीत मैदान. एके ठिकाणी मात्र झाडीच्या समूहातून मधूनच डोकावणारी घरे आणि विहिरीच्या मोटावरील आवाज लक्ष वेधून घेतो. एका पाणंदीतून ती झाडी जवळ केली की, लक्षात येते की हीच ती सोनपुरी--जिने सरदार पानशांचे वैभव न्याहाळलय ! पराक्रम पाहिलाय. टिपू, हैदर, निजाम, इंग्रज यांना एके काळी ज्यांनी मराठी तोफखान्याचे पाणी, अंहं! , आग चारली.

पानसी ( हे पानशांचे मूळ आडनाव ) घराण्याचे मूळ पुरुष गोविंदपंत. १६ व्या शतकापूर्वी कर्नाटकातून महाराष्ट्र देशी त्यांनी आगमन केले. अन् या सोनपुरीस पानशांचे प्रथम घरकुल स्थापले ते लक्ष्मीधर पानशांनी त्यांनी तेथील ज्योतिष व कुळकरण वृत्ति संपादिली. पुढे पानसे घराण्याचा उत्कर्षच होत गेला. अन् श. १६६२ मध्ये पानसे घराण्याला सरदारकी मिळाली. या वेळच्या सरदार माधवराव शिवदेवांनीच स्वपराक्रमाने तोफखान्याची सरदारकी मिळविली ती श. १६७६ मध्ये.

सोनोरीच्या वेशीत प्रवेश करताच प्रथम लक्ष वेधले जाते ते भिवकुंडाकडे पांडुरंग काळयाच्या शिवारातले हे भिवकुंड चांगले ऐसपैस आहे उतरण्यासाठी पायऱ्या बांधलेल्या. पाणीही स्वच्छ व मधुर. कुंडाशेजारी भिवराव यशवंत पानसे यांची समाधि आहे. पानशांच्या नावाजलेल्या सरदारांपैकी हे एक शके १७०० च्या फाल्गुन वद्य षष्ठीस या पराक्रमी सरदारावर अन्त्यसंस्कार इथे झाले. त्यांची समाधि उत्तम स्थितीत नाही. राक्षसभुवन येथे निजामाचा प्रचंड पराभव झाला तेव्हा आणि शके १७०० च्या सुमारास इंग्रजांशी वडगाव येथे झालेल्या लढाईत भिवरावांनी तोफखान्याचे कुशलपणे नेतृत्व केले होते

वडगावच्या लढाईत तर इंग्रजांचा मोठा अधिकारी ठार झाला त्याची नोंद अशी –

"भिवराव पानसे यांनी इंग्रजांवर चालून जाऊन तोफेचे गोळे व बाण टाकिले, तेव्हा तेही तयार होऊन येऊ लागले. तेव्हा यांनी मागती मारगीर करून(त्यांना) मागे सारिले. इष्टूर फाकडा (कॅप्टन स्टुअर्ट) कारल्याच्या मुक्कामी इकडील तोफेचा गोळा लागून ठार जाहला."

भिवकुंडापासून पुढे गेले की, झाडीझाडीतून वाट पुढे जाते अन् एक चौफेर तट दृष्टीस पडतो. हाच पानशांचा वाडा.

या सहा बुरुजी तटाचा पश्चिम दरवाजा अतिशय भक्कम व भव्य आहे. दोन्ही बाजूंनी दगडी बुरुज आणि मध्ये पाच एक मीटर उंचीचा मुळे असलेला भव्य लाकडी दरवाजा. पूर्वी इथेच मध्यभागी निशाण डौलात फडकत असेल पहारेकरी खडे असतील याच दरवाजाने श्रीमंत माधवराव पेशवे वाड्यात गेले असतील अन् मोहिमेहून परतल्यावर सरदार पानशांच्या मुखावरचा विजयानंद यांने न्याहाळलाही आहे.

वाड्याचा मुख्य दरवाजा पूर्वेस आहे. तेथेच एक गणपति मंदिर आहे. शके १६८२ ते ८४ मध्ये बांधलेला हा वाडा बहुतांशी पडला आहे. दक्षिण भागात मात्र काही पानसे मंडळी अजूनही राहत आहेत.

वाड्यातले आता मुख्य आकर्षण म्हणजे लक्ष्मी नारायणाचे मंदिर. बाह्य सजावट साधीच पण आतील पांढऱ्या दगडाची मूर्ति अतिशय सुबक आहे कर्नाटकातील एका लढाईच्या वेळी मेलकोट्याहून ही मूर्ति पानशांनी आणली. सिंहासनावर शेष त्यावर गरुड आणि त्यावर वामांगी लक्ष्मी असलेले विष्णु अशी ही मूर्ति आहे देवळाचे चारीही कोपऱ्यात गणपति, महादेव, देवी व सूर्य स्थापून पंचायतन केले आहे.


लक्ष्मी-नारायणाशिवाय सोनोरीत विशेष दर्शनीय म्हणजे मुरलीधराचे मंदिर बारामतीजवळील पणदरे गावच्या खाणीतील काळ्या पाषाणातून हे मंदिर उभारले गेले आहे अतिशय घोटीव दगडी सभामंडप असलेल्या या मंदिराचे विटाचे शिखरही नक्षीदार आहे गाभाऱ्यातील मुरलीधराची मूर्ति भावमधुर आहे. गाईच्या कळपात उभे राहून श्रीगोपालकृष्ण मुरली वाजवीत आहेत जवळ एक पांढऱ्या पाषाणाची रुक्मिणीची मूर्तीही आहे.

सोनोरीच्या पूर्वेस मोहनदरा नावाचे शिवार आहे मोहनदरा शिवारात एक अष्टकोनी पायऱ्या असलेला मोठा तलाव आहे दोन ठिकाणी त्याची खोली सहा-सात मीटर आहे पावसाळ्यात तो पूर्ण भरतो. या स्थानाशिवाय विठ्ठल, रामचंद्र, महादेव, बहिरोबा ही देवळे आहेत. एक दिवसाच्या सहलीसाठी म्हणून सोनोरी हे एक उत्तम ठिकाण आहे सोनोरीतून बाहेर पडले तरी मुरलीधराचे भावमधुर नेत्र सातत्याने आपली पाठराखण करीत राहतात.

□ □

# ६. वाठार निंबाळकर – नऊ वाड्यांचे !

सातारा जिल्ह्यातील तालुके फलटणला पाहण्यासारखे काय विचाराल तर मी तरी निंबाळकरांच्या वाठारकडे बोट दाखवीन. वाठारचे जबरदस्त आणि गढीवजा नऊ वाडे पाहताना ही प्रचिती येईल.



वाड्यातले आता मुख्य आकर्षण म्हणजे लक्ष्मी नारायणाचे मंदिर. बाह्य सजावट साधीच पण आतील पांढऱ्या दगडाची मूर्ति अतिशय सुबक आहे. कर्नाटकातील एका लढाईच्या वेळी मेलकोट्याहून ही मूर्ति पानशांनी आणली. सिंहासनावर शेष त्यावर गरुड आणि त्यावर वामांगी लक्ष्मी असलेले विष्णु अशी ही मूर्ति आहे. देवळाचे चारीही कोपऱ्यात गणपति, महादेव, देवी व सूर्य स्थापून पंचायतन केले आहे.


लक्ष्मी-नारायणाशिवाय सोनोरीत विशेष दर्शनीय म्हणजे मुरली-धराचे मंदिर. बारामतीजवळील पणदरे गावच्या खाणीतील काळ्या पाषाणातून हे मंदिर उभारले गेले आहे. अतिशय घोटीव दगडी सभा-मंडप असलेल्या या मंदिराचे विटाचे शिखरही नक्षीदार आहे. गाभाऱ्यातील मुरलीधराची मूर्ति भावमधुर आहे. गाईच्या कळपात उभे राहून श्रीगोपालकृष्ण मुरली वाजवीत आहेत. जवळ एक पांढऱ्या पाषाणाची रुक्मिणीची मूर्तीही आहे.

सोनोरीच्या पूर्वेस मोहनदरा नावाचे शिवार आहे. मोहनदरा शिवारात एक अष्टकोनी पायऱ्या असलेला मोठा तलाव आहे. दोन ठिकाणी त्याची खोली सहा-सात मीटर आहे. पावसाळ्यात तो पूर्ण भरतो. या स्थानाशिवाय विठ्ठल, रामचंद्र, महादेव, बहिरोबा ही देवळे आहेत. एक दिवसाच्या सहलीसाठी म्हणून सोनोरी हे एक उत्तम ठिकाण आहे. सोनोरीतून बाहेर पडले तरी मुरलीधराचे भावमधुर नेत्र सातत्याने आपली पाठराखण करीत राहतात.

☐ ☐

# ६. वाठार निंबाळकर – नऊ वाड्यांचे !

सातारा जिल्ह्यातील तालुके फलटणला पाहण्यासारखे काय विचाराल तर मी तरी निंबाळकरांच्या वाठारकडे बोट दाखवीन. वाठारचे जबरदस्त आणि गडीवजा नऊ वाडे पाहताना ही प्रचिती येईल.



निंबाळकरानी सुमारे एक कोटी रुपये खर्च करून ही बांधकामे केली. प्रत्यक्ष वेशीपाशी राहून वाड्याकडे दृष्टि टाकली तर आश्चर्य वाटते. इतिहासाचार्य राजवाडे हे निंबाळकराच्या या प्रचंड कामाचे नेहमीच कौतुक करीत.

फलटण ताथवडे घाटाने पुसेगाव आणि फलटण-आदर्की घाटाने वाठार (रेल्वे स्टेशन – मध्य रेल्वे) या दोन राज्यमार्गांच्या मध्यभागी निंबाळकराचे हे नऊ वाड्यांचे वाठार वसलेले आहे

मात्र फलटणपासून पुसेगाव रस्त्यावरील ९–१० कि मी वरील 'वाठार निंबाळकर' थांब्यावर उतरले तरी पुसटशीही कल्पना येणार नाही की या गावात एका मराठी सरदाराने आपली संपत्ति मोठ्या वास्तु उभारण्यासाठी खर्चिली होती. कारण गाव रस्त्यापासून थोडे आतच आहे अर्थात् वाहनाच्या गोंगाटाचा उपसर्ग या वास्तूंच्या प्रांगणात गेल्यावर मुळीच जाणवत नाही तिथल्या शांततेत मन गुंगून पडते. पण ही शांतता भीषण नाही वेगळ्या गूढरम्य वातावरणातील आनंददायी शांतता इथे असते.

तसे पाहिले तर जुने वाठार गाव ओढ्याच्या पश्चिम काठावर होते पण कुशाजी निंबाळकरांकडे दोनशे वर्षांपासून या गावची पाटीलकी आणि देशमुखी वतन आले आणि हळुहळू या गावचे स्वरूप पालटले.

शिवछत्रपतींच्या वेळच्या निंबाळकर घराण्याची ही दुसरी शाखा. पहिली फलटणकराची ही वाठारकर शाखा नावारूपाला आणली कुशाजी आणि त्याच्या पुत्रानी

शके १७०३ (इ. स १७८१) च्या एका पत्रात उल्लेख आहे–
"माआनाम कुसाजी निंबाळकर देशमुख मौजे वाठार फलटण यास माधवराव नारायण प्रधान .... तुम्ही हुजुर विदित केले की मौजे मारची देशमुखी व पाटीलकी आपली आहे'''तुमचे भाऊबंद परागंदा आहेत त्यांच्या पडजमिनी असतील त्याची लावणी करून उत्पन्न होईल ते आपले रुपयाचे व्याजात घेत जाणे''' आज्ञाप्रमाण लेखनसीमा...."

यानंतर या घराण्याचा उत्कर्ष होऊन इ. स. १८०० मध्ये तो इतका शिगेला पोचला की पेशवे-पंतसचिव-शिंदे-होळकर यांचे प्रमुख सावकार म्हणून निंबाळकरांची गणना होऊ लागली सुमारे १० कोटीचे कर्जवाटप त्यांनी केले असावे प्रचंड वाडे बांधून झाले होते त्यासमोर हत्ती घोडे, उंट झुलू लागले. वाठार निंबाळकर हे एक शक्तिशाली केंद्र निर्माण झाले

या केंद्राभोवती एक भक्कम वेस होती. हिचे उत्तर द्वार आजही उत्तम स्थितीत आहे त्याच्या लाकडी फळ्यांना लोखंडी पट्ट्या ठोकून ते भक्कम केलेले आहे. दारातून आत गेले की मोकळे पटांगण आणि मग सामोरा येतो तो सामाईक वाडा – कुशाजीरावांचा याच्या महाद्वाराला समोर संरक्षक भिंत आहे.

संपत्तीच्या सच्चेपणाची खात्री जशी या आख्यायिकेवरून पटते तशीच सामाईक वाड्याच्या बांधकामावरून. हा वाडा क्षेत्रफळाने सर्वांत मोठा आहेच, पण त्याच्या संरक्षण योजना पाहिल्या तर भुई-दुर्गच म्हणावे लागेल. सरकारव्यतिरिक्त असे बांधकाम करू शकणारी व्यक्ति संपत्तिमानच असली पाहिजे.

तटाच्या भिंती चांगल्या सहा मीटर उंच आहेत तर त्यावर हिंडण्या- साठी मीटर दीड मीटर रुंदीचा रस्ता सर्व तटावरून आहे. तटाला एकूण नऊ बरूज आणि त्यावर तोफ ठेवण्याचीही सोय आहे. तसेच बंदुकांसाठी जागा आहेत. नैर्ऋत्येचा बुरूज फुटलेला आहे आणि त्यामुळे त्याची बांधणी उघडी झाली आहे

बांधणीवरून असे दिसते की प्रथम बुरुजाचा गोल दगडविटांनी बांधून काढला आहे त्यावर बाहेरून उत्तम घडीव दगडी बांधणी करून तो दुहेरी भक्कम बनविला आहे. बुरुजाचा माथा मात्र पूर्णतः विटांचा आढळतो

वाड्यातील राहत्या जागा साफ कोसळल्या आहेत. मात्र दारा-वरील दोन मजले जेमतेम उभे आहेत यातील एका मजल्यावर नगार-खाना होता छताकडची उठावाची नक्षी सध्या चांगली नाही. पण मूळ स्थिति. सुरेख दिसत असणार. वाड्यात एक पायऱ्यांची विहीर आहे.

सामाईक वाडा बांधताना भक्कमपणाला महत्त्वाचे स्थान असावे, कारण या वाड्यात जमून शत्रूला तोंड देणे सोपे जात असावे. सामाईक वाड्याभोवती पिराजीराव, अप्पाजीराव, नीळकंठराव, आनंदराव, चिटकोजीराव धारराव, व्यंकटराव, बापूजीराव यांचे आठ वाडे बांधले गेले.

हे बांधताना मात्र कलात्मक सौंदर्याकडे जास्त लक्ष दिले गेले असावे. प्रत्येक वाड्याला वेगळेपण आहे. पश्चिमागाला ओढ्याकाठच्या वाड्याचे बुरुज चिचोळे व उभट आहेत. काही वाड्यांच्या द्वाराच्या कमानी सरळ चौकटीच्या तर काही नक्षीदार कमानी एका वाड्यातील मूळचा अंतर्भाग बराचसा शिल्लक आहे यात भित्तिचित्रे, छतावरील नक्षीकामाचा गालिचा बघण्यासारखा आहे.

इतर अनेक ऐतिहासिक वास्तूप्रमाणे मराठा वास्तुकलेचे चित्रकलेचे हे उत्तम नमुने कालौघात नामशेष होत चालले आहेत. जे नांदते वाडे आहेत तेथेही हीच परिस्थिति आहे, तर अन्य वाड्याची गोष्ट विचारायलाच नको मात्र वेशीजवळील श्रीरामाचे देऊळ उत्तम स्थितीत आहे. तेथील मोठी विहीर, भिंतीवरील देवादिकांची चित्रे, शिलालेख हे सर्व बघण्यासारखे शिल्लक आहे

कुशाजी व त्याच्या पुत्राचे ऐहिक वैभव कालान्तराने नष्ट झाले. त्याच्या काळी रुपये खुर्दा पाडण्याची टाकसाळ वाठारात होती तीही बंद झाली. वाठारच्या वाड्याचा परिसर सुशोभित स्वच्छ होण्यासाठी काही प्रयत्न केले तर मराठा वास्तुशैलीचा एक उत्तम नमुना जतन होईल.

□ □

# ७. संतोषाच्या वारूवर

आकाशात चांदण असं नव्हतच त्यामुळे डोंगराच्या पायथ्याला असणाऱ्या मिणमिण्या दिव्याच्या दिशेला गाव असावेसे वाटले आणि देवळातील घंटेचा आवाज त्या शांततेत 'ताथवडे' गावाचा पत्ता हळूच सांगून गेला फलटण–वडूज गाडीने उडविलेली धूळ अजून स्थिरावली नव्हती. मोळच्या घाटात गाडीचे दिवे चमकू लागले तोपर्यंत आम्ही ताथवडे थांब्यापासून जवळच्याच पाणंदीत शिरलो होतो. अन् लगोलग पलीकडे गावही लागले. गावाबाहेर एक छान विहीर आहे. बरीच जुनी. गावात शिरलो तेव्हा नगाऱ्याचा पडघम एक वेगळेच वातावरण निर्मून गेला. एका प्राचीन गावात आल्याची जाणीव झाली.

फलटण म्हणजे महानुभवाची काशी. निंबाळकर, घाटगे, माने, ही इतिहासप्रसिद्ध घराणी फलटणजवळची. शिवाजी महाराजांचा तर ह्या परिसराशी अतिशय जिव्हाळ्याचा संबंध सह्याद्रीनेही महादेव रांगेद्वारे आपले हस्तलाघव फलटणपर्यंत पोचविले आहे यातच फलटणच्या दक्षिणेला दोन दुर्ग शिवछत्रपतींनी उभारले आहेत–संतोषगड व वारूगड! संतोषगडाच्या उत्तर पायथ्याला फलटणपासून ३२ किलोमीटरवर ताथवडे हे खेडे आहे आमच्या आगमनामुळे ताथवडेकरांच्या चेहेऱ्यावरची सुरकुतीही हालली नाही. मात्र सावंत अन् येळपे ह्या कऱ्हाडकडच्यानी शाळेची कवाडे आम्हाला खुली केली. गावात म. रा. वि. म. अजून पोचलेले नव्हते त्यामुळे अंधारात आम्हीही काळोखमय झालो.

उजाडले ते मंद सूर्यकिरणे लेवून. गावात घरापेक्षा देवळेच जास्त. त्यातले बालसिद्धाचे मंदिर प्रेक्षणीय आहे. मंदिराचा नगारखाना पंधरा मीटर उंच आहे प्राकारही प्रशस्त विटाचे शिखर सोडले तर बांधकाम घोटीव दगडाचे. सभामंडपाच्या पायरीवर एक शिलालेख आहे.

सामाईक वाडा बांधताना भक्कमपणाला महत्त्वाचे स्थान असावे, कारण या वाड्यात जमून शत्रूला तोंड देणे सोपे जात असावे सामाईक वाड्याभोवती पिराजीराव, अप्पाजीराव, नीळकंठराव, आनंदराव, चिटकोजीराव धारराव, व्यंकटराव, बापूजीराव यांचे आठ वाडे बांधले गेले.

हे बांधताना मात्र कलात्मक सौंदर्याकडे जास्त लक्ष दिले गेले असावे. प्रत्येक वाड्याला वेगळेपण आहे पश्चिमांगाला ओढ्याकाठच्या वाड्याचे बुरुज चिंचोळे व उभट आहेत. काही वाड्यांच्या द्वाराच्या कमानी सरळ चौकटीच्या तर काही नक्षीदार कमानी एका वाड्यातील मूळचा अंतर्भाग बराचसा शिल्लक आहे यात भित्तिचित्रे, छतावरील नक्षीकामाचा गालिचा बघण्यासारखा आहे.

इतर अनेक ऐतिहासिक वास्तूप्रमाणे मराठा वास्तुकलेचे चित्रकलेचे हे उत्तम नमुने कालौघात नामशेष होत चालले आहेत जे नांदते वाडे आहेत तेथेही हीच परिस्थिति आहे, तर अन्य वाड्यांची गोष्ट विचारायलाच नको मात्र वेशीजवळील श्रीरामाचे देऊळ उत्तम स्थितीत आहे. तेथील मोठी विहीर, भिंतीवरील देवादिकांची चित्रे, शिलालेख हे सर्व बघण्यासारखे शिल्लक आहे

कुशाजी व त्याच्या पुत्राचे ऐहिक वैभव कालान्तराने नष्ट झाले. त्याच्या काळी रुपये खुर्दा पाडण्याची टाकसाळ वाठारात होती तीही बंद झाली. वाठारच्या वाड्याचा परिसर सुशोभित स्वच्छ होण्यासाठी काही प्रयत्न केले तर मराठा वास्तुशैलीचा एक उत्तम नमुना जतन होईल

□ □

# ७. संतोषाच्या वारूवर

आकाशात चांदण असं नव्हतंच त्यामुळे डोंगराच्या पायथ्याला असणाऱ्या मिणमिण्या दिव्याच्या दिशेला मात्र असावेसे वाटले आणि देवळातील घंटेचा आवाज त्या शांततेत 'ताथवडे' गावाचा पत्ता हळूच सांगून गेला फलटण–वडूज गाडीने उडविलेली धूळ अजून स्थिरावली नव्हती. मोळच्या घाटात गाडीचे दिवे चमकू लागले तोपर्यंत आम्ही ताथवडे थांब्यापासून जवळच्याच पाणंदीत शिरलो होतो अन् लगोलग पलीकडे गावही लागले. गावाबाहेर एक छान विहीर आहे. बरीच जुनी. गावात शिरलो तेव्हा नगाऱ्याचा पडघम एक वेगळेच वातावरण निर्मून गेला एका प्राचीन गावात आल्याची जाणीव झाली.

फलटण म्हणजे महानुभवाची काशी. निंबाळकर, घाटगे, माने, ही इतिहासप्रसिद्ध घराणी फलटणजवळची शिवाजी महाराजांचा तर ह्या परिसराशी अतिशय जिव्हाळ्याचा संबंध सह्याद्रीनेही महादेव रांगेद्वारे आपले हस्तलाघव फलटणपर्यंत पोचविले आहे यातच फलटणच्या दक्षिणेला दोन दुर्ग शिवछत्रपतींनी उभारले आहेत–संतोषगड व वारूगड! संतोषगडाच्या उत्तर पायथ्याला फलटणपासून ३२ किलोमीटरवर ताथवडे हे खेडे आहे आमच्या आगमनामुळे ताथवडेकरांच्या चेहेऱ्यावरची सुरकुतीही हालली नाही. मात्र सावंत अन् येळपे ह्या कऱ्हाडकडच्यांनी शाळेची कवाडे आम्हाला खुली केली गावात म रा वि. म. अजून पोचलेले नव्हते त्यामुळे अंधारात आम्हीही काळोखमय झालो.

उजाडले ते मंद सूर्यकिरणे लेवून. गावात घरापेक्षा देवळेच जास्त. त्यातले बालसिद्धाचे मंदिर प्रेक्षणीय आहे. मंदिराचा नगारखाना पंधरा मीटर उंच आहे. प्राकारही प्रशस्त विटांचे शिखर सोडले तर बांधकाम घोटीव दगडाचे. सभामंडपाच्या पायरीवर एक शिलालेख आहे.

चेरणी सादर विसाजी शामराज देशपांडे मो। फलटण देहे सावधरा
शिव कसबे ताथवडा शके १६८४ चीत्र भानु
नाम संवत्सर जे × × वद्य नवमी

म्हणजे कोणा विसाजी शामराव देशपांडे यांनी या प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार १७६२ साली केला बालसिद्ध हा अष्टभैरवांपैकी ! चैत्र वद्य अष्टमीला इथे मोठी यात्रा भरते

## दुर्गाची रचना

संतोषगडाची चढण मुळीच अवघड नाही. सगळा मुरमाड डोंगर झाडी नाही. चटकन वर पोचलोही महादेव रांगेतून पुढे आलेल्या एका टेकडीवर हा दुर्ग बांधला आहे. उत्तरेच्या बाजूला तीन टप्पे आहेत अगदी वरचा टप्पा म्हणजे बालेकिल्ला त्याच्या सर्व बाजूंना पन्नास मीटर उंचीचा खडक व त्यावर तटबंदी आहे. मधला टप्पा माचीचा व या टप्प्याकडे जाणारी वाट सरंक्षिण्यासाठी आणखी तळच्या टप्प्यावर सरक्षित तटबंदी आहे

या पहिल्या तटबंदीखाली तीन गुहा आहेत. यात एक पुरुष मूर्ति आहे. वाल्मीकीची मूर्ति म्हणून तिला समजतात. या गुहाच्या वरती एक मठ आहे. खोलीत देवीची एक सुबक मूर्ति आहे. पुढे खडकाचा टप्पा चढला की समोरच आणखी एक गुहा आहे. आत गेल्यावर थंड पाण्याचा मुबलक साठा दिसतो. तीन खांब असलेली ही गुहा प्रचंड आहे. डाव्या बाजूला बरेच लांब एक विवर गेले आहे. सरपटण्याचे धाडस केले तरी पुढे भिंत बांधून ते बंद केले आहे पर्यटकासाठी जर अशा गुहा व्यवस्थित केल्या गेल्या तर पर्यटक इकडे पावले निश्चित वळवतील.

बालेकिल्ल्याच्या वायव्य अन् ईशान्य बाजूना माचीची तटबंदी बांधलेली आहे ही तटबंदी मजबूत अशा लॅटेराईट खडकात बांधली आहे. वायव्य माचीतून बालेकिल्ल्याचा उभा खडक अन् पश्चिमेची दरी याचे दर्शन सुखावते.

माचीतून पुन्हा उत्तर बाजूस येऊन वर चढले की पूर्वाभिमुखी दरवाजातून माथ्यावर पोचता येते. पडक्या इमारती अन् उद्ध्वस्त वास्तु यानी आणलेली विषण्णता दक्षिण बुरुजाखाली कड्यात असलेले विस्मयकारक धान्याचे कोठार पाहून नाहीसे होते. पचवीस चौरस मीटर आकाराची एक खोल विहीर अन् त्यातील महादेवाचे छोटेसे देऊळही प्रेक्षणीय आहे.

संतोषगडच्या माथ्यावरून हिरवीगार महादेव राग संतोष देऊन गेली. मध्ये वाऱ्याची खिंड आहे माण तालुक्यातून येणाऱ्या प्रवाशाला डिकसळ गावावरून प्रथम यावे लागते ते या खिंडीतून अन् मगच सतोषगडचे दरवाजे त्याला खुले होतात लष्करी दृष्टचा गडाची उत्तर बाजू भक्कम असली तरी गडाच्या दक्षिण व पश्चिमेला उच टेकड्या असल्यामुळे त्यावरून तोफा डागून सतोषगडचा सतोष महज उद्ध्वस्त करता येत असे १८१८ मध्ये जनरल प्रिझलरने दुर्गावर कबजा मिळविला तो याच मार्गाने. विजापूरच्या आदिलशाहीकडून हल्ल्यांना तोंड देण्यासाठी शिवाजी महाराजांनी हा दुर्ग बाधला असे सागतात १६६६ मध्ये बाळाजी नाईक निंबाळकराकडे हा होता. मध्यतरी तो मुघल अन् आदिलशाही फौजेच्या हातात गेला तरी बराच काळ मराठ्याचे स्वामित्वच त्यावर होते.

सतोषदुर्गाची ईशान्य बाजू कोणाही गिर्यारोहकाला सुखावणारी! अर्थातच तिकडून उतरताना अशोक शिर्के अन् माधव साटम या नवोदितांना मोठाच निःश्वास टाकावा लागला हे सागणे नकोच. लक्ष्मीआईच्या राऊळाकडून लगोलग पूर्व तळात पोचलो मग आंब्याच्या सावलीत अन् ओढ्याच्या काठावरच्या न्याहारीला काही आगळीच मजा होती.

## सीताबाईचा डोंगर

महादेव राग उजवीकडे ठेवून फलटण तालुक्याच्या त्या दुष्काळी भागातली आमची उन्हाळी रपेट आम्हाला चार तासानी सीताबाईच्या डोंगराच्या पायथ्याला घेऊन गेली. चढण फारशी नव्हतीच. सीताबाईच्या डोंगरातून बाणगगा व माणगगा या उत्तर व दक्षिणवाहिनी

नद्या उगम पावतात श्रीरामाच्या आज्ञेवरून लक्ष्मणाने सीतेला इथल्या वाल्मिकी आश्रमाजवळ आणून सोडले अशी कथा सांगतात. इथली एक गुहा व त्यातील मूर्ति वाल्मीकीची म्हणून सांगितली जाते. सीता व राम यांचीही इथे देवळे आहेत देवळासमोरची विशाल दरी, त्यातून झेपावणारे पाणी, अन् झाडीतला गारवा एवढ्या गोष्टींमुळे आम्हां पांथस्थांना घटकाभर थांबविण्याचे सामर्थ्य सीतामाईत निश्चित होते.

एक किलोमीटरवर कळसकरवाडी भेटली बाण खोऱ्यातील मुरबाड शेतानंतर हे हिरवेगार पठार सुखावून गेले ज्वारीच्या शेतां तून तिळाच्या पिवळ्या फुलांनी रांगोळी रेखली होती पालवणच्या पठारावरून दीड तास चाललो तेव्हा कुठें पालवण गाव आले. गावा-शेजारी एक छोटासा तलाव आहे साधारण दक्षिणेला माण खोऱ्यातील दहीवडीजवळचा महिमानगड दिसत होता आणि पालवण पाठी टाकून पायवाटेबरोबरीने बरेच धावलो तरी वारूगड येईना अचानक वाट डावीकडे वळून उतरत गेली

अन् वारूगड झंझावातासारखा सामोरा आला महादेव रांगेतून उत्तरेकडे गेलेल्या दोन दऱ्यामधील टेकडीवर वारूगड उभा आहे. मोठ्या दऱ्यामध्ये दुर्ग अगदीच पिट्टुचा दिसत होता. पण आम्ही डोंगरदांडावरून खाली उतरून गेलो अन् लक्षात आले की हा फक्त बालेकिल्लाच ! खालची माची तर विस्तृत आहे

## मजबूत तटबंदी

दुर्गाची संरक्षणव्यवस्था निःसंशय पाहण्यासारखी आहे दक्षि-णेच्या बाजूला महादेव रांगेशी गड जिथे जोडला गेला आहे तिथे आहे भव्य दरवाजा. दुर्गाच्या पश्चिम बाजूस सरळ तुटलेला कडा आहे. त्यामुळे तटबंदी नाही. तटबंदीची सुरुवात वायव्य कोपऱ्यापासून. यातच फलटण दरवाजा बांधलेला आहे इथून तटबंदी बांधून काढली आहे ती पूर्व बाजूने वेढा घेऊन थेट दक्षिण दरवाजापर्यंत. ही तटबंदी अतिशय मजबूत व घोटीव आहे बालेकिल्ल्याचे दोन भाग. एक धाकला अन् दुसरा थोरला. बालेकिल्ल्याच्या टेकडीच्या पश्चिम अंगाला पुढे आलेल्या भागाला आड भिंत बांधून खालचा किल्ला तयार

केला आहे यातच नैर्ऋत्य व वायव्य बाजूंना दोन भव्य बुरूज आहेत. इथून फलटण व दक्षिण दरवाजे माच्यात आहेत या बुरुजापासून उत्तर–दक्षिण अशा भिंती थेट माचीच्या टोकापर्यंत नेऊन बालेकिल्ल्याला दुहेरी संरक्षण दिले आहे

माथ्यावर बालेकिल्ल्याचा दरवाजा आहे यातून आत गेले की डावीकडे सदरेची इमारत आहे आणि पलीकडे कैदी ठेवण्याची एक अंधारकोठडी व पाण्याची विहीर आहे· माचीतील भैरवनाथाचे मूळ ठिकाण किल्ल्याच्या माथ्यावर दाखविले जाते

फलटणपर्यंतचे खोरे आणि महादेव रांगेकडील दऱ्या यांचे दृश्य भन्नाट वाऱ्यात न्याहाळत असताना वर्तमानकाळ डोळ्यासमोरून फुकरीसारखा उडून गेला होता विजापूरकराशी टक्कर देण्यासाठी शिवाजीमहाराजांनी हा दुर्ग बांधला असे सांगतात १८१८ मध्ये दुसरे बाजीराव पेशवे यांच्याकडून विठ्ठलपंत फडणीस यांनी हा सातारच्या राजांच्या वतीने घेतला व नंतर इंग्रजांकडे तो दिला गेला.


बालेकिल्ल्याच्या दक्षिणेकडून चढलो होतो. पण तिकडून घसाऱ्यावरून उतरण्याचे धाडस केले नाही माचीतील भैरवनाथाचे देऊळ आणि दोन तळी पाहून माचीतच बसलेल्या घोडेवाडीचा निरोप घेतला अन् आमचे त्रिकूट फलटण दरवाजाने 'गिरवी'त धावत पळत घुसले ते शेवटची गाडी गाठण्यासाठी ! गिरवीहून वारुगड अगदी प्रचंड शिवलिंगासारखा दिसत होता आणि त्याचे बलदंडदर्शन घेण्यात आम्ही जरा जादाच वेळ घालवला. त्यामुळे दिवसभर संतोषाच्या वारूवर असलेले आम्ही तिघेजण 'गिरवी'त सरळ कोसळलोच

□ □

# ८. कात्रजहून सिंहगड

## एक खडतर डोंगरयात्रा

सर्वसाधारणपणे खडकवासले, डोणजे गावावरून गाडीने सिंहगडला जाण्याची प्रथा। पण त्यापेक्षा डोंगराच्या शिखरावरून गवताळ पाऊलवाटांचा शोध घेत तिथे जाण्यात काही वेगळीच मजा आहे.




अशीच एक छानशी पहाट होती पुण्यातून आमचे एक त्रिकूट बाहेर पडले अन् पुणे-कोंढणपूर गाडीतून कात्रज घाटातील बोगद्यापाशी उतरले सिंहगड-भुलेश्वर रांगेतील हा कात्रज घाट पूर्वीपासून प्रसिद्ध. घाटाचा जुना मार्ग आहे तो बोगद्यावरच्या खिडीतून। पी डब्ल्यू. डी च्या बंगल्याशेजारूनच या खिंडीत जाण्यासाठी वाट आहे. वर चढलो आणि काही मिनिटातच आमचे षट्पद खिंडीत पोहोचले. खिंडीत एक मोठे झाड आहे. सहा-सात मीटर उंचीची एक जुनी दगडी

चौकी ह्या ठिकाणी आहे. पूर्वी इथे मार्गदर्शन व्हावे म्हणून जाळ पेटवीत असत खिडीतून घाटाची वळणे आणि खोरे फार छान दिसत होते. वनखात्याच्या कुपणाशेजारून बोगदा ओलांडला आणि समोरच्या शिखराकडे निघालो उजव्या बाजूस शिखर आहे असा अंदाज येत होता. डोंगर-उतारावर गवतकापणी चालली होती. वाऱ्याच्या झुळकीने पिवळे धमक गवत डोलत होते. कुपणाशेजारूनच वर चढत गेलो असतो तर शिखर कधीच गाठले असते. पण अशा प्रवासातून एकदा तरी वाट चुकलीच पाहिजे असा अलिखित नियम आहे की काय कोण जाणे ? कुपणाजवळची चढणीची वाट सोडून आम्ही डावीकडच्या बऱ्यापैकी वाटेने वळसा घातला आणि शिखराच्या पूर्वेस आलो

## उभी चढण

ह्या बाजूने डोंगराची चढण एकदम उभी होती. गवताच्या मधूनच भांगाच्या रेषेसारखी दिसणारी एक तांबडी वाट कुठेही वळण न घेता सरळ वरच्या माथ्याला जाऊन भिडली होती. दिसायला अगदीच सोपी ! चढणीला सुरुवात केली पण आमच्या पायाना इतकी चढण नामजूर असावी. अनेक वेळा दोन्ही हाताचे साहाय्य घेऊनही पायानी माघारीचे धोरण स्वीकारले शेवटी कसा तरी धडपडत माथा गाठला ह्याचे नाव 'गोकुळ'. तुफानी वारा होता कोवळे ऊन होते उतरेला कात्रज तलाव ! त्या पलीकडे दूरवर धुक्यात लपटलेली पुण्यनगरी तर दक्षिणेला हिरवट, तपकिरी अन् निळे डोंगर ! आमच्या रसिक मनाने ह्या निसर्गाला आनंदाची पावती कधीच देऊन टाकली. पुण्यातून ह्या सिंहगड-भुलेश्वर रांगेवर नजर फिरविली तर सिंहगडानंतर काही अंतरावर उंच अशी जी दोन लगतची शिखरे दिसतात त्यात डावीकडचे म्हणजे गोकुळ अन् उजवीकडचे वृंदावन

गोकुळची उंची समुद्रसपाटीपासून ११५३ मीटर त्याच्या नैर्ऋत्य पश्चिम दिशेस अकरा किलोमीटर पक्षीमार्ग अंतरावर सिंहगड आहे त्याचा हिरवट, निळसर रंग डोंगर-रांगेत उठून दिसत होता. त्याच्या डाव्या बाजूस, पण पाठीमागच्या रांगेत तोरणा अन् राजगड डोकावत होते. अन् आग्नेयेस पुरंदर-वज्रगड ही जोडगोळी तर चांगलीच स्पष्ट दिसत होती.

शेजारच्या वृंदावन शिखराकडे आम्ही मोर्चा वळविला गोकुळची चढण चांगलीच बागुलबुवा ठरली. कारण पलीकडची उतरण खेळातल्या डोंगरासारखीच होती सकाळचे आठ सव्वाआठ झाले होते. एक छोटीशी खिंड पार केली आणि वृंदावन शिखरावर आलो. सिंहगड दृष्टीसमोर दिसतच होता. त्याच्यापर्यंतच्या सलग रांगेवर टेकड्या मधेमधे आगांतुकपणे उगवल्यासारख्या वाटत होत्या या सगळ्या टेकड्यांचे माथे आम्हाला ओलांडावयाचे होते मधल्या खिंडी ओलांडायच्या होत्या गवताळ पठारे तुडवायची होती. फार वेळ न घालवता वृंदावनच्या दक्षिण बाजूस वळलो. दोन-तीन टप्प्यांतच दीड-दोनशे मीटर खाली उतरलो आणि उजवीकडच्या दवाने भिजलेल्या गवतातून ससेवाडीच्या खिंडीत उतरलो. डावीकडची ससेवाडीची आणि उजवीकडची कोळीवाड्याची, दोन्ही वाटा टाळल्या आणि इतर गोष्टींचा संबंध तुटला. आता फक्त डोंगर रांगच सोबत होती.

निळ्या-हिरव्या डोंगररांगेवर उन्हं पसरू लागली. अनेक प्रकारच्या वनस्पति पहात वाट भराभर मागे पडत होती दोन खिंडी आणि दोन शिखरे पार झाली.

## खंडोबाचा दांड

समोरच उजवीकडे आमच्या रांगेला लंबरेषेत खंडोबाचा दांड दिसत होता. याच्यावर एक धनगरवाडी तर उत्तर टोकावर खंडोबाचे मंदिर आहे डोंगरमाथ्यावरची सपाटी सुरू झाली. पुण्यावरचे धुके विरून गेले होते, पण वाट विरली नव्हती. खंडोबाचा दांड एकदोनदा चांगलाच फसवितो. एखादी खिंड पार केली की वाटते आलाच तो दांड. पण शिखर गाठले की दांड पुन्हा दूर पळायचा शेवटी या पाठशिवणीत आम्ही मात केली अन् खंडोबाचा दांड मागे टाकून दोन बारक्या खिंडी व शिखरे पार करून खोल उतरण्यास सुरवात केली. डोंगरी आवळे तोंडात टाकून भराभरा चिंचोळ्या खिंडीत आलो. इथून डावीकडे सणसवाडीकडे तर उजवीकडे नांदोशीकडे वाटा धावतात

खिंडीत थंडाई होती. पण वेळ काही थंडावला नव्हता. साडेदहा वाजले होते. उन्हाशी चाल वाढत होती आणि आमची मागे पडत

होतो. पाऊलवाटा धुंडाळत तर कधी काटथाकुट्यातून मार्ग काढीत बरेच वर चढलो आणि ११२५ मीटर उचीचे शिखर गाठले खडक-वासल्याचे धरण आणि निळा जलाशय दिसू लागला त्याच्या पार्श्व-भूमीवर राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिकेची तपकिरी इमारत उठून दिसत होती

सिंहगड आता टप्प्यात आला होता. पण नजरेच्याच! कारण पायाना, आलो होतो तेवढेच अंतर आणखी जायचे होते.

## गर्द झाडी, भयाण दऱ्या

पुढले लक्ष 'मुक्तुग'! तिथले झाड दिसत होते पण तिथे जाण्या-साठी जी खिंड पार करावी लागणार होती ती पार तळातली. साडे-अकरा वाजले अन् आम्ही खिंडीत पोचलो तसे आम्ही फारसे अतर चाललो नव्हतो. पण चढउतार इतके झाले होते की पाय गळाठले होते. वाटेत पाणी कुठेच नसल्याने वॉटरबॅगमधले पाणीही सपायला आले होते ह्या खिंडीत एक शेंदूरदेव आहे — कोळीबाबा! ह्या सीताबाईच्या खिंडीतून डावीकडे आर्वीला व उजवीकडे डोणज्याला जाणाऱ्या वाटा आहेत झाडी आणि भयाण दऱ्या यामुळे इथे रात्री श्वापदाची स्नेहभेट निश्चितच होत असणार.

मुक्तुगला पोचलो तेव्हा आम्ही १०५६ मीटर उचीवर होतो. या शिखरावर एकच एक झाड आहे, शिखराच्या नावाला साथ देणारे — अलिप्त अन् मुक्त. पण वसत जोशी, अश्वि काणे अन् मी, आम्ही तिघानी त्याच्या अलिप्ततेचा भग केला होता.

झाडाची सावली पूर्वेकडे वाढू लागली आणि आम्ही कूच केले. पाऊस कमी झाल्यामुळे इकडल्या भागांत दरवर्षी हत्तीएवढ्या उंचीला वाढणारे गवत अगदीच खुरटे दिसत होते. सिंहगड अन् आजूबाजूच्या दऱ्या मात्र दणदणीत दिसत होत्या. खालच्या खिंडीत उतरलो. मुक्तुगाशी असा भास झाला होता की खिंडी — शिखरापासून आमचा मार्ग मुक्त झाला, पण पुढचे शिखर चढलो तरी पुन्हा एक खिंड अन् शिखर हाजीर झाले.

सिंहगडवर जाणारा गाडीरस्ता अन् धारजाईचे देऊळ दिसू लागले अन् आम्ही समोरची खिंड व शेवटचे शिखर पार करून सव्वाच्या सुमाराला धारजाई देवळाशी रस्त्याला मिळालो. तिथून तासाभरातच आमची सात तासांची वाटचाल संपली.

तेरा-चौदा शिखरांचा, पाच-सात खोल खिंडींचा अन् सततच्या चढउतारांचा हा मार्ग शारीरिक श्रम आणि पायी चालण्याची कसोटी घेणारा आहे आणि हा मार्ग तुडवल्यावर देवटाक्यातले जल हे 'जीवन' आहे हे मनोमन पटते

□ □

# ९. भीमा ते इंद्रायणी

रानवहाणांचे बंद कसेपर्यंत गाडी एक गचका देऊन थांबली. फलाट कर्जत स्थानकाचा होता. बाकड्यावर पसरेपर्यंत गाडी मुंबईकडे पसार झालीही!


सकाळचे ७॥! कोकणच्या दमट हवेनें लवकर जागविले होतेच. त्यामुळे कशेळेला जाणारी एस. टी पकडणे अवघड गेले नाही.

कर्जतला लगटून जाणारी उल्हास नदी केव्हाच पार झाली. सह्याद्रीची रांग उजवीकडे अनंत लांबीत पसरली होती. राजमाचीचे दोन जुळे दुर्ग अन् ढाकचा भला मोठा डोंगर हे त्यात ठळक!

खांडसची गाडी साडेअकराला! तेव्हा तुंगीकडची वाट धरली. भीमाशंकरला पुण्याहून सरळ मार्गाने एस. टी. गाडी आहे. पण सह्य घाट चढणे, उतरणे ही महाराष्ट्राच्या आरोहणातील एक सुखावह बाब. तेव्हा भीमा-इंद्रायणी ही मावळातली पायपीट करण्यासाठी बाहेर पडलो ते थेट कोकणात पोचलो.

पावसाळा नुकताच संपत आलेला. त्यामुळे नद्या भरारलेल्या. चिलार ही वाटेत भेटलेली पहिली नदी ओलांडल्यावर वरच्या अंगाला किकवी गाव. पण गावात जायची गरजच नव्हती. चिलारच्या उजव्या तीराच्या सान्निध्यातच वाट उजवीकडे फिरली चिंचेच्या एका वृक्षाखाली पाठीवरचे पिट्टू उतरविले.

चिलारचे खोरे साजिरे दिसत होते खोऱ्याच्या दक्षिणेला पेठ किंवा कोठलीगड, अन् उत्तरेला तुंगी. कोठलीगडचा कातळ मनोरा हग भेदत होता. पेठजवळून नाखिंदा व फेणादेवी घाट. हे घाटावर सावळ्याकडे जातात.


भीमा नदी
घाट
तुंगी
कोठळीगड
तांबडवाडी
भामा नदी
सावळे
खांड
आंध्र तलाव
कुसूर
कुंडली नदी
बहिरी गुहा
कुंडलेश्वर
वळवंड
शिरवटे तलाव
कर्जत
उल्हास नदी
दुर्ग राजमाची
कार्ले पठार
वळवण तलाव
तुंगार्ली
पुणे
खोपोली
लोणावळे
गाव
देऊळ
गाडीरस्ता
पदमार्ग
ओढा, नदी
डोंगररांग
दुर्ग
— आ वा पाळंदे

पिट्टू उचलून पुढे निघालो तेव्हा डावीकडच्या उचवट्यावर शेलारवाडी तोंड दाखवून गेली.

आम्हींचे धोतरा गाव आले तेव्हा उन्हे भाजायला लागली. कोंकणची सपाटी सोडून आम्ही सह्यकुशीत आलो होतो. तुंगीचा डोंगर म्हणजे एक छोटेसे त्रिकोणी शिखर. त्यापलीकडे माथ्यालगत तुंगी गाव वसले आहे. तुंगी रांग जिथे सह्याद्रीला भिडते तिथे एक ताशीव टेकडी लक्ष वेधते. त्याला कलावतिणीचा महाल म्हणतात. भीमाशंकरची वाट त्या जवळूनच आहे. मार्ग व्यवस्थित, त्यामुळे कुणी स्थानिक दर्शक न घेता तुंगीची वाट धरली.

भाताची शेते गेली. सागाच्या सावलीतून चढण, पण माथा गाठेपर्यंत दमट हवेने चांगलेच दामटवले. पाठीमागे झाडोऱ्यानी भरलेल्या टेकड्यानंतर पश्चिम क्षितिजावर दुर्गांची मालिका लक्ष वेधून गेली–इरसालगड, माथेरान, पेब, चंदेरी, म्हसमाळ, मलंगगड.

धनगरवाड्यावर थंड ताक रिचवले व तुंगी गावात पोचलो. उत्तरेला सिद्धगड व ईशान्येला भीमाशंकरच्या पहाडाने मिटल्या डोळ्यावरची झोप उडवली.

सह्याद्रीची घडण इकडे जरा वेगळी आहे. तळापासून माथ्या-पर्यंत सलग कड्याऐवजी मध्यभागी एक 'पदर' आहे. याची रुंदी जेमतेम २० मीटर. पदराच्या एका अंगाला तुटलेला कडा व दुसऱ्या अंगाला उभारलेला पहाड.

तुंगीपुढची वाट अशाच पदरातून भीमाशंकरच्या तळात गेली आहे. त्या तळातील दोन वाड्या नजरेसमोर ठेवल्या व उतरणीवरून तुंगी रांगेचा शेवट गाठला. झाडीतून उजवीकडे खाली 'टेंबरे'कडे जाणारी वाट आम्हांला चकवू शकली नाही आणि आम्ही कलावति-णीच्या महालाखाली आलो. हे एक ५० - ६० मीटर उंचीचे शिखर. सगळीकडून तुटलेले कडे. वरती एक गुहा. याला पदरगडही म्हणतात.

पदराच्या पहिल्या वाडीत एकमेव घर. खाडसहून गणपतीचा घाट येतो.

एक मोठे वळण थेट ओढा पार करून दाट राईतील लांब वाट भीमाशंकरच्या नागफणी टोकाखालून गेली. तेव्हा दुसरी वाडी आली. खाडस व या वाडीमध्ये शिडीची वाट आहे.

तळातील 'खांडशी'नदीचे खोरे पिवळ्या भाताच्या शेतांनी मढविले होते. त्यामागे सिद्धगड निळसर हिरवा झाला होता

दाट जंगलातील सपाटी पुन्हा एक कष्टदायक चढण व घाटमाथ्यावरची थंडी बोचू लागली. पाय अक्षरशः फेंगाडत भीमाशंकर गाठले उंची १०५१ मीटर

त्रिपुरासुराशी केलेल्या कष्टमय द्वद्वानंतर शिवशंकर इथली स्वर्गीय सृष्टि निरखण्यासाठी विसावले आणि राजा भीमकाच्या मागणीनुसार निथळणाऱ्या घामातून त्यांनी इथून भीमा नदी निर्मिली अशी पुराणकथा आहे.

हे श्रमजल सुमारे ६०० कि मी जमीन सुफलित करीत रायचूरजवळ कृष्णेला मिळते. भीमेचे उगमस्थान म्हणजेच भीमाशंकर ! भारतातील प्रसिद्ध अशा बारा ज्योतिर्लिंगांत ह्याची गणना होते

शिवमंदिर वास्तुशास्त्राच्या दृष्टीने कलात्मक काळ्या पाषाणातील हे मंदिर नाना फडणविसांनी उभारले. देवळाचा सभामंडप पुण्याचे सावकार भिडे यांनी बांधला सध्या दीपमाळेनजीक ठेवलेल्या शिळेवर यासंबधीची नोंद आहे. स्वतिश्री नृपशालिवाहन शके १६१३ पिंगलनाम संवत्सरे मंडप सिद्ध, सेवक त्रिमणाजी अंताजी नाईक भिडे सावकार

दीपमाळेनजीक इ. १७२७ ची एक पोर्तुगीज घंटा आहे. भीमाशंकरला पुण्याहून येणाऱ्या एस टी. गाड्या नाशिक हमरस्त्यावरील 'मंचर हून येतात. स्थानकाजवळ पंचायत समितीची धर्मशाळा व टेकडीवर जंगलखात्याचे विश्रामधाम आहे कोकणातील मुरबाड तालुक्यात जाणारा रानशीळ घाट इथूनच सुरू होतो. मंदिरापासून भीमेच्या काठाने सकाळी प्रवास सुरू केला

रानातून मोकळवणात आलो गौराईचा ओढा ओलांडला समोरची वाट 'भोवरगिरी कडे जाते. तिथून 'वाडे'वरून राजगुरुनगरला जाता येते.

आम्ही वळलो ते उजवीकडच्या रानात ! व्यवस्थित तयार केलेला मार्ग, दगडानी आखून दिलेला. चार-पाच नद्यांची खोरी ओलांडीत ही वाट इंद्रायणी खोऱ्यात जाते ती लोणावळ्यापर्यंत. शिव-कालात ही वाट तयार होण्याचे प्रयोजन दिसत नाही. इंग्रजी राजवटीत हा मार्ग तयार केला गेला असावा.

'कारवी' निळ्या फुलानी बहरली होती. भीमेच्या खोऱ्यावर त्याची छाया पडली होती. सुरेख लयीत वळसे घेणाऱ्या नदीला डोंगर-दादांनी किंचित् मागे झुकून दंडवत घातले होते. वातावरणात धूसर डोंगर मिसळलेले होते. निःसशय चित्रणीय !

सुमारे तासाभराची वाटचाल. झाडीचे टप्पे अन् मैदानानी आमची पाठ पुरविली. मैदानात सह्यमाथ्यावरचे ढग वारा पिऊन धायचे त्या वाऱ्यात मिसळत होते पक्षीकूजन कोनबाल, तांबट, जगल बार्बेट अन् असेच.

खरपूडच्या धनगरवाड्यावर मिळालेल्या ताज्या दुधाने पायाना गति आली तरीही एक तास गेला ओढे ओहोळातून, चढणी उतरणी-वर दमत, शिंग कोंडेश्वर रांगेतील खिंड गाठली, वाटेत दोन शिखराचे 'शिंग' शिखर क्षणकाल दिसले अन् हळूच दिसेनासे झाले. ही रांग राजगुरूनगरपर्यंत भीमा व भामा या नद्याचे पाणी विभागते.

'तांबडवाडीत' धडाधड उतरलो इथून नैऋत्येला वरसुबाई रांगेतील वांदरखिंड दिसली. त्या अलीकडे एका टेकडीवर वांद्रे गाव झाडीतून उचावले होते.

हा भाग स्वस्त व मस्त खव्यासाठी प्रसिद्ध पण खव्याची तहान ताकावरही भागवायला मिळाली नाही. सर्व दूध केंद्रावर जाते म्हणे.

मनावर अन् शरीरावर आलेली मरगळ कुठे घालवावी या विचारात वांदरखिंडीतील पाच टाकी नजरेसमोर आली. पाण्यात हुदडायच्या कल्पनेने भारूनच आम्ही पुढची वाट धरली विजय महाजन नेहमीच पुढे असतोय पण बाळ जोशी अन् निंबाळकर दिलीपही आता वारा प्यायल्यासारखे सुटले.

भामा नदी पार झाली. हिच्या उगमापासून वाजंत्रा घाट कोकणात जातो. त्यात एक अवघड निसणी आहे

वादरखिंडीची रांग मावळच्या सपाटीतून चांगलीच उचावली आहे झाडीची दाटी वाढत गेली. लाकूडतोड्याचा खटखट आवाज अस्पष्ट झाला तालबद्ध पावलांनी खिंड जवळ येऊ लागली. पाठीमागून एक प्रचंड काळा ढगही वेगाने खिंडीकडे सरकत होता.

ढगानेही खिंड ओलांडली अन् क्षणार्धात टपोऱ्या थेंबांनी सगळी दरी भरून गेली. दूरवर दिसणाऱ्या आंद्रा तलावाला मिळण्यासाठी पायतळीच्या वाटांवरून धो धो पाणी वाहू लागले. आमचा थकवा त्यात केव्हाच मिसळला गेला खिंडीपलीकडे आंद्रा खोरे उघडे झाले. खिंडीखाली डावीकडे पाच टाकी. आणखी थोडे खाली दरीच्या डावीकडे एक वाट जाते मुख्य ओढा ओलांडून माळेगावकडे तिथून पडाव्यातून वडेश्वरकडे जाता येते. आम्ही अर्थात् उजवीकडची वाट धरली मावळचाकडे जाणारी.

पाऊस आला तसाच विरला. तोपर्यंत निथळत्या अवस्थेत रान संपवून आम्ही मोकळ्या सपाटीवर आलो होतो. सपाटी अगदी सह्याद्रीच्या धारेवरची. हाताच्या अंतरावर कडा दिसल्यावर तिकडे डोकावयाला कुणी ढकलावे लागलेच नाही.

वर्णनातीत स्वच्छ दृश्य ! उत्तर, वायव्येला सह्य पर्वतीय रांग तावडे धबधबे फेकीत उभी होती हिरवट तपकिरी करडा अन् निळा अशा त्रिविध रंगांनी कातळकडे व दऱ्या रंगल्या होत्या. आकाशाने गडद जांभळा रंग पसरवून त्यांना ओला स्पर्श दिला होता

वरसुबाई रांगेचे नाखिंदा टोक चांगलेच उंच दिसत होते त्यापाठीमागे अस्पष्ट राखी रंगात भीमाशंकर व सिद्धगड, नाखिंद्याजवळ खाली कोठळीगड मुष्टी उभारून होता पलीकडे 'तुंगी' वर एकटा ढग टकरा देत होता

कोठळीगडला पेठ घाट जातो वरसुबाई रांगेच्या दक्षिणेकडून अंधारी घाट एका ओहोळात दडला आहे.

केवळ भिजल्या कपड्यांच्या बोचऱ्या थंडीनेच माघारी वळलो. नैऋत्येला क्षितिजावर धाक दुर्गापासचे दोन कातळमनोरे पहात 'सावळे' गाव लवकरच आले

आंद्रा खोऱ्यातील हे शेवटचे गाव. कोळंबी (भाटी), फेणादेवी व सावळे ह्या तीन घाटवाटा इकडे आहेत.

एक तासाची चाल अन् 'खांड' गाव आहे. टाटा कंपनीने भिवपुरी, विद्युत केंद्रासाठी इथून पाणी नेले आहे.

तिसऱ्या दिवसाची पहाट. लोणावळे आता ७-८ तासांच्या अंतरावर. अजून दोन खोरी पार व्हायचीत. पहिले लक्ष्य कुसूर.

गाडीरस्ता तलावाकाठाने गेलेला. शांत पाण्यात डोंगरझाडीचे प्रतिबिंब. सोनेरी कडांचे तुरळक ढग आणि एखाद्या पक्ष्याचा आवाज शांतता थरथरविणारा अशा संगतीत एक घटिका गेली. कुसूर गाव आले 'मोरमारे' घराणी जास्त. मस्त दूध व शिळ्या पोळ्या असा झकास नाष्टा. अन् पुढच्या वाटेवर निघालो.

ओल्या गवताची वाट भिरभिरणाऱ्या गोल दऱ्यापलीकडे धाक दुर्ग सह्याद्रीपासून फटकून बसला होता. त्यामागे राजमाची दुर्ग पाठीमागे कुसूरजवळ कुसूर घाट भिवपुरीला जातो. ताथवड्याच्या रानातून वैजनाथेकडेही एक वाट उतरते.

अर्ध्या तासात कुसूरच्या पडळीवर आलो. लख्ख उन्हात पुन्हा एकदा सिद्धगड, भीमाशंकरपर्यंतचे विस्तृत दृश्य अन् आंद्रा तलाव, वादर खिंडीच्या खुणा दोन दिवसाच्या पायपीटीची आठवण करून गेल्या

आठवणीत हरवलेलो बाहेर आलो ते एक, म्हाताऱ्याच्या रोकड्या बोलांनी—आमची मानसं काय एकेक बब व्हती! मोठाला रुंद छात्या! जाड तरवारी पेलायची! पण आता काय राहयल नाय! पैका नुसता पैका! त्योपण कागदी! सर्व दूध केंद्राला घालतात. पोरास्नी काही नाही.

खरच दादा तुमच! असे म्हणत पिट्टू पाठीवर टाकली. शिरदे पठाराची ही रांग आंद्रा व कुंडली खोरी विभागते. पठारी मार्ग रुंद व आखीव.

बराच काळ माजलेल्या रानात लपाछपीचा खेळ खेळून झाडीतून डोकावले. पुन्हा एकदा सहयकडा सापडला. उजवीकडे धाकचा ताशीव कडा खाली कुडली खोऱ्यातील देऊळ सामोरे ठेवून उतरू लागलो. पण काटेरी वेली व कारवीशी चांगलीच झटापट झाली खोऱ्यात उतरल्यावर जाभुळी गावचा वाडा भेटला व वाटही कुंडलेश्वर महादेवाकडे घेऊन गेली

देवळाच्या जुनेपणाची खूण त्याची बाधणीच सांगून गेली. देवळाशेजारी कुडली वळवड पठाराने उगम पावून फेसाळत कातळावरून उड्या घेत होती. त्यातील डोहातून मनसोक्त डुबून घेतले. हा थंडावा मग पुढची चढण चढेपर्यंत पुरला अन् वळवडपर्यंतचे अंतर आम्ही अक्षरश धावतच काढले. वाटेत मांजरसुभा, राजमाची, व खंडाळघाचे नागफणी सतत दृष्टीस पडत होते.

वळवड गाव शिरवटे तलावाकाठी वसले आहे. वळवडहून 'दारचा माळ' वाट कोकणात उतरते.


वळवडच्या बहिरोबापुढे मान लवविली व पुढे निघालो अगदी साधा राजमार्ग उजवीकडे राजमाचीचे जुळे दुर्ग न्याहाळावे त्या पुढच्या उल्हास खोऱ्याच्या नागफणीपर्यंत पसरलेल्या कातळदऱ्याची खोली अजमावी किंवा डावीकडे सोबत करणाऱ्या कार्ले पठाराचे ४०–५० मीटर उचीचे काळे कडे पाहावेत बस्स ! दरीपलीकडे अग्निरथ जसा वानर टेकडी, गभीरनाथवरून कर्जतकडे टेचात चालला होता तसेच आम्हीही मस्तीत चाललो होतो.

डावीकडे तुगार्ली खिडीने ही मस्ती चागलीच जिरविली. भीमा भामा, आद्रा, कुडली मागे गेल्या, इद्रायणी समोर आली. लोहगड, विसापूर, तुग, तिकोना ही दुर्ग चौकटी क्षितिजावर स्वागत करीत होती. वलवहण व तुगार्ली तलावांच्या निळया पाण्यातील तरंग लोणावळ्यापर्यंतच्या तासभराच्या वाटचालीत पुन्हा एकदा समाधान देऊन गेले.

□ □

# १०. गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून

महाराष्ट्र अनेक निसर्गरमणीय स्थानांनी नटलेला आहे पण त्या सर्वांत, प्रवाशांच्या हृदयात अढळस्थान प्राप्त करून घेतलेले स्थान म्हणजे महाबळेश्वर ! महाबळेश्वरचा विस्तार इतका प्रचंड आहे की रौद्र, भीषण कडे, मैलोगणती पसरलेले घनदाट अरण्य, खोल धबधबे, प्रचंड मैदाने, सुरेख दृश्यांची पखरण करणारे शैलबाहू अशा प्रकारचे वैचित्र्य येथे पाहण्यास मिळते. इथे जुन्या महाबळेश्वरासारखे धर्मक्षेत्र आहे, तर इथून जवळच म्हणजे पश्चिमेस आहे हिंदवी स्वराज्य रक्षणार्थ शत्रूसैन्यावर तुटून पडणाऱ्या मावळ्यांच्या घोड्यांच्या टापा ज्या गुहेत गरजल्या ती वाघाची गुहा 'जावळीचे खोरे !' आणि प्रौढप्रतापी शिवरायांचा प्रथम पराक्रम जगाला दिमाखाने दाखविणारा आणि देवी भवानीचे मांगल्य अभिमानाने मिरविणारा प्रतापगड !



पुणे-महाबळेश्वर एस. टी. ने लिंगमळा थांब्यापाशी उतरलो. पाठीवर लष्करी पिशव्या, पाणपिशव्या चढवल्या आणि केट टोकाच्या रस्त्याने प्रवास चालू केला. मुख्य रस्त्यापासून हे टोक २–२॥ कि मी. आत आहे परंतु नागमोडी शानदार रस्ता, आजूबाजूची गर्द झाडी आणि थंड हवा यांमुळे फारसे श्रम न होता पाऊण तासात टोकावर आलो इथे आले की कृष्णेचे खोरे दिसू लागते. वायव्येस अफाट पसरलेल्या झाडीत मध्येच एखाद्या दिव्याप्रमाणे चमकणारे क्षेत्र महाबळेश्वर दिसते तर समोर म्हणजे ईशान्येस कमलगड, पांडवगड, मांढरदेव यांचे दृश्य मोहून टाकते आणि खाली छोटी छोटी गावे आणि जंगल यातून वाट काढीत जाणारी कृष्णा नदी दिसते. नदीवरील 'धोम्यसागराचे' दृश्य वर्णनातीत. अगदी टोकाशी ३० मीटर उंचीचा मोठा खडक असून त्यात एक मोठे आरपार भोक निर्माण झाले आहे. टोकापासून जरा दूर उजवीकडे जाऊन पाहिले असता त्याची चांगली कल्पना येते सृष्टीचा हा चमत्कार मोठा अजब खरा ! ह्या टोकाचे मूळ नाव नाकेखिंड' पण नंतर सर माल्कमसाहेबांच्या केट नावाच्या मुलीचे नाव ह्या टोकाला देण्यात आले. ह्या टोकाच्या अलीकडून कृष्णेच्या खोऱ्यात एक वाट उतरते. ह्या वाटेने खाली उतरून नतर कमलगडला जाता येते.

## लिंगमळा धबधबा

केट टोकावरून परत मुख्य रस्त्याला आलो आणि लिंगमळ्याच्या वाटेला लागलो. वेण्णा नदी पार करून तिच्या उजव्या बाजूने लाल धुळीने माखलेल्या रस्त्यावरून सुमारे एक वाजता लिंगमळा बंगल्यापाशी पोचलो बरेच खाली उतरून गर्द झाडीतील रस्त्याने जायला लागताच धबधब्याचा गंभीर आवाज कानी येऊ लागला पुढे गेल्यावर झाडी संपून वेण्णेचे चिंचोळे खोरे दृष्टिपथात आले आणि डावीकडे सुमारे १२५ मीटर खोल अविरतपणे कोसळणारा जलप्रपात दिसला भान हरपून आम्ही वेड्यासारखे बघतच राहिलो; कॅमेरा डोळ्याला लावला पण क्लिक करणेच विसरून गेलो इतके ते सुंदर दृश्य ! पावसाळ्यात तर इथे बहार उडत असेल.

लिंगमळा धबधबा दृष्टीआड झाला तरी डोळ्यासमोर त्याचे दृश्य तरळतच होते डावीकडच्या दोन तीन वाटा सोडून एका छोट्या वाटेने डावीकडे वळलो भर दुपारच्या कोवळ्या उन्हात सतत अर्धा-पाऊण तास चढून महाबळेश्वरातील सर्वांत उच्च जागी, विल्सन टोका-वर आलो सायंकाळी पाच वाजेपर्यंत नहर ऊर्फ पेठेत आलो. मुंबई टोकावर सूर्यास्त पाहून परत येऊन मुक्काम केला.

## 'टायगर पाथ'वरून

दुसऱ्या दिवशीची पहाट. गारठा चांगलाच होता. दरवाजा उघडला की वाऱ्याचा प्रचंड झोत आत यायचा आणि कंदील फडफडायचा. अथरूणातून कसेबसे बाहेर पडून सामानसज्ज झालो. पाच वाजताच कूच केले. दात थडाथड वाजत असतानाच, 'थंडी बिंडी कुछ नहीं' वगैरे राष्ट्रभाषेतल्या शब्दांच्या जोरदार फैरी झडत होत्या मुंबई टोकाचा रस्ता सोडून 'टायगर पाथ'ला वळलो. पहाट नुकतीच उमलत होती. झाडीमुळे आजूबाजूचे काहीच दिसत नव्हते. अपेक्षा होती की वाघ नाही, निदान त्याची पावले तरी दिसावीत पण काहीच नाही. बरेच अंतर चालून 'फॉकलड' टोकावर आलो कोयनेचे विस्तृत खोरे एकदम सामोरे आले डावीकडे बॉबिंग्टन टोकाचे कडे आणि समोर मकरंदगड दिसत होता यानंतर कॉरनॅक टोकावर गेलो पूर्वेकडून सूर्य हळुहळू डोके वर काढीत होता त्यामुळे मकरंदगडावर सोनेरी किरणे पडून दृश्य आल्हाददायक दिसत होते तिथून हलावेसे वाटत नव्हते. पण प्रतापगडच्या वाटेला लागायचे होते ना!

मुंबई टोकावर आलो. काल सूर्यास्ताच्या वेळी गर्द छायेत निस्तेज भासणारे कोयनेचे खोरे आज मात्र सूर्यकिरणांचे सोनेरी पाणी मिळाल्याने तजेलदार दिसत होते. खाली दिसत होते झाडीत लपलेले 'मेट तळे' गाव अन् त्याला लगटून जाणारा आंबेनळी घाटाचा डांबरी रस्ता मध्येच चमकत होता. त्यापलीकडे कोयनेची घळई आणि नंतर डोंगराच्या कुशीतले 'पार' गाव उजवीकडे लॉडविक, एल्फिन्स्टन टोकाचे कडे तर डावीकडे मकरंदगड दिसत होता. आणि समोर दिसत [illegible] काळी हिरवी चिरेबंदी छाती पुढे काढून उभा असलेला

प्रतापगड !

# रडतोंडी घाट

पिट्टू पाठीवर नीट बांधून घेतले मुंबई टोकाच्या डावीकडच्या वाटेनें जंगलात घुसलो आणि खाली उतरण्यास सुरवात केली वाट चांगली ऐसपैस ! दगड रचून केलेल्या पायऱ्या ! उतार अतिशय बेताचा. उधाण आल्यागत धावत सुटलो डांबरी रस्ता ओलांडून पुन्हा झाडीतल्या वाटेने सुमारे पंधरा मिनिटात 'मेट तळे' गाठले वर बघितले तो काय ? हिरव्यागार झाडीत मुंबई टोक कोठे हरवले होते कोणास ठाऊक!

मेट तळे सोडून डांबरी रस्त्याने थोडी वाटचाल केली आणि तळाशी जाण्याच्या दृष्टीने रस्ता सोडून रानातील पाऊलवाट धरली प्रतापगडला जाण्यासाठी डांबरी रस्त्यावरील जन्नीच्या देवळापासून एक वाट आहे हिचे नाव 'गडगडी' पण आम्ही चाललो होतो ती वाट म्हणजे रडतोंडी घाटाची ! शिवाजी महाराजांना पकडण्यासाठी विजापूरहून निघालेला अफझलखान कोयनेच्या खोऱ्यात उतरला तो याच रडतोंडी घाटाने. खानाचे प्रचंड सैन्य, लवाजमा हत्ती–घोड्यांच्या पलटणीच्या पलटणी खाली उतरल्या त्या याच वाटेने

ह्या घाटाचा उतार अगदी कमी पण वृक्षराजी मात्र अतिशय निबिड. अस्वलीच्या अंगावरच्या केसाप्रमाणे झाडे खेटून असल्यामुळे रानाची नुसती रस्सीखेंच चालल्यासारखी वाटते आकाशाचा तर पत्ता लागत नाहीच पण खालची जमीन, तीसुद्धा पालापाचोळ्याने, वेलींनी झाकून गेलेली. जांभूळ, आंबा, हिरडा, बेहडा, वारसे, रिठा आणि कितीतरी काटेरी वेलींच्या जाळ्या घट्ट बसल्या आहेत वाट सोडून रानात घुसू म्हटले तर अंगावरच्या कपड्यांच्या चिंध्याच होतील जंगलतोड चालली असताही आता इतकी झाडी, तर पूर्वी किती भयानक असेल याची कल्पनाच करवत नाही अफझलखानाला हत्ती–घोड्यांसकट आपले प्रचंड सैन्य या घाटाने उतरविताना अक्षरश: रडायची पाळी आली असणार आणि म्हणूनच याला नाव पडले असावे **रडतोंडी** घाट.

नाकासमोरच्या पाऊलवाटेने पक्ष्याचे मधुर कूजन श्रवण करीत झपाट्याने आम्ही कितीतरी खाली उतरलो. एखादा घसरून आपटला की हसू फुटत असे अन् तेवढ्यात दुसरा कोणी घसरायचा अशा तऱ्हेने सुमारे नऊ वाजता तळाशी पोचेपर्यंत प्रत्येकाची आपटी खाण्याची पाळी एकदा तरी येऊन गेली. गवतावर पडलेल्या दवामुळे पाय भिजून गार पडले झाडी संपून तापोळे-कुभरोशी रस्त्यावर पाऊल ठेवले. 'पार'च्या दिशेने चालू लागलो

## कोयनेवरचा जुना पूल

कोयना नदी ओंजळी भरभरून पाणी घेऊन समोर आली. सुटकेचा श्वास सोडला. समोर एक अजूनही भक्कम उभी असलेली जुनी वास्तु आम्हाला कोयना पार करून देण्यासाठी सज्ज होती. हा दगडी पूल शिवकालात अथवा त्यापूर्वीही बांधला गेला असावा. विश्वास दीक्षितची अभियांत्रिकी दृष्टि पुलाचे तंत्र जोखू लागली या पुलाला चार कमानी आहेत. ज्या बाजूने कोयना वहात येते त्या बाजूला मत्स्य आहेत. यामुळे पाणी कापले जाऊन पुलावर ताण येत नाही. पुलाशेजारीच एका त्रिकोणी देवडीत गणेश मूर्ति आहे. नदीचे पाणी या ठिकाणी इतके कमी आहे की याचाच पुढे हेळवाकजवळ प्रचंड शिवसागर झाला आहे यावर विश्वास बसायचा नाही.

गार पाण्याने ताजेतवाने होऊन पूल ओलांडला उजवीकडील कुभरोशीला जाणारा रस्ता सोडला आणि एक दरड चढून नंतर थोड्याच वेळात 'पार'ला येऊन पोचलो. पाच-दहा घरकुले असलेली तीन गावे इथे आहेत पेठ पार, पार पार आणि सोंड पार. 'पार'ला जुन्या काळी अतिशय महत्त्व होते. सातारा-महाड या जुन्या मार्गावरील पारघाटाचे 'पार'हे नाके दस्तुरखुद्द अफझलखानाचा तळ या पारलाच होता इथल्या रामवरदायिनी देवीची महती फार आहे. प्रतापगडावरील भवानीपेक्षाही ही प्राचीन

## रणभूमि प्रतापगडची

सोंडपारापाशी आलेल्या डोंगराच्या सोंडेवरून गड चढण्यास सुरुवात केली. इथली झाडी तोडली असल्याने उन्हाचा त्रास होत होता.

अध्यापाऊण तासातच अफझलखानाच्या कबरीपाशी येऊन पोचलो. प्रतापगड मोठ्या डौलाने छाती फुगवून खडा होता. श्रीधर गद्रे रसायनशास्त्रज्ञ पण त्यांचे शिवप्रेम इतिहास बोलू लागले मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी, शके १५८१ (१० नोव्हेंबर, १६५९) पार आणि जावळी येथील अफझलखानाचे सैन्य आनंदात सुस्तावून पडले होते रानातल्या झाडाझाडावर मराठे नग्या तलवारी घेऊन गुपचूप बसून होते. झाडांची पानेही हलत नव्हती हल्लीच्या कबरीच्या जागेवरच भव्य शामियाना उभारला होता. दुपारच्या वेळी अफझलखानाची आणि शिवाजी राजाची भेट झाली.

पूर्वनियोजित कटाप्रमाणे अफझलखानाने दगा केला पण शिवाजी महाराजांनी सावधपणे डाव उलटविला आणि खानासच ठार मारले.

तोफेच्या इशाऱ्याबरोबर अशी काही विलक्षण जादूची कांडी फिरली की प्रतापगडचे, पारचे, जावळीचे, महाबळेश्वरचे रान नुसते हलून उठले. 'हरहर महादेव' या अस्मान फाडून टाकणाऱ्या गर्जनेने भूमि हादरली झाडाझाडावर पुतळ्यासारखे निश्चल बसलेले बिलंदर मावळे चित्त्यासारख्या झेपा टाकीत खानाच्या सैन्यावर कोसळले खानाच्या प्रचंड सैन्याचा चुराडा झाला. मराठी तलवारीतून ती शक्ति ती चेतना ह्या भूमीतल्या दगडाच्या गाभ्यातून, झाडाच्या बुध्यातून खोलवर जाऊन बसली रडतोंडी घाटाने, दरडीवरून, रानातल्या काटेरी जाळीमधून मार्ग काढीत गेले म्हणजे ती स्फूर्ति, तो चेतनेचा अखंड स्रोत गवसतो.

कबर पाहून दुपारी १२ वाजता गडात प्रवेश केला. गडाला तटावरून प्रदक्षिणा घातली.

भवानी देवीची आरती झाल्यावर गडावरच रात्री मुक्काम केला. इथे मुक्काम करणे ही एक अपूर्वाईच महाबळेश्वरचे लुकलुकणारे असंख्य दिवे आणि घाटातील झाडीतून प्रकाशझोत टाकणारे मोटारींचे दिवे यांची गमत अपूर्वच.

तिसऱ्या दिवशीची पहाट भवानी देवीला आणि महाराजांच्या पुतळ्याला वंदन करून प्रतापगड सोडला. पायथ्याच्या कुंभरोशी गावा-

लून डाबरी सडकेने कोयना नदीवरच्या एका पुलापाशी आलो, नदीच्या उजव्या तीरावरील एका कच्च्या रस्त्याने जावळीगावाच्या दिशेने चालू लागलो. आमचा मनसुबा जावळीतून निसणीच्या घाटाने क्षेत्र महाबळेश्वर गाठण्याचा होता. जावळीच्या वाटेवर एक बहिरोबाचे देऊळ लागले येथील सभामंडपात एक चौथरा आहे तो चंद्रराव मोरे यांची समाधि म्हणून सांगतात मंदिराजवळच एक नदी व भव्य मारुतीही आहे. अनेक जुनी शिल्पे व गद्धागाळ तिथे पडलेले आढळतात गद्धागाळ म्हणजे गावच्या वेशीवरचे दगड. देवळामागील एका भुंड्या टेकडीवर चंद्ररावाचा वाडा होता असे सांगतात

उजवीकडे लॉडविक टोकाचे वैभव आणि समोरील एल्फिन्स्टन टोकाचे कडे निरखीत नऊ साडेनऊपर्यंत जावळी गावात पोचलो. याच्या एकंदर तीन वाड्या आहेत. जावळीत पोचल्यावर तिच्या अभेद्यतेची यथार्थ कल्पना येते. पश्चिमेस सह्याद्रीचा मुख्य फाटा व त्यापलीकडे दीडदोन हजार फूट खोल खाली असलेले कोकण आणि पूर्वेकडून पाचसातशे मीटर उंचीची महाबळेश्वरची प्रचंड भिंत यामुळे असे वाटते की एखादा नाग जसा वेटोळे घालून बसावा तद्वत उंच, दुर्गम अशा दऱ्यांनी जावळीला, वेढा घातलेला आहे. लॉडविक आणि एल्फिन्स्टन दोन्ही टोकावर जाण्यासाठी जावळीतून वाटा आहेत. पण आम्हाला निसणीच्या वाटेने जावयाचे होते. म्हणून लॉडविक एल्फिन्स्टन टोकाच्या मधल्या दरीतून कोयनेच्या काठाने काही वेळ जाऊन 'दरे' गावी आलो. दरीच्या अगदी आत चिंचोळ्या भागात हे गाव कोयनेच्या काठावर वसले आहे. छोट्याशा शाळेत थोडीशीच विश्रांति घेतली.

## अवघड वाट निसणीची

दरे गावासमोरच एक ताठ कडा उभा आहे वरती बघितले की एक काळाकभिन्न खडक डोकावताना दिसतो. ह्या उभ्या खडकातच ती निसणी आहे. राजाराम गायकवाड ह्या कोयनेच्या कुशीत खेळलेल्या दमदार जवानाला मार्गदर्शक म्हणून घेतले आणि दहा वाजता चढण्यास प्रारंभ केला. छातीवरचा खडा चढ होता. त्यामुळे दम टिकत नव्हता. नेट धरून अर्धा तास वरती चढलो. एका बारशाच्या झाडाच्या

गेले. सृष्टीच्या कलात्मक रचनेने ती दूर झाली भीमाशंकरपर्यंत काळ्या कड्यांचे अन् हिरव्या वनश्रीचे मिश्रण जबरदस्त आहे मात्र त्यात कोठेही उधळण नाही. एक लयबद्ध रेखीवता आहे पलीकडे तुंगी कोथळागड, पेठचे सुळके दिसतात पश्चिमेला अर्थातच माथेरान रांग अन् एका तलावाचा पसरट निळेपणा.

गडाच्या दक्षिणेकडून भाई कोतवालच्या स्मारकाकडून बोर-वाडीमार्गे एक वाट सिद्धवाडीला येते तीही खाली दिसत होती. भाई कोतवाल इंग्रजाच्या गोळीबाराला येथे बळी पडला

त्या सृष्टीत अन् कथेत इतके गुंगलो की सूर्य पश्चिमेला कलल्याचे उशिराने लक्षात आले. माथ्यावर गवताचा समुद्र होता मुक्कामाला थोडीही जागा नव्हती शेवटी एक मंदिराचे जोते सापडले. शिवलिंगही गवतात लपले होते. जोत्याला लागूनच पलीकडे खोल कडा होता.

भराभरा गवत उपटले. तरीही छोटेसे गवत राहिलेच तेव्हा ते काडीने पेटविले आणि आमचे धाबे दणाणले. जोत्याबाहेरही आग पसरू लागली. पळायला कोठेच वाव नव्हता खोल कड्यावरून उडी तरी, नाही तर वणव्यात होरपळ पण मग तिघेही जीवाच्या आकांताने ओले गवत घेऊन आग झोडपू लागलो. आग शांत झाली तेव्हा हात खरचटले होते. धपापणारे ऊर शांत व्हायला बराच वेळ लागला.

पिंडीभोवती कडे करूनच झोपलो. कड्याच्या ओठावर अस-ल्याने भन्नाट वारा घोंघावत होता अन् शिवाय गवतात सळसळ व्हायचीच मग झोप कोठली यायला? त्याचे अर्थातच खोबरे!

सकाळ मात्र सोनेरी उगवली. रम्य सूर्योदय दिसला भीमाशंकर कितीतरी दूर होते लिंगीच्या खिडीकडील टोकापाशी एक वाट आहे पण मोडलेली पण कोणताही समरप्रसंग न घडता सिद्धवाडीत आलो. वरच्या गवतात उघड्यावर मुक्काम केला हे ऐकून वाडीकरांची बोटे तोंडात गेली!

माचीच्या प्रवेशद्वारासमोर काही स्मारके आहेत. ती बघून सह्याद्रि उजवीकडे ठेवला. नागमोडी सुरू झाली, डावीकडच्या

खोल दरीत पाण्याचा खळखळाट घुमत होता. उजवीकडे उंच दरडीं-मधून वानरे चित्कारत होती. सिद्धगड घाट सुरू झाला. तिसऱ्या वहाळानंतर उजवीकडे चढू लागलो. समोरची वाट 'साखरमाची'कडे वरती खिंडीत दमत थकतच पोचलो. पुढची वाट दाट हरितराईत घुसली तिचा मागोवा घेण्यात तासभर तरी मोडला.

वृक्षगुहेतून बाहेर पडलो तेव्हा समोर लावलचक खोरे पसरले होते मावळातील घोडनदीचे हे खोरे. कोकणातून देशावर आल्यावर लगेचच गारवा आला होता. धनगराच्या पडवीपुढची वाट दलदलीतून होती पायाच्या दचादचा आवाजाबरोबर आजूबाजूला खेकडे तुरुतुरु बिळात पळत होते.

आणि मग बैलगाडी रुंदीचा मार्ग भेटला. नदी डावीकडे खोलात गेली उजवीकडे डोंगराला खेटून आमची वाटचाल सुरू झाली. चार तास चाललो तेव्हा कोठे एकमेवगाव 'कोंढावळे' लागले. 'भीमाशंकर' दिसत नसले तरी येथून एक कच्चा रस्ता आहे. घाटमाथ्या-वरची ही वाटचाल खूप लांबची असली तरी सुखदायी आहे

घोडनदीचा एक अप्रतिम कातीव धबधबा मागे पडला. पण त्या-पुढच्या वाटेतच असलेल्या डोहाशी स्नानाचा क्षण आम्ही पकडलाच पार्श्वभूमीस हिरवा डोंगर होता. तिरप्या किरणांनी वनश्री धुसर सोनाळी दिसत होती 'खंड्या' मोरपंखी पंख फडफडवीत सूर मारत होता टिटवी, साळुंकी किडे खाण्यात दंग होती अशा वेळी तासभर सहजची जाईल नाहीतर काय?

तोपर्यंत चुलीवर रवा शिजला होता ते पक्कड पोटात ढकले-पर्यंत चार वाजले होते पाय पेंगाळले होते तरीही मोठी चाल शिल्लक होती वहिरी ससाणा अन् कित्येक अनोळखी पक्षी आमच्या चालीला साथ देत होते. उजवीकडे रानशीळ घाटाची पायवाट आणि भानखाचरे दिसली तेव्हा हायसे वाटले पुढे मंचर-भीमाशंकर रस्ता लागला. तावडमातीत आघोटा आघोटा पाय बुडाले. रविराज पश्चिमे-कडे डुबत असताना अखेरीस भीमाशंकरी पोचलो

घाटमाथ्याची गर्द थंडी वेढीत होती. त्यामुळे देवळात मुक्काम ठोकण्याचा मी मनोरथ उभारला. पण "हॅं, हॅं, आजही मुक्काम उघड्यावरच होणार" असे जाहीर करून दिलीप अन् रवी भीमेच्या उगमकुंडाकडे चालूही लागले. मीही स्मित करून त्यांच्यामागे धावलो. माझ्याही मनासारखेच झाले होते. चांदण्याच्या पांघरुणाची एकदा ओढ लागली की मानवी कोलाहलापासून दूर मोकळ्या रानी चांदोबा पाहात केव्हाच डोळे मिटतात. आताही तेच झाले. किर्र झाडीत रातकिडे गात होते. भीमा वहात होती. चांदण स्तब्ध झाले होते.

□ □

# १२. 'मंगळ'-'चंद्रा'च्या प्रदेशात

वरंधा घाटातील वाघजई देवी! कोवळी उन्हं देवीला जाणवत होती. पण दऱ्याखोरी अजून स्तब्धच होती राज्य परिवहनाची 'विन्हेरे' गाडी त्यातल्याच एका कड्यावर थबकली होती प्रवासी सृष्टीशोभा निरखीत होते. देवीचे भक्त वानर प्रसादाकडे लक्ष ठेवून टपून बसले होते. भोर-महाड रस्त्यावरील हे चिरपरिचित दृश्य! वाघजईचा कौल घेतला की गाडी कावळ्याच्या खिंडीतून घाटाखालच्या माजेरी गावाकडे वेगाने उतरू लागते, पण त्या दिवशी तस घडल नाही.

गाडी अचानक थांबली. आम्ही गप्पा आटपून बाहेर डोकावले तो त्या भयाकारी तिहेरी वळणावर एक ट्रक आडवा झाला होता.

अर्थातच गाडी पुढे जाणे अशक्य म्हणजे खाली उतरणे आलेच. मग लेदरबॅग्ज कशाबशा सांभाळणाऱ्या प्रवाशात आमच्या पाठुंगळीच्या हॅवरसॅक्सनी चांगलाच भाव मारला.

इतर मंडळी दुसऱ्या गाडीची वाट पाहत थबकली आणि आम्ही सरळ पदमार्गच पत्करला

आकाशीच्या मंगळ--चंद्राकडे झेपावणारी याने जशी अग्निबाण उडवून आपला मार्ग बदलतात तसाच छोटासा मार्गबदल आम्हीही केला -- एस.टी.च्या कृपेने! फरक इतकाच की आमची मोहीम भूतलावरच्या मंगळगड अन् चंद्रगडावर होती

सह्याद्रीच्या कोकणात घुसलेल्या रांगांवर हे दोन्ही दुर्ग आज वर्षानुवर्षे तळपताहेत. वरंधा घाटाच्या दक्षिणेला कामथा घाट रोखत 'मंगळ', तर त्याही दक्षिणेला ढवळचा घाटावर नजर ठेवून 'चंद्र'!

वरंधा घाट उतरून 'माझेरी'त पोचलो तेव्हा उन्हही घाट उतरून माझेरीत पोचली होती.

घाटमाथ्याची गर्द थंडी वेढीत होती. त्यामुळे देवळात मुक्काम ठोकण्याचा मी मनोरथ उभारला. पण "हँ, हँ, आजही मुक्काम उघड्यावरच होणार" असे जाहीर करून दिलीप अन् रवी भीमेच्या उगमकुंडाकडे चालूही लागले. मीही स्मित करून त्यांच्यामागे धावलो. माझ्याही मनासारखेच झाले होते. चांदण्याच्या पांघरुणाची एकदा ओढ लागली की मानवी कोलाहलापासून दूर मोकळ्या रानी चांदोबा पाहात केव्हाच डोळे मिटतात. आताही तेच झाले. किर्र झाडीत रातकिडे गात होते. भीमा वहात होती. चांदण स्तब्ध झाले होते.

□ □

# १२. 'मंगळ'-'चंद्रा'च्या प्रदेशात

वरंधा घाटातील वाघजई देवी! कोवळी उन्हं देवीला जाणवत होती. पण दऱ्याखोरी अजून स्तब्धच होती राज्य परिवहनाची 'विन्हेरे' गाडी त्यातल्याच एका कड्यावर थबकली होती प्रवासी सृष्टीशोभा निरखीत होते. देवीचे भक्त वानर प्रसादाकडे लक्ष ठेवून टपून बसले होते. भोर-महाड रस्त्यावरील हे चिरपरिचित दृश्य! वाघजईचा कौल घेतला की गाडी कावळ्याच्या खिंडीतून घाटाखालच्या माजेरी गावाकडे वेगाने उतरू लागते, पण त्या दिवशी तसं घडलं नाही.

गाडी अचानक थांबली. आम्ही गप्पा आटपून बाहेर डोकावले तो त्या भयाकारी तिहेरी वळणावर एक ट्रक आडवा झाला होता.


अर्थातच गाडी पुढे जाणे अशक्य म्हणजे खाली उतरणे आलेच. मग लेदरब्रॅग्ज कशाबशा सांभाळणाऱ्या प्रवाशात आमच्या पाठुंगळीच्या हॅवरसॅक्सनी चांगलाच भाव मारला.

इतर मंडळी दुसऱ्या गाडीची वाट पाहत थबकली आणि आम्ही सरळ पदमार्गच पत्करला

आकाशीच्या मंगळ-चंद्राकडे झेपावणारी याने जशी अग्निबाण उडवून आपला मार्ग बदलतात तसाच छोटासा मार्गबदल आम्हीही केला – एस.टी.च्या कृपेने ! फरक इतकाच की आमची मोहीम भूतलावरच्या मंगळगड अन् चंद्रगडावर होती.

सह्याद्रीच्या कोकणात घुसलेल्या रांगांवर हे दोन्ही दुर्ग आज वर्षानुवर्षे तळपताहेत वरधा घाटाच्या दक्षिणेला कामथा घाट रोखत 'मंगळ', तर त्याही दक्षिणेला ढवळ्या घाटावर नजर ठेवून 'चंद्र' !

वरंधा घाट उतरून 'माझेरी'त पोचलो तेव्हा उन्हही घाट उत- रून माझेरीत पोचली होती.




तळ्यें गावच्या वाटेला लागलो. काळ्याकभिन्न कातळकड्या-खालचा एक हिरवागार ओहोळ मागे गेला अन् सह्यपहाडाच्या उजव्या अंगाने जेमतेम अर्ध्या तासातच 'तळ्येवाडी' आली. ग्रामदेवता जननी, लगतच्या उंच टेकडीवरून टुकुटुकू पाहत होती. अवजड बोजे पाठीवर वागवत हे कोण चमू चाललेत ते निरखीत होती!

एका म्हातारीने आशीर्वाद दिला. वाडीतून बाहेर पडलो तोच दूरवर मंगळगडाचे दर्शन! छे! तो होता गडाच्या पश्चिमेकडचा अगदी तसाच भासणारा डोंगर !

गडाची संपूर्ण रांग नजरेत आली अन् उजवीकडे खाली तळचे गाव. समोर दरीपल्याडल्या पठारावर 'किये' पण जाणवत होते खरं म्हणजे वाट अगदी सरळ पण नाही ! आम्ही चुकलोच. अन् वाट म्हस्क्याच्या धनगरवाडीची पकडली. डोंगराडोंगरातून कितीही हिंडलं तरी वाट चुकणारच नाही असे छातीठोकपणे काही सांगता यायचे नाही हेच खरे !

शेवटी शेतांचे बांध उड्या मारीत पार केले अन् एका झापा-शेजारच्या ओढ्यात आलो अस गार पाणी की पाय बुचकळलेच डोहात पोहण्याचा मोह टाळला आणि झाडीच्या चढणीने 'किये' गाव गाठले

मध्यभागी टेकडीवर पद्मावती ! बाजूनी छोट्या छोट्या वाड्या. स्वच्छ सारवलेली अंगणे होती घराच्या खांबावर लक्ष वेधून घेणारी कलाकुसर अन् ओटीच्या पुढे काढलेले लाकडी सज्जे दारी आलेल्या पाहुण्यांना बाइच टेकायच आमंत्रण देत आहेत घराच्या जोत्यावर कमलाकृतीबरोबरच वळणदार शिलालेख–'होनवती मालुसरे– सन १९४८!'

कोकणची ही कल्पकता न्याहाळतच 'किये' गाव सोडले वाडीच्या दक्षिणेला समोरच 'मंगळगड' उभा होता, पण त्याचा पायथा गाठण्या-साठी तब्बल दोन अडीचशे मीटरचा उतार-चढ बाकी होता.

झाडीझाडीतूनच उतरत भाव नदीतून पुनश्च चढणीने 'पिंपळ-वाडी' आली. 'मंगळगड' दिसेनासा झाला होता

तळे, किये अन् पिंपळवाडी ही तीनही गावे सह्य शिखरापासून कोकणात घुसलेल्या पठारावर वसलेली आहेत प्रत्येक दोन सोंडांना बाजूला हटवत एक खोल दरी. त्यामुळेच पिंपळवाडीत आम्ही आलो ते चढउतार करीत अन् तब्बल दोन वाजल्यावर !

श्री दात्ये आजोबा अन् जणू त्यांची नातच शोभावी अशी उषा भिडे याना पाहून वाडीतल्या सगळ्या आया, मावश्या विचारपूस करीत गोळा झाल्या. तेव्हा कळल की, गडावर वस्तीला स्थान नाही.

लगोलग सामान टाकून गड पाहणीस जाण्याशिवाय गत्यतर नव्हते एखाद्या बॉक्सरची मुष्टि असावी तशी मंगळगडाची एक सोंड पिपळवाडीला ठोसा देतीय. यामुळे बहिरोबाच्या देवळाजवळून या मुष्टीच्या टेंभावर चढलो तेव्हा कुठे गडाच्या तटबुरुजानी दर्शन दिले.

सर्वश्री धाडी, कासार आणि गार्डी या पिपळवाडीच्या शिक्षक त्रयींनी त्याच्या दमाबद्दलच्या आमच्या अदाजाला काटशह दिला ते सहज चढत होते अन् उलटी आमचीच दमछाक होत होती

मगळगडात प्रवेश केला तो पूर्व बाजूच्या उभ्या चढणीने दरवाजात बऱ्यापैकी खडकातल्या पायऱ्या, पण खुद्द दरवाजाची कमान मात्र कोसळलेली.

पूर्वेकडे पसरलेल्या माचीवर काळभैरवाचे मदिर ! कुणी कुणी कांगोरी देवीही समजतात. दीपमाळेनजीकच्या रुद पायऱ्या चढले की मोडकळलेले प्रवेशद्वार बुरुड जमातीचे लोक दरवर्षी येथे येतात दोन तीन शिव पिंड्या आणि काळभैरवाची एक सुबक मूर्ति लक्ष वेधते.

मदिरापुढे माची संपते अन् सह्याद्रीचे दर्शन घडते. पूर्वेकडे दुर्गादेवी, म्हसळा, रायरेश्वराचे नाकिदा, कोळेश्वर, महाबळेश्वरचे ऑर्थरसीट, दक्षिणेला प्रतापगड, मकरदगड, वायव्येस रायगड व उत्तरेला तोरणा, राजगड !

माचीतून सरळ बालेकिल्ल्यात किंवा कडेनेही फेरी मारता येते. ओळीने सात–आठ पाण्याची टाकी पाहून विस्मय वाटावा. बालेकिल्ल्यात राजवाड्याची भिताडे अन् एक चार खणी इमारत रानाळच्या रानातून कशीबशी डोकावतात

सध्याकाळच्या शांत वेळी मंगळगड गहिरा बनत चालला. आम्ही अर्थातच परतीची वाट धरली. मगळ ग्रह जसा अनाकलनीय तसा मंगळगड मात्र नाही

जावळीकर चंद्रराव मोऱ्याकडून तळे घोसाळे पाठोपाठ शिवाजी महाराजानी हाही गड हिसकावून घेतला गडाचे 'कांगोरी' नाव बद॰ लून राजांनी नव नामकरण केलं 'मंगळगड !' बिरवाडी ही महत्त्वाची पेठ इथून तीन चार कोस अन् पुढे लगेच रायगड खोरे यामुळे राय॰ गडजवळील दग्याधोप्याच्या बंदोबस्तास मंगळगडचे सैनिक दौडत असत. सरदार रूपराम चौधरी हा शके १७३५ मध्ये किल्लेदार अस॰ ल्याची एक नोंद आहे तर इ स. १७४० मध्ये इंग्रजी सेनेस प्रतिकार करण्यात या मंगळगडकरानी काहीसा वाटा उचलला होता

या दुर्गाचा जास्त उपयोग कैदखाना म्हणूनच झालेला दिसतो. सरदार बापू गोखल्यांनी हंटर अन् मॉरिसन या इंग्रज साहेबाना येथे जेरबंद केले होते. बस्स ! १८१८ साल उजाडलं अन् कर्नल प्रॉथर तयार होताच, या मंगळावरही तो अमंगल युनियन जॅक रोवला गेला

पिंपळवाडीतल्या मुक्कामाने ताजेतवाने होऊन सकाळीच पावलं बाहेर काढली गडाच्या पूर्वेकडच्या वडघर खिंडीत येतोय तोवर कामथा खोरं उन्हानं उजळलं होते. खालच्या वाडीत पोचलो तेव्हा पाठीमागे कांगोरी निरोप देत होता.

वाडीम्होरं एक सोंड खोऱ्यात घुसली आहे. तिच्या डाव्या अंगाने बरेच उतरलो तेव्हा कुठे वडघरच्या वाडीत आमचा प्रवेश झाला. कामथा नदीही लगोलग आलीच

सकाळचे नऊ वाजले होते न्याहारी उरकली. पश्चिमेला सह्या- द्रीच्या उंच पहाडाशी सूर्यकिरण टकरा देत होती अन् इतस्तत उधळत होती. रायरेश्वरचे नाकिंदा टोक अन् अस्वल खिंड खुणावत होती कामथा नदीचे निळेभोर गार पाणी ! दोहो बाजूनी उंच चढत गेलेल्या डोंगर रांगा अन् त्यावर मिरविणारी कोकणी कौलारू घरे ! मनं ताजेतवानी व्हायला अधिक काय पाहिजे

पिशव्या पाठीवर चढवून पुढे होणार इतक्यात एक थोराड बाप्या सामोरा आला. 'कुठं निघालाव?' मी म्हटलं 'ढवळ्याच्या चंद्र- गडाला!' "अरे देवा लई अवघाड! तुमाला जमायचा नाय. तुम्ही सरळ प्रतापगडास जावा."

वाद घालून काहीच फायदा नव्हता. महादेवाच्या मुऱ्ह्याची वाट धरली. इतकच जाणवलं की, चंद्रावर पोचणं सोपं नाही. नदीपल्याडल्या वाडीतून पाणी घेऊन दाडाला लागलो. वाडीतली घरे ठिपके होऊन नाहीशी झाली तरी चढण आपली चालूच. डावीकडे उंचावर चांदल्याचा मुऱ्हा अन् बैला डोंगर बघत होते. तब्बल एक तासाच्या सरळ चढणीने म्हाद्याचा मुऱ्हा आला. रायरेश्वरपासून निघालेल्या डोंगरमाळावरची ही सपाटी. जगमांची पाचपचवीस घरे आणि रानात एक महादेवाचे देऊळ अन् गंगा टाके.

ढवळाखोरे नजरेत येताच प्रतापगड, मकरदगडही नजरेत आले. पूर्व दिशा आक्रमून एक धनगर वाडा गाठला.

ऊन आता रणरणू लागलं होतं. चिटपाखरूही दिसत नव्हतं. एकाएकी जंगल हादरलं. पंखांचा आवाज करीत दोन पक्ष्यांनी आसमंतात झेप घेतली. डोळ्याचं पारणं फिटलं! पिवळीधमक चोच, अजस्र पंख, निमुळते शरीर! झेप तर अशी डौलदार की छायाचित्रात छबी टिपण्याअगोदरच ते दरीत नाहीसे झाले.

आणखी दोन धनगरवाडे पार करून कड्यावरून निघालो. उजवीकडे खोल दरी होती. डोंगराचं एक वाकण गेलं आणि एक विराट दृश्य समोर ठाकलं. पर्वताच्या प्रचंड गराड्यात चंद्रगड एखाद्या मण्यासारखा तळपत होता. कसे ते विलक्षण देखणे कडे! लाखो करवती उभ्या ठेवाव्यात तसा तो सह्यगिरी आणि त्यात महाबळेश्वरचा 'आर्थरसीट' स्पष्ट दिसत होता. उन्हाने कड्यांची दाहकता जास्तच जाणवत होती. खोल दरीपलीकडच्या टेपावरचे 'ढवळे' गावच तेवढे मानवी अस्तित्व दाखवीत होते.

काही अंतरावरच वाट उजवीकडे उतरली. काट्याकुट्यातून धडपडत खांडजच्या धनगरवाड्यातून ढवळी नदीचे पात्र गाठले. उतारावरही श्रम होण्याची पहिलीच वेळ! उन्हातून कोरडी नदी पार केली तो ढवळ गाव आलेच.

भवाळकर गुरुजींना पत्र धाडलेच होते. आदल्या दिवशीच चारपाच मैलावरच्या 'देवळे' गावातल्या पोस्टात ते त्यांना मिळाले

होत. आमचे घामाने डबडबलेले भयाण अवतार पाहून त्यांनी दोनचार बादल्याच पाणी समोर ठेवल

हजारएक वस्तीच्च ढवळ्या खोऱ्यातल हे शेवटच गाव पुण्या-सागलीकडला हा शिक्षक येथे चवथीपर्यंतची शाळा चालवतोय. या दऱ्याखोऱ्यात पाचपाच वर्षे काढायची म्हणजे धन्य आहे

क्षुधाग्नि शात करीपावेतो वाटाड्याची चौकशी केली, पण सगळे वणावणा कष्ट करायला गेलेले अन् मग अवघी हिंमत धरून आम्हीच चद्रगडावर निघालो पोलीस पाटलाने दिलेले आव्हान स्वीकारून. वरच्या टप्प्याचे वाटेने दोन वळणातच पायथा आला.

महाबळेश्वरपासून निघालेल्या सह्याद्रीच्या पूर्वपश्चिम रांगेच्या दक्षिणोत्तर फाट्याच्या टोकावर चद्रगड दड थोपटून खडा आहे.

भित नजरेत जोखून वांझ व्हिऱ्याकडेच्या झाडीत शिरलो. अप्रतिम जगलातून चढत एका पिपराच्या झाडाशी, मोकळवण आल. गडाचे दाडाला भिडलो अन् मग तो घसारा, ती कारवीतली पुसट वाट पिटुकली! कसेबसे वर चढत गेलो. चौकीच्या टप्प्याने दिलेला 'खबरदार' इशारा धुडकावला अन् पुढे झेपावलो. वाट गायब. अडम तडम वाटेने उजवीकडे म्हसोबा खिडगाठली भन्नाट वारा अन् समोरच दृश्य यानी सुखावलो, पण खडकावरच्या चढणीचा प्रयत्न शेवटी अयशस्वीच ठरला.

'सूर्यास्ताची वेळ!' त्या अवघड कड्यात अधाराची सोबती न परवडण्यासारखी चद्रगडचा माथा वाकुल्या दाखवीत होता वरल्या टप्प्यावरची पाहिराची झाडे चक्क हसत होती. अन् मग वाटतल्या झाडांवर सताप काढत ढवळे गावात आम्ही धावतच माघार घेतली. गावकरी मडळी मात्र (बहुसख्य मोरे घराणी) आश्चर्यमुग्ध झाली अन् मग रात्री गरम दुधाच्या घोटांनी व ग्रामस्थाच्या भाबड गोतानी आयुष्यावर फुकर घातली एकनाथांचे ते अमरकाव्य या कोकणपट्टीत कोणा एका दरीतला आसमत भारून टाकीत होते.

पश्चिमेला व्याघ्र मावळला आणि ढवळ्याचे प्रशस्त मारुती मंदिर सोडले. ढवळ्यात मोरे घराणी मायदाळ. त्यातलीच दोन तरुण पोरे साथीला घेतली कोंडीराम अन् शिवराम!

डुकर सोंडीचा डोंगर उजव्या बाजूला ठेवून बाह्य व्हिन्यातून पाहिरापर्यंत फटवयात पोचलो पुढे लगेचच वाट गवसली. खोबणी असलेला अवघड कडा चढलो. तो माथाच! सूर्यकिरणाचा वर्षाव अन् अजस्र दरीवरचा भन्नाट वारा ! त्याच्या धुम्मड आवाजातून समोरचे नजर न ठरणारे दृश्य!

शिखराकडे निघालो तो वाटेत एक शिवपिंडी. एकसंध अन् मोठी. सह्य पहाडांना शोभणारी ! नदीशेजारून पुढे चढणीवर दोन खडकाच्या प्रवेशद्वारातून गडाच्या अधित्यकेत प्रवेशलो

८०५ मीटर उंचीचा चंद्रगड जेमतेम १५ मीटर रुंद अन् ७–८शे मीटर लांब आहे. एक घरठाणे अन् जननीचे स्थान सोडले तर वास्तु नाही. उत्तर टोकावर एक स्वच्छ पाण्याचे बांधीव टाके अन् पलीकडे एक गुहा, आत उभे राहून टेहळणी करता येण्याजोगी बैला, पचटेंभ, कोळीदुर्ग कलावंतिणीची काढणी, ढवळ्या घाट अन् रायरेश्वर, कोल्हे-श्वर, महाबळेश्वर ही पठारे डोळ्यासमोर भिरभिरतात

जावळीपाठोपाठ शिवाजी राजानी मोऱ्यांचा मुलूख ताब्यात घेतला. चंद्रगड आणि ढवळ्या घाटही याच वेळी राजांनी ताब्यात घेतले. अर्थात् चंद्रगड फक्त टेहळ्या म्हणूनच उपयोगात आणला जात होता. तेव्हा छोट्याशा शिबंदीस पुरतील एवढी पाचसात टाकी इथे खोदलेली आहेत दरवर्षी माघात ढवळेकर ग्रामस्थ जननी देवी अन् महादेवाचा उत्सव करतात. चंद्रगड जागवतात.

कडा उतरूनच अर्ध्या तासातच पायथा गाठला. आता कोकणातून देशावर थेट महाबळेश्वर चढून जाणे होते. दाट जंगलातल्या पाताळ दरीतून ढवळ्या घाटाने ! ठरवलेला वाटाड्या मिळाला नाही अन् वाटाड्याविनाच कूच केले. चंद्राला वळसा घातला तो केवढी दरी सामोरी आली. रानच रान !

पूर्वीच्या काळी वाहता असेल तेव्हा या ८ कि मी. लांबीच्या देशावरच्या जोरहून कोंकणातल्या ढवळ्यास उतरणाऱ्या घाटात चौक्या असतील पांथस्थाना थंड पाण्याची सोय तिथले पहारेकरी करीत असतील आणि आज आम्हाला महाबळेश्वरपर्यंत चुकूनसुद्धा मनुष्य भेटणार नव्हता. वाट चुकलो तर दिलासा द्यायला अकाळ विकाळ कडे अन् जंगलाचा दाटवा होता. अन् रात्री तर मग श्वापदाना मेजवानीचा बेत ठरवायला काहीच हरकत नव्हती. दडपलेल्या छातीनेच पहाडानी वेढलेल्या वृक्षराजीच्या गुहेत पावले ठेवली. दरीच्या उजव्या अंगाने चढणी, उतरणी, ओढे ओहोळ पार करीत पुढे गेलो तो एकदम प्रवेश बंद !

वृक्षवेली अन् डोंगरानी चहू बाजूनी वेढून वाट गिळून टाकली होती मती गुंग झाली ढवळ्यास परतावे की काय हा विचारही मनात चमकला. पण मग जिद्द ती कसली !

भराभरा वेड्यासारखी शोधाशोध केली अन् वाट हुडकली. किंचित् मळलेली वाट एका ओढ्यातून वर चढत होती अन् मग कधी चुर-चुरणारा पाचोळा, ओहोळातले दगडगोटे, वेली तोडीत चढू लागलो. दोन तास युगासारखे गेले आणि बऱ्याच उंचीवर आल्याची जाणीव झाली पुन्हा दोन वाटा सामोऱ्या आल्या. सगळे नैपुण्य पणाला लावून उजवीकडे वर सापळखिंडीला चढणारी वाट सोडली अन् डावीकडच्या सपाटीच्या वाटेने पुढे निघालो

बरेच वळसे घेत डोंगर उजव्या अंगाला ठेवून ती निसरडी वाट एका कड्यावर आली. अन् प्रचंड खोल दरी पुन्हा दर्शन देती झाली. दरीपलीकडे चंद्रगड पुन्हा डोकावला

झाडी संपून घसाऱ्याची चढण. चौकीच्या टप्प्याशी पाय थकले होते. भाजणाऱ्या उन्हापासून खडकभिंतीमधल्या त्या जुन्या वाटेने दिलासा दिला अन् आम्ही माथ्यावर आलो. समोरच्या बहिरोबाच्या मूर्तींनी आमच्याकडे कौतुकाने पाहिलं असावं. वाटाड्याशिवाय हा घाट काबीज करण्याचं आक्रीत आम्ही केलं होतं !

...५

आता देशावरून महाबळेश्वर चढणे होते. चंद्रगडाची दरी पुन्हा एकदा निरखली अन् पिशव्या चढवल्या. ढवळ्यात मिळालेल्या माहितीच्या आधारे बहिरीच्या डाव्या हाताची जंगलात उतरत 'जोर' कडे धावणारी वाट न धरता, बहिरीसमोरच्च कारवीतून वर चढणारी वाट हुडकून निघालो. कारवीच्या माडव्यानंतर एक पाण्याचे टाके भेटले: असं गार अन् मधुर पाणी की बस्स !

पुन्हा एकदा महाबळेश्वरी जंगल ! बांबूच्या बेटाकडे जाणाऱ्या असंख्य वाटा. पण आमची सराईत नजर हुलकावण्या खाऊनही वाट गाठत होती. माथा गाठला. मी खरा दरीतच पडायचा. चढण संपताच पलीकडे कडा एखाद्या लवलवणाऱ्या तीरासारखा वेगात कोकणात घुसला होता. सरळ सातशे मीटर !

कुणीही वेडच व्हावं अशा ठिकाणी आम्ही पोचलो होतो. समोरच 'मढीमहाल' अर्थात् ऑर्थर सीटचा काळाकभिन्न राक्षसी कडा आव्हान देत उभा होता. त्यापासून निघालेल्या डोंगर रांगेने आम्हाला तोलून धरले होते.

डावीकडे थेट कोल्हेश्वरापर्यंत अमर्यादित जंगल, उजवीकडे सावित्रीची खोल दरी अशा वाटेने आम्ही धावतच 'ऑर्थरसीट' खाली आलो. उजव्या बाजूला सरळ हजार मीटर तुटलेला तो कडा देखून पारणं फिटलं. मला वाटतं या कड्याचं खरं सौंदर्य न्याहाळावं ते असं २०० मीटर खाली येऊनच ! कड्याच्या टोकावर बाहुलीएवढी माणसं उभी होती.


मग चक्क आरोळ्या ठोकल्या. मनमुराद ओरडायला दऱ्याखोऱ्यासारखी जागा नाही. प्रतिध्वनीचा मागोवा घेत चढणीस लागलो अन् एक छोटा कडा चढून 'खिडकी'त पोचलो. मढीमहाल न्याहाळण्याची खिडकी' अर्थात् विंडो पॉईंट. ढवळ्यापासून ६ तासाची चढण संपली होती.

डोंगरयात्रेची ती शेवटची संध्याकाळ. सूर्य क्षितिजाकडे चालला होता आणि त्याबरोबरच मगळ आणि चंद्रही डोळे मिचकावीत संध्याछायेत विरून जात होते.

□ □

# १३. कुकडी खोऱ्यात नाणेघाटात !

महाराष्ट्रातील कुकडी खोरे हे महाराष्ट्राच्या प्राचीन भरभराटीचे जिवंत शिल्प आहे सातवाहनाच्या आश्रयाखाली नाला सोपारा, चौल या कोकणातील बंदराचा व घाटावरच्या जुन्नर, पैठण या पेठामधील व्यापार या खोऱ्यातील नाणेघाटामार्गे चालत असे. या घाटात सातवाहनांनी खोदलेले शिलालेख आहेत.




कुकडी खोऱ्याचे पहारेकरी आहेत शिवनेरी, चावड, जीवधन व हडसर हे चार दुर्ग. उत्तुंग कातळकड्यामुळे ह्याच्या आरोहणात भेदक थरार आहे आणि खोऱ्यातून कोकणात दिसणारी भैरवदुर्गाची पाषाणभिंत सहजासहजी माथा गाठू देतच नाही. कुकडीच्या या पच-प्याऱ्यांना गवसणी घालण्यासाठी आम्ही एक दिवस सकाळच्या जुन्नर-आपटाळे गाडीने मीना खोऱ्यात पोचलो. दुधविक्रेत्याच्या रांगेबरोबरच वीजवाहिन्यांवर हारीने बसलेल्या पक्ष्यांनी माना वळवून पाहिले. त्या

पक्ष्यांच्या रांगेने आमच्याबरोबरच चावंडच्या दिशेने झेप घेतली. चावंडच्या पायथ्याला गाडीमार्गाने पोचलो तेव्हा मीनेर ओलांडून कुकडनेरमध्ये आमचा प्रवेश झाला होता.

चावंड गाव गडाच्या पश्चिमेला आहे. इथून माथ्यापासची घळ सहजच दिसते या घळीत कडा खोदून छोटयाशा पायऱ्या केल्या आहेत शेजारी लोखंडी आधार असल्याने कडा पार करणे अवघड नव्हते. यापुढच्या उंच उंच ६०–७० पायऱ्यानीच जिरविली.

इकडील सर्वच डोंगराना माथ्यापाशी सुमारे शंभर मीटर उंचीची सरळ सोट कातळभिंत आहे दुर्गरचनाकारानी स्थापत्य-कौशल्य पणाला लावून खोदलेले मार्ग या खोऱ्याच्या प्रत्येक दुर्गाला पाहायला मिळतात. कातळात कोरलेल्या नीटस द्वाराने आमचे स्वागत केले. गडाच्या मध्यभागी एक वाटोळी टेकडी दिसली तिच्या उत्तरेला एका वर्तुळात खोदलेला सात तळ्याचा समूह उगवला. सर्वश्री कराडे, पूरकर व मासाळ ही त्रयी सोमेश्वरच्या काकडे महाविद्यालयाची. त्यानी अशा डोंगराचे अन् तळ्याचे दुरूनही दर्शन घेतले नव्हते. त्यांच्या विस्फारित नेत्रात त्या तळ्याचे प्रतिबिंब पडले तळ्याच्या अलीकडच एका उद्ध्वस्त मंदिराचे तोरण प्राचीनत्वाची बिरुदे मिरवीत ढासळलेल्या अवस्थेबद्दल अश्रु ढाळताना दिसते या समोरच एक कुंड व बाजूने मूर्तीसाठी कोनाडे आहेत.

माथ्यावर दीपमाळ व चावंडाबाईची मूर्ति. पूर्वेला शिवनेरी, पश्चिमेला धाकोबा, शंभू तर उत्तरेला खोऱ्यापलीकडे अजनावळे, निमगिरी, हडसर हे हरिश्चंद्रगडच्या पार्श्वभूमीवर दिसत होते.

उत्तरकडयात मुक्काम करण्याजोगी लेणी आहेत इथून कुकडी नदीचे वळणदार पात्र छान दिसते गड उतरताना नेत्र कुकडीतीरी कुकडेश्वरावर लागले होते चावंडपेठेतून तिथे पोचायला तब्बल तास-भर लागला. उन्हाने तावून निघालो होतो. शंभु डोंगराच्या कुशीत दाट झाडी होती. एक थंड जलाचा ओढा वहात होता. त्याच्या काठावर कुकडेश्वर मंदिर उभे होते.

ती प्रसन्नता अनुभवीत सर्वजण झाडीत पहुडले. हे देऊळ अंदाजे १३ व्या शतकात बांधलेले आहे दुर्लक्षामुळे हे मोडकळले असले तरी विविध शिल्पे लक्ष वेधतात शिवपार्वती, गणेश, देवी, नागराज तसेच पक्षी व वेलबुट्टया, इतर कलात्मक नक्षी अशा शिल्पांनी अंतर्बाह्य सजले आहे

देवळाबाहेरील कुंडातील थंड पाण्याने डोळे शांत झाले आणि घाटघरकडे निघालो पूर गावानजिकची खिंड ओलांडली. पळमाची ताबडी फले हिरव्या समुद्रात नावेसारखी तरंगत होती 'खुळखुळा' आपले मोरपंख हलवीत संगीत पाझरत झेपावत होता.

डोंगराच्या उजव्या अंगाने नागमोडी वाट होती खोऱ्यापल्याड देवदांड्याच्या प्रचंड भिंती अन् अंजनावळे डोंगराचे कंरवती जबडे आपले रौद्र स्वरूप पालटत होते संध्याकाळ लवकरच विसावणार होती.

रान संपून घाटघरच्या रहाळाने दर्शन दिले. जीवधनगड स्थांतून उठावला होता तळातील फांगळी गावातून गडाचा पायथा गाठला.

जुन्नर-घाटघर गाडीमार्ग घाटघर गावाकडे वळला पण आमची मने गावच्या बंदिस्त वातावरणापेक्षा जीवधनच्या छायेत खडबडीत माळावर पथाऱ्या टाकण्यास राजी झाली चुलीवर वाफारलेल्या गरम भाताने आमचा थकवा उडाला

पूरकरच्या बाजाचे सूर अंधार छेडीत होते आकाशातून व्याध, कृत्तिका, शर्मिष्ठा असे कितीतरी तारे-ग्रह चमकत होते. सप्तर्षि पश्चिमेकडे मावळला तेव्हा पूर्वेकडून कुकडी खोरे उजळत होते

घाटघरमधून जिजाबा पाटलांनी दाखविलेल्या वाटेने आम्ही बाहेर पडलो. जीवधनगड आमच्या उजवीकडे उत्तर-दक्षिण पसरला होता माथ्यापाशी ८० मीटर उंचीचा कातळपट्टा व त्याखाली अरण्य-पट्टा होता. तळमाळावरून दक्षिण टोकाकडे वाट आहे पण माथ्यावर जाण्याची ऊर्मि दांडगी. अलीकडेच एका मळलेल्या वाटेने आम्हाला चकवले. नेहमीप्रमाणे ती चुकलीच

तासभराच्या झटापटीनंतर एक प्रस्तर पार करून पाषाण भिंती· पाशी पोचलो. सुरेख कातळशिडीला पहिल्या २५ ३० तुटलेल्या पावट्या होत्या दिलीप निंबाळकर वादर पावलाने पटापट वर चढला. त्यामागोमाग आम्ही पाची जण वर चढलो.

हा आयताकृति गड मध्यातून उचावला आहे. त्याच्या पूर्व उतारावर एक धान्यकोठी आहे कातळाबाहेरचा भाग बांधून काढलेला कमानी मुसलमानी वास्तूशी साम्य दाखवितात पण याच्या पुढील तोरणावर गजलक्ष्मी शिल्प आढळते

कोठीजवळील पाण्याची टाक्याची चव चाखून मध्यावर पोचलो. आमची दृष्टि आता कुठे पोचत नव्हती. उत्तरेला कळसुबाई रांग, रतनगड, घनचक्कर, अजोबा, हरिश्चंद्र, अंजनावळे डोंगर, तर पूर्वेला निमगिरी, हडसर हे गड व पश्चिमेला माथेरान रांग दिसत होती डोळे खाली वळवले तर कोकणात डोकावणारा नानाचा अंगठा नाणेघाटाच्या बेचकीत दिसत होता. त्यापलीकडील भोरांड्याच्या दाराने आम्ही कोकणात जाणार होतो

जीवधनच्या पश्चिम अंगाला जे द्वार आहे ते पूर्णपणे उद्ध्वस्त आहे त्यामुळे परतीसाठी पूर्वेचीच वाट पत्करणे भाग होते तत्पूर्वी जीवधनचा दक्षिणकडा न्याहाळण्यास आम्ही विसरलो नाही जिवा-बाईच्या वृन्दावनापलीकडेच हा कडा कोकणात ६०० मीटर कोस-ळला आहे कड्यावर वादरलिंगी नावाचा सुळका आहे कड्याचे प्रतिबिंब धाकोबाच्या रूपाने समोर पडले होते. आमच्या मनात दडले होते

नाणेघाटापल्याडच्या छोट्या धरणाकडेने वहाळाच्या उगमात पोचलो ते अवघ्या १॥ तासात सह्याद्रीला पडलेले ते खरोखरीचे दार होते त्याच्या माथ्यावर गेलो तो अंजनावळेचा डोंगर बाजूला सारून एक काळा सुळका सह्यकड्यातून आमच्याकडे पहात होता तो अर्थातच भैरवगड होता.

निम्म्या घाटात वाट पाण्याच्या झऱ्यापाशी फुटली तळात भोरांड्याकडे जाणारी वाट सोडून आम्ही मधल्या पदरातल्या वाटेने

उजवीकडे वळलो आणि सुमारे तासातच भैरवगडच्या कराल दर्शनाने स्तिमित झालो.

भैरवगडचा ६०–७० मीटर उचीचा प्रस्तरखड पठारावर अलगद बसला आहे. तो पश्चिमेकडून मात्र सुळक्यासारखा दिसतो. 'न चढणीय'

आवळ्याची वाडी, दिवाणवाडामार्गे मोरोशीत पोचलो. ओतूर-कल्याण राजमार्गावरील हे आदिवासी खेडे.

धाऊ देऊ भला हा तिथला गडाचा माहितगार गडी. घरधनिणीने केलेल्या नाचणीच्या भाकरीने आमच्या कालवणाच्या हस्तलाघवाची दुर्दशा केली

भैरवगडच्या भितीने झोपा उडविल्या होत्याच सकाळी लवकरच गडमाचीत पोचलो. तिथल्या बहिरीची अनुज्ञा घेतल्यावरही पुढच्या घमान्गावर लोटांगण घालीतच वर चढलो पाण्याच्या टाक्यापासून भितीच्या डावीकडून चिचोळ्या खिडीत पोचलो.

७० मीटर कातळकडा आमच्या पुढे उभा होता. शेकडो वर्षांपूर्वी त्यातून एक सुबक मार्ग मानवाने तयार करून निसर्गाच्या रौद्रत्वाला नमविले आहे त्या मार्गात आमची पावले चढू लागली. वळणावर पायऱ्या तुटल्या होत्या. पुढे पाऊल पडले असते ते २० मीटर खालीच.

उजवीकडे डोकावणाऱ्या खडबडी कड्याच्या घर्षणाचा फायदा उठवीत पुढे होत डाव्या हाताने वरची पकड भलाने घेतली. पाठीमागे खोल दरी वाट बघत होती. पण तिला हूल देऊन लांब ढांग टाकून कड्याला चिकपत तो वर पोहोचला. आमचे श्वास मोकळे झाले ते त्या थराराची चव घेतल्यावरच पुढचा सुरेख कातीव मार्ग पटापट वर घेऊन गेला.

माथा अगदी छोटासा. भूगर्भ शास्त्रज्ञ याला (Dyke) म्हणतात. सह्याद्रीचे पुन्हा एकदा सुभग दर्शन झाले.

उतरणे आणखी अवघड होते पण दोरखाळ्याने तो टप्पा उतरून मोरोशीत धावत पोहोचलो

दुपार उलटली होती. नाणेतळे हा नाणेघाटाचा पायथा पण त्या अलीकडेच भोईवाडीतून आम्ही वर फिरलो. भोराडच्याच्या दाराचा वहाळ पार करून मोकळवनात आलो तो नाणेघाटाने दर्शन दिले. नानाचा अंगठा म्हणून ओळखला जाणारा काळा सुळका पायथ्यातून झाडीने भरलेले ओहोळ खाली पाठवत होता तळातल्या गर्द झाडीत तो मिसळला होता त्यामागे जीवधन, धाकोबा सायकिरणात नहात होता.

घाटमार्ग सापडला असला तरी ३०० मीटर उंची गाठायची होती महाराष्ट्राच्या प्राचीन राजाच्या सातवाहनाच्या पावलावर पाऊल टाकून आम्ही घाट चढू लागलो. पक्ष्यांच्या मधुर आलापात, वनश्रीच्या थंडाव्यात मानवरचित चिऱ्यावर वाटेतच तेजोनिधी माथेरान मागे बुडला.

माथ्यापाशी गुहा भेटताच सर्व सुखावले. अग्नि प्रज्वलित झाल्यावर गुहा प्रकाशमान झाली. शिलालेख सातवाहनाच्या कुलाची कहाणी बोलू लागले हे लेख इसवी सन पूर्व १०० वर्षं खोदलेले असून ब्राह्मी लिपीत आहेत सर्व मूर्ति नाहीशा झालेल्या आहेत सातवाहन राजा व त्याच्या राण्या, राजपुत्र याच्या त्या मूर्ति होत्या. शिलालेखात त्यांची नावे व कर्तृत्व नोंद केलेले आहे

जकातीचा रांजण, पेशवेकालीन गणेश व इतर स्मारके या बघणीय वास्तु आहेत पण नानाच्या अंगठ्यावर जाऊन सृष्टीचे विराट दर्शनही घेण्यासारखे आहे.

नाणेघाटातील मुक्काम कायम स्मरणात राहणार आहे अन् त्या सांस्कृतिक ठेव्याची दुर्लक्षता आठवून मन विषण्णही होणार आहे.

महा तासाच्या चालीने देवळे-निमगिरी-हडसरवाडीतून हडसरगडात प्रवेश केला अद्वितीय असा २ मीटर रुंदीच्या पायऱ्याचा प्रवेश मार्ग. नंतर दुसरे प्रवेशद्वार. दुर्गशिल्पीपुढे मान तुकवावी असेच ते कर्तृत्व आहे

माथ्यावर बाटोळे तळे अन् पलीकडे महादेव मंदिर आहे. तळघा-घेजारच्या टेकडीवर रान माजलेले आहे पुनश्च निमगिरी, जीवधन, नाणेघाटाच्या विहंगम दृश्याने मने सुखावली पण नजर खिळविली शिवनेरीनेच.

हडसर उतरलो ते दक्षिणेकडील नळीच्या वाटेने धावत पळत माणिकडोह गाठले धरणाने हे सर्व कुकडी खोरे पाण्यात बुडले आहे गडाच्या पायथ्याशी कुकडीच्या लाटा उधळतायत, पुढच्या समृद्धीची हितगुजे करीत.

दोन तासांच्या चालीने शिवनेरीचे नैॠत्य टोक गाठले. चढण फारशी नव्हतीच सरळ फुटक्या तटबंदीतून आत पाय ठेवला.

'ठयरो !' आम्ही दचकून थाबलोच. शिवजन्मस्थानी असा अनधिकृत प्रवेश पाहून एखादा मावळा तर जिवत होऊन आला नाही ना ! पण एका पुष्पवाटिकेतून सरकारी रखवालदार पुढे आला तेव्हा हायसे वाटले.

शिवनेरीचा आकार बाणासारखा आहे. त्याचे अग्र रोखले आहे उत्तरेकडे दोन्ही बाजूना ३० मीटर कातळपट्टा आहे, तर दक्षिण बाजू अगदीच सोपी पण सात दारानी संरक्षित आहे. शिवाई भवानीचे देऊळ याच बाजूला तर शिवछत्रपतीचे जन्मस्थान उत्तर भागात आहे जिथे फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ मध्ये शिवजन्म झाला याच्या अली-कडेच जिजाऊ स्मारक आहे. जिथून पूर्वेला जुन्नरकडे साखळीची वाट उतरते आणि सर्वोच्च टोकावर मुघल राजवटीविरुद्ध वड करणाऱ्या कोळ्यांचे स्मारक आहे.


१६३७ साली तहात शिवनेरी व इतर दुर्ग शहाजीराजानी मुघलांकडे दिल्यानतर स्वतःचे जन्मस्थान शिवाजी महाराजाना स्वतत्र करता आले नाही हे दुर्दैवच पुढे छत्रपति शाहूने तो मानस पुरा केला.

चार दिवसात पाच दुर्ग अन् दोन घाट आरोहण करून झाले होते. परतण्यासाठी पाय व मन दोन्हीही तयार नव्हते. पण जुन्नरात पोचलो होतो तेव्हा शिवनेरी पुन्हा आमच्यापासून विलग झाला होता चिरंतन शाश्वत जगाकडे लक्ष ठेवून कारण आमच्यासारखे कितीयेक तिथे आले होते ....गेले होते ...!

□ □

# १४. रायगड डोंगरयात्रा

रायगडचा पायी मार्ग खडतर तर आहेच, पण आनंददायीही आहे. जिद्द आणि थोडी सवय याच्या जोरावर सर्वसामान्यानाही हा मार्ग चोखाळायला हरकत नाही. गाडीमार्ग रायगड सुमारे १३० कि. मी. पडतो, तर पुण्यापासून सरळ रेषेत तो अवघा ६० कि. मी. आहे आणि यातील पानशेत किंवा वेल्हे या गावापर्यंत एस टी ची सोय आहेच. म्हणजे जास्तीत जास्त ४० कि. मी. पायी चालून रायगड गाठता येतो सोबतच्या नकाशात चार मार्ग दाखविले आहेत हे चारही उन्हाचा त्रास सोडला तर निसर्गरम्य आहेत वेल्हे किंवा पानशेत दोन्ही ठिकाणाहून सततच्या चालीने एका दिवसात रायगड गाठता येतो. पण दोन टप्प्यांत केल्यास हा प्रवास अधिक सुसह्यही होईल.






— = डांबररस्ता
'\\ — डोंगररांग

या चारही मार्गांपैकी कावल्या घाट आणि मढे घाट हे काहीसे लांबचे पण मार्ग सोपे आहेत तर बोचेघोळ बोराटा-सिंगापूर या जवळच्या पण किंचित् अवघड वाटा आहेत

या चारही मार्गांची ओळख थोडया शब्दात करणे कठीण आहे.

## पानशेत–कावल्या घाट–रायगड

पुणे–स्वारगेटहून तासा-तासाने पानशेत एस टी आहे सध्या लालाजीसागरमध्ये फक्त एकच नौका रोज सकाळी ५॥ वाजता सोडली जाते. ती उन्हाळ्यात माणगावपर्यंत जाते भाडे एक रुपया इथून नदीकिनाऱ्याने १ तासात 'टेक-पवळे'; टेक पवळ्याहून बरीच चढाई. धारमाथ्यावर रायगड दर्शन होते पुढे आंबीच्या धनगरवाडी• हून गारजाईवाडीला उतरावे तेथून अर्ध्या तासाने कावल्या घाटमाथा डावीकडे कोकण दिव्याचा डोंगर. कावल्या घाट दाट झाडीतून उतरत गेला आहे. पायथ्याशी कोकणातले सांदोशी. उतरण ३ तासांची. इथून छत्री निजामपूरपासून रायगडचा चढाव सुरू होतो रायगडवाडी नाना दरवाजाने गडमाथा.

## पानशेत–बोचेघोळ–रायगड

माणगावपाशी नाव सोडल्यावर एका देवराईतून चढण निवगुणे• गावानंतर घाटमाथा येतो पुढे डावीकडे घिसर गावाकडून वाट येते. प्रत्यक्ष खानु गाव उजवीकडे खोलगटात आहे. घाटमाथ्यावर खानूचे धनगरवाडे आहेत. 'खानुचा डिगा' इथून घाटाचा उतार सुरू होतो. खोलगटात इंग्रजी व्ही आकाराची खिंड दिसते तिथून घसाऱ्याची बारीक उतरण नतर एके ठिकाणी कडयातून वाट खोदलेली आहे. दुसऱ्या टप्प्यात गर्द झाडीतील एका ओढ्यातून वाट उतरते. हेदमाची• वरून 'वारगी' हे 'काळ' नदीकाठचे गाव. हा घाट उतरण्यास सुमारे ३॥ तास लागतात. ही वाट किंचित् अवघड म्हणता येईल. वारगीहून पुढे छत्री निजामपूरमार्गे रायगडवाडी आणि गडमाथा

## वेल्हे-सिंगापूर-बोराटा-रायगड

वेल्ह्यास स्वारगेटहून एस टी. गाडी. पुढे कोदापूरपर्यंतही एक एस. टी. जाते कोदापूरहून तसेच पुढे कानंदीच्या डाव्या किनाऱ्याने घिसर गावापाशी रायदड डोंगर चढला की धारमाथ्यावरून खानुचा डिगा गाठता येतो. पुढे बोचेघोळीने रायगड

कोदापूरहून कानदी नदी ओलांडून एक टेपाड चढले की गेवढे गाव. कोदापूरला गाडी नसल्यास वेल्हे–वेल्हे पेठ– वागदरीला येऊन पुढे कळंबनाथ, सिद्धनाथ या प्राचीन पण पडक्या देवळापासून थेट गेवढ्यापाशी यायला सरळ वाट आहे तोरणा गडापासून घाटापर्यंत एक सलग डोंगरधार आहे. हिच्या एका दांडावरच गेवढे गाव. गेवंढ्यातून चढण घेत धारमाथ्याच्या थोडे खाली उजवीकडे वळणे. इथून कधी माथ्यावरून तर कधी थोडे खालून नागमोडी वाटेने जननीचे देऊळ तीन तासांत गाठता येते. वाटेत वाघ्याचा धनगरवाडा आणि हरपुडचेही वाडे लागतात.

जननीपासून तसेच पुढे मोहरी गावावरून उतरत गेले की रायलिंग टोक इथून लिंगाणा अगदी जवळ तर रायगड दूरवर दिसतो. मोहरी सोडल्यावर रायलिंग टोकाच्या अलीकडेच डावीकडे बोराटा नाळ आहे. म्हणजे ओढा यातून दीड दोनशे मीटर उतरल्यावर ओढा सोडून उजवीकडे कड्याच्या पोटात फिरायचे कड्याच्या पोटातील वाट अवघड आहे अगदी बारीक आहे. हे दोनशे मीटर कापले की डावीकडे लिंगाणादुर्ग, उजवीकडे रायलिंग टोक या खिंडीतून पलीकडे ओढ्यातून उतरत लिंगणमाची गाव तिथून 'पाने' गावात उतरावे. गाडीमार्गाने वारंगी अन् पुढे रायगड. पानेहून 'वाघेरी' मार्ग टकमक टोकाखालूनही रायगडवाडी गाठता येते.

जननीपासून डावीकडे खोलगटात 'सिंगापूर' हे गाव इथून १५ मिनिटावरच नाळ सुरू होते एक ओढा ओलांडला की कड्यातून वाट. पुढे झाडीतून उतरत गेल्यावर एका आंब्याच्या झाडापाशी दोन वाटा. एक वाट तशीच खाली उतरत 'दापोली'स जाते. येथील 'वाळणकोंड' हा 'काळ' नदीतला डोह बघण्यासारखा. दुसरी वाट उजवीकडे वळते.

लिंगाणा दुर्गाच्या खालच्या पदरातून त्याला उजवीकडे ठेवीत लिंगणमाचीच्या पठारातून पुढे 'पाने' गावी उतरते.

वेल्हयाहून तोरणा गडावर जाणाऱ्यानी कोकण दरवाजाने बुधला माचीवर उतरावे. उजवीकडे अर्ध्या तासानतर वाळंजाई द्वार आहे इथून खाली 'भट्टी' गावी उतरून पुढे 'गेळगान'च्या वाड्याला चढून तोरणा-मोहरी धार पकडावी, गेवड्याच्या वरच्या बाजूस आले की पुढे उत्तम वाट आहे.

## वेल्हे-मढे घाट रायगड

कावल्या व मढे घाट हे दोन जुने वाहतुकीचे मार्ग आहेत. वेल्हे-वेल्हे पेठ, वागदरी--भट्टी तोरण्याच्या उजवीकडची कानद खिंड ओलाडून पुढे केळद गावापर्यंत एस. टी रस्ता आहे. एस्. टी. पुण्याहून दुपारी सुटून केळदला मुक्काम करते. सकाळी तेथून निघून परत येते. अन्यथा वेल्हे-केळद पायी चार तासाचा मार्ग केळदला 'अन्नछत्र'ही नाव आहे.

केळदपासून अर्ध्या तासावर मढे घाटाचा उतार सुरू होतो. अतिशय सोप्या उताराचा ओढा. निम्म्या टप्प्यानतर वरीच सपाटी. इथे डाव्या हातास कर्णवडी गाव. पुढे पुन्हा सोप्या उताराने पायथ्याचे 'वाकी' गाव वाकी ते दहिवड ३--४ कि. मी. कोकणातील सपाटी. दहिवड हे बिरवाडी-सादोशी एस.टी मार्गावर आहे दहिवडहून वाळणमार्गे मागरूणपाशी सांदोशीचा रस्ता सोडून डावीकडे वळायचे. वाघोली गावातून चढण चढले की 'माच' लागते. इथे वस्ती पुढे पोट-ल्याचा डोंगर अन् रायगड यामधील खिंड. पुढे 'गडगा' इथे घरे नतर एक वाट वाळसुरे खिंडीत उजवीकडे. पुढची सरळ जाणारी वाट पाचाड गावी वाळसुरे खिंडीतून महाद्वाराने रायगड माथा. या वाटेने रायगड दक्षिणेकडून पाहता येतो

सामान्य माणसानी एकदा पायी जाऊन येताना एस. टी गाडी पकडणे ठीक पण डोगरयात्रेकरूनी मात्र कावल्या घाटाने जाऊन वारादयाने परतावे किंवा मढे घाटाने जाऊन सिंगापूरने परत यावे रायगड यात्रेचे खरे पुण्य लाभेल.

□ □

# १५. हरिश्चंद्रगडच्या परिसरात

सह्याद्रीतील काही परिसर असे आहेत की तिथे पुन पुन्हा गेल्याशिवाय गिरीप्रेमीना चैन पडत नाही हरिश्चंद्रगडची मोहिनी अशीच अवर्णनीय आहे याच्या परिसरातील काही वेधक डोंगराकडे मात्र फारसे कुणी फिरकत नाही. आम्हीदेखील हरिश्चंद्रगडाचा मोह एकवेळ टाळला आणि मगच आळेफाटा – खुबी (माळशेज) मार्गावरील पिंपळगावला उतरलो स्वच्छ निळे आकाश. घाटावरून येणारे थडवारे सुखावह होते

गाव थोडेसे आत होते. फाट्यावर एक चहापानगृह होते आणि दूधकेंद्रही. तयारी झाल्यावर चहा पिऊन पाव खाऊन आम्ही पिंपळगावचा खडीरस्ता चालू लागलो कुंजरगडचा पत्ता कुणीच सांगू शकत नव्हते. गॅझेटियरने हरिश्चंद्रच्या पूर्वेस एवढाच ढोबळ उल्लेख केलेला. पुष्पावती नदीत फारसे पाणी नव्हते. पात्रातील कातळावरून पडल्या पडल्या पश्चिमेला माळशेज घाटानजीक रोहिदास डोंगर ठळकपणे दिसत होता त्याच्या डावीकडे खुबी गावाजवळचा सिंदोळगड आपला कातळमाथा उचावत होता, तर रोहिदासजवळ हरिश्चंद्रगडही लक्ष वेधत होता. गडापासून निघालेली डोंगररांग एखाद्या भिंतीसारखी पश्चिम-पूर्व पसरली होती खड्या कातळामुळे ती कुठ ओलाडता येईल असे वाटत नव्हते. पण ती पार केल्यावरच कुंजरगडचा शोध आम्ही कदाचित् लावू शकणार होतो.

पिंपळगाव डाव्या बाजूला सोडले. आमच्या सराईत दृष्टीला समोरच्या रांगेतील एक घळ दृष्टीस पडली तिच्या पायथ्यापासून एक कमी तीव्रतेचा दांड होता. त्यावर आम्ही चढू लागलो छातीचे भाते झाले. घामाच्या धारा वाहिल्या. पायात गोळे आले आणि आम्ही वरच्या खिंडीत पोहोचलो. दगडी रचीव पायऱ्या चढल्यावर दगडात कोरलेली वाघोबाची मूर्ति दिसली. उपा भिडे, साठे व बाळकृष्ण सैं

यांचे कॅमेरे डोळे मिचकावू लागले. दक्षिणेला हटकेश्वरचा करवती डोंगर त्याच्या उजवीकडे हडसरगड, निमगिरीगड आणि सिंदोळागड.

हरिश्चंद्र रांगेतून वाळुबाई डोंगराचा फाटा ईशान्येला फुटून निघाला आहे या दोन्ही रांगांमधील मांडवी नदीचे खोरे उत्तरेला पसरले होते. त्यापलीकडे आंबेदरा आणि वाळुबाईचा डोंगर उचावला होता खोऱ्यात कोपरे गाव दिसत होते

'कुंजरगड आम्ही कदी ऐकला न्हाई बा, पण कोंबड किल्ला म्हून एक फोफसंडीच्या वरच्या अंगाला हाय" असं म्हणत एकाने खोऱ्याच्या शेवटी बोट दाखविले डोंगराचे जग फसवे असते फोफसंडी गाव अगदी जवळ दिसतेय म्हणून आम्ही उत्साहाने निघालो खरे पण कोपरे गावाच्या पुढे चार तासाच्या चालीनंतरही फोफसंडी जेमतेम दृष्टि-पथातच आले मात्र मांडवी नदीच्या वैशिष्ट्यपूर्ण दरीने आम्हांला गुंगवून सोडले. अर्ध गोलाकार वळणं घेत दोन्हो बाजूचे कडे छेदीत ती वहात होती खोल पाण्यात त्या कड्याचे प्रतिबिंब छान दिसत होते.

छान सावली असलेला कातळ झिरपून साठलेले पाणी. मंडळी लगेच पहुडली. काळ्याकभिन्न कड्यावरून आमची दृष्टि वर गुराख्या-कडे गेली तो अंगठ्याएवढा दिसला आधीच्या रात्री पुणे नाशिक रातराणीतील हलत्या झोपा आणि आता पोटपूजेनंतरची थंड सावली यामुळे सर्वच त्या शांत निसर्गात काटे-किड्याची पर्वा न करता कातळा-वर पाठ टेकवून वामकुक्षी करू लागले

जाग आली तेव्हा उन्ह कलली होती आणखी तासाची चाल फोफसंडीत पोहोचली (खुबी, कोल्हेवाडी मार्गेही येथे येता येईल.)

आम्ही कुंजरगडच्या पायथ्याला पोहोचलो होतो चहूबाजूंनी उंच डोंगररांगा. मांडवीचे वेडवाकडे खोरे. एस टी गाठायची म्हणजे ४ ५ तासाची वाट तुडविणे आले फोफसंडीकरांना त्यामुळे आमचे कौतुक वाटले. त्यांनी आग्रहाने दिलेला चहा आम्ही नाकारू शकलो नाही.

कोंबड किल्ला किंवा कुंजरगडची चढाई चांगलीच उभी होती. माथा आमच्या चढाईसोबत उंच उंचच जात होता वरच्या टप्प्यात नद्रू पागेने मुसंडी मारली. दक्षिण टोकावरील घाट शोधून तो फुटक्या तटातून वर पोहोचला हरिश्चंद्रगडच्या तारामती शिखरामागे सूर्य दडू पाहात होता. जबरदस्त वारं सुटलं होतं. सरपण गोळा करून आम्ही पाण्याच्या टाक्याशेजारी पथाऱ्या पसरल्या. चुलीवरचे गरम अन्न पोटात गेले, पण दुखणारे अंग, टोचणारे खडे आणि बोचणारे थंड वारे यामुळे झोपा पळाल्या. बाळाजी देशपांडे मात्र आश्चर्यकारक रीत्या घोरत होता चांदण्या किती वेळ मोजणार. शेवटी सर्व उठले आणि शेकोटीभोवती गोळा झाले

चंद्र मावळून सर्वत्र अंधार पसरला. पण सृष्टीच्या रम्य उमलण्याची ती नांदी होती हळुहळू एक एक झाड, दगड उजळू लागला. समोर बाळूबाईचा डोंगर आमच्यापेक्षा शंभर मीटर उंच होता तो ओलांडून किरणे कुंजरगडावर आली.

बहुतेक गिरिशिखरे उजळली होती. दऱ्या मात्र अजून सावलीत होत्या. पश्चिमेला हरिश्चंद्र पर्वताची दोन शिखरं त्याच्या उजवीकडे एका अंगठ्याला सोबत घेऊन कलाडगड. त्या पाठीमागे साधले घाटाचा कोंबडा आणि उजवीकडे अजोबा डोंगर अजोबापासून एक रांग पूर्वेस पसरली होती. भात मुडा, घनचक्कर आणि शेवटी शिरपुंजाचा 'भैरवगड'. या रांगेच्या मागे कळसूबाई, अलंग, कुलंग, मदन हे डोंगर दुर्ग दृष्टीस येत होते.

गडमाथ्यावर राजवाड्याचे अवशेष आहेत. उत्तर भागात एक कातळात खोदलेली चौकोनी भुयारवजा खोदाई आहे. उत्तरेच्या राजमार्गाने खाली उतरलो. पायऱ्या संपल्यावर एक गुहाही इथे आहे. गडाला उजवीकडे ठेवून प्रदक्षिणा घालीत गडाच्या पश्चिमेला असलेल्या खिंडीत गेलो चिंचोळ्या नाळेतून वाट उतरलो तळ गाठेपर्यंत धामधूम झालो. एका मोकळ्या मनात सहज कुंजरगडाकडे दृष्टि वळविली मात्र, आम्ही आ वासला. एखादा जंगली हत्ती झुलत समोर उभा रहावा तसा कुंजरगड आपल्या काळ्या पत्थरांना उभारून खडा होता.

आम्ही आता नगर जिल्ह्यात होतो. कोतूळ-कोथळे टोलारखिंड रस्ता 'विहीर' गावापाशी भेटला. कोथळ्याची वाट तळे गावी सोडली आणि भैरवगडाकडे जाण्यासाठी आम्ही मुळा खोऱ्याकडे वळलो. मुळा नदी सर्पाकार वळणे घेत होती. तिला कित्येक ओढे निरनिराळ्या ठिकाणी मिळत होते. डोंगरानी अरुंद घळई निर्माण केली होती माथ्या-वर कातळ भिंतीची मालिका

खोऱ्यात उतरलो उष्मा वाढला होता. त्यामुळे झऱ्यावर चतुष्पाद प्राण्यासारखे ओणवे होऊन पाणी प्यायला आम्हाला दिक्कत वाटली नाही. शिसवद गावातून टळटळीत दुपारी वाटचाल सुरू केली. रान तुटलेले होते. दांडावरची लाल वाट तापली होती. वीस मिनिटांच्या चढणीनतर सपाटी आली. शिरपुंजे गावची गाडीवाट लागली. पुढे तिची सखी कुमशेत गावची भेटली. दूर क्षितिजावर अजोबा डोंगर! त्यापासून निघालेली घनचक्कर राग आमच्या उजवीकडे याचेच शेवटचे टोक भैरवगड. रस्ता तापला होता. रबरी तळवे पायाना चटके देऊ लागले.

भैरवगड आणि घनचक्कर यामधील खिंड आता स्पष्ट झाली. त्या खिंडीतूनच गडाची वाट होती. खिंडीकडून येणारा ओढा रस्त्याने पार केला की डाव्या अंगाला जानेवाडी, तर उजव्या अंगाला खिंडीत जाण्यासाठी उत्तम वाट होती पण आम्ही चुकून अलीकडेच रानात घुसलो ती ढोरवाट आहे लक्षात यायला उशीर झाला. उघड्यावर आलो तेव्हा दोहो बाजूनी उंच कडे माथ्याकडे झेपावले होते दगडधोंड्याची नाळ मध्ये होती खिंड गाठण्यात दम उखडला. पलीकडे तशीच नाळ शिरपुंजे गावची होती. बारक्या पायऱ्यांवरून उजवीकडे भैरवगडात प्रवेश केला तेव्हा पिट्टू खांद्यात खोल रुतल्या होत्या. घनचक्करच्या मागे सूर्यास्त होत होता उत्तर कड्यातील भैरोबा लेण्यात पोहोचेपर्यंत अंधारले

चूल पेटविली त्यावर खिचडी ठेवून आम्ही दुखऱ्या पायाना शेक देत बसलो. होळी पौर्णिमा! गडमाथा गूढ दिसत होता. दोन्ही बाजूना खोलवरच्या गावागावातून होळ्या पेटलेल्या होत्या. आम्ही

लेण्यातल्या भव्य खंडोबाच्या मूर्तीकडे अर्धवट्याने बघत झोपी गेलो. खिडीतून घनचक्करचा ३० मीटर कडा चढण्यासाठी दिलीपचे पाय शिवशिवत होते. तो अवघड कडा चढला की घनचक्कर, मुडा, गार अशी १५०० मीटर उंचीची पठारे पार करून कातावाई खिडीतून रतनगडाकडे एक दिवसात जाता येते.

कड्याची चाचपणी केली आणि आम्ही धडधडा नाळ उतरलो. जानेवाडीच्यापुढे एका वाडीजवळ आंबितच्या पेठवाडीची वाट धरली तेव्हा दूरवर कलाडगड दिसत होता.

"चला आपण बुवा त्या तिथे झकास ताणून देणार" बाळाजीने दाखविलेल्या जागेकडे आम्ही बघितले. मुळा नदीचे विहंगम दृश्य आम्हाला सुखावून गेले. नदीतला डोह. डोहाच्या काठावर गर्द झाडी, ओल होती पांढरे बगळे विहरत होते. नदीपलीकडे उंचावर कलाड-गड दुर्गाने पेठवाडीला तळहातावर तोलले होते दुर्गाला लागून एक 'अंगठा' आणि त्यामागे हिरवागार हरिश्चंद्रगड. अक्षरश. पळत वाट उतरलो. चहाची सोय करेपावेतो बाळाजी आणि जयंत तुळपुळे जांभळाच्या गर्द सावलीत, ओल्या मातीवर केव्हाच वामकुक्षी करू लागले होते.

कलाडगडची वाट माहीत नव्हती नदी ओलांडून रानातल्या एका छानशा वाटेने कलाडगडच्या परिसरात पोहोचलो डावीकडून वळसा घालीत गडाच्या भिंताडाना न्याहाळीत निघालो. शशी हिरेमठने वाट शोधली. ती सरळ वर गेली होती. तापलेल्या कड्यातील बारक्या पावट्यांनी थोडासा त्रास दिला. कड्याची उंची बरीच होती अचा-नक त्यातून एक मुंडास डोकावल. कानात मोठी भिकवाळी. चेहऱ्यावर ७० वय दाखविणाऱ्या सुरकुत्या डोळे पाणीदार. त्या गुरवबुवांनी गारगोट्या घासून विस्तव पेटविला चिलीम त्यावर पेटवीत आमचे स्वागत केले.

मग त्याच्याबरोबरच सर्वोच्च माथ्यावर गेलो. संपूर्ण मुळाखोरे आणि घाटमाथा दृष्टिपथात येत होता. नकट्या डोंगराजवळ साधले घाटाची खिंड. हरिश्चंद्राच्या कोकणकड्याची धार आणखी डावीकडे. हरिश्चंद्र वरून निघालेल्या मंगळगंगेचे खोरे मुळेच्या कापीव खोऱ्याला

मिळाले होते त्यानंतर भैरवखिंड, घनचक्कर, कात्राबाई अजोबा सुखवीत होते

कलाडगडच्या 'अंगठा' घसाऱ्यामुळे चढणे अवघड जाईल असे वाटते. पदरातून-मंगळगंगा खोऱ्यात उतरता येईल किंवा वाघरानाच्या खिंडारातून कोकणकड्याच्या माथ्यावर जाता येते.

मुळेचे खोरे अत्यंत निसर्गरम्य आहे हरिश्चंद्रगडाची वाटचाल त्यामुळे आम्ही रमतगमतच करीत होतो. मुळेच्या काठाने थोडेसे जाऊन उजवीकडे वळलो

खिंड ओलांडून मंगळगंगेच्या खोऱ्यात प्रवेश केला कलाडगडचा अंगठा हुबेहूब 'थम्स अप्' दिसत होता. त्याकडे पाठ करून तीव्र चढण घेत पाचनईत आलो तेव्हा दिवस मावळला. झपाझप पावले उचलली. गणेशधारेचा उंच कातळ डावीकडे ठेवून कड्यातली पट्टी पार करेपर्यंत मंगळगंगेतील तारामतीच्या न्हाणीपाशी अंधार पसरला.

चहूबाजूंनी डोंगरावरचे किर्र रान. चंद्र अजून वर यायचा होता. दगडधोंड्याच्या वाटेने अंदाजे चढावरील वाटचाल सुरू केली. रानकोंबड्याचा आवाज किंवा कुठे खुसपूस झाली की धस्स होई. रानात झिरपणारे चांदण पाहिलं आणि हायसे वाटले आणखी थोडा नेट लावला आणि मोकळ्यावर आलो. मंद वाऱ्याने शिरशिरी आली आणि सर्वांना वाचा फुटली. चांदण्यात हरिश्चंद्रगड पर्वत नखशिखांत भिजला होता रातकिड्यांची किरकिर आम्ही मंत्रमुग्ध होऊन ऐकू लागलो देऊळ आता फार लांब नव्हते तारामती शिखरावरून ते हुडकता आले.

टोलारखिंडमार्गे खिरेश्वर आणि मग खुबीला पुन्हा रस्त्यावर आलो आणि त्या परिसराचा निरोप घेतला परत जायचे की नाही याचा मात्र विचार करायला हवा. सुट्टी जोडून आली की लोंढेच्या लोंढे हरिश्चंद्रगडाकडे धावतात गड जितका गलिच्छ आणि ओंगळ करता येईल तितका करतात. बाटल्या फोडून अविवेकी मनाला मोकळे सोडतात पूर्वीचा शांत, निसर्गरम्य, पवित्र हरिश्चंद्रगड दुरावत चालला आहे.

❑ ❑

# १६. तळकोकणातील डोंगरयात्रा

नकाशावर दृष्टि फिरविताना एकदा लक्षात आले की सह्याद्रीच्या दक्षिण भागातही काही उच्च डोंगर उभे आहेत – ज्यांचे पायथे वनबागांनी झाकलेले तर माथे तटबद्ध केलेले दुर्गम दुर्ग.

गोमंतकाच्या सीमेवरील तळकोकणाची निसर्गश्रीमती आणि अबोलीच्या सौंदर्याची सदाहरित वर्णने डोळ्यासमोर होतीच यष्टीच्या चाकावरून आमचे पाय तिकडे वळवायला आम्ही फारसा वेळ घेतला नाही. यष्टीत नेहमीप्रमाणेच खेचाखेची. कोल्हापूरहून गारगोटीमार्गे 'पाटगाव' गाठले

घाटमाथ्याची जाणीव पाटगावात उतरताक्षणी झाली. फणस, आंब्याची गर्द वनश्री, कौलारू घरावर छत्र. गार वाऱ्याच्या झुळुका. प्रसन्न आणि प्रसन्न !


पाटगावाजवळ सह्याद्रि रांग खूपच वळणे घेत पसरली आहे. फोंडे घाटापासून सरळ दक्षिणेला येताना पाटगावापाशी मात्र चांगली १५/२० कि मी ची वेलांटी तिने आखली आहे

या वेलांटीच्या टोकापाशी कोयरीसारखा रांगणागड उभा आहे उत्तरेच्या द्रोणासारख्या कोकणभागात नरसिंहगड (सोनगड) आणि भैरवगड हे समोरासमोर ठाकलेले तर दक्षिणेच्या द्रोणाकृतीत मनोहर-मनसंतोष हे जुळे दुर्ग नावे सार्थ करीत खडे आहेत.

पाटगावात शिवकालीन मौनीमहाराजाचा मठ आहे भद्रकालीचे मंदिरही बघण्यासारखे

आधी लिंबू टिंबू उरकावेत या दृष्टीने आम्ही 'घोटगे' घाटाच्या वाटेला लागलो. १॥ तासात घाटधार आलोही. सह्याद्रीने आपला तळहात डावीकडे उघडला होता. त्यावरील हिरव्या वनराईत सिद्ध

डोंगराचा उंचवटा दुसरीकडे नरसिंहगड आणि भैरवगड जवळजवळ आमच्याच पातळीत होते. दोन्हीही लिंबू-टिंबू नव्हतेच. ५०० मीटरच्या चढाया त्याही कोकणातून कराव्या लागणार होत्या.




८ दिवसांचे ओझे पाठीवर सांभाळीत घोटगे घाट उतरताना तिरपीट उडाली. घोटग्याच्या मुख्य वाडीतील महापुरुषाचे देऊळ आम्ही कसेबसे गाठले. देवळातल्या फरशीवर आमचे घामाने चिंब ओले आकार उमटले.

गाव उतरत गेलेलं. मुख्य रस्त्याकडेने घरे वसलेली. पण कडक उन्हामुळे घराबाहेर कुणीच नव्हते. एक म्हातारी कृश व्यक्ति मात्र देवळाच्या दिशेने झपझप पावले टाकीत येत होती. अंगावर गुडघ्यापर्यंत नेसलेले केवळ एक धोतर त्याचा सोगाच डोक्यावरून घेतलेला, बरगडी मोजता येत होती.

'पोरांनो ! कुठनं आलाव ? चला माझ्या घरात ! इथ कशाला

उषा भिडे कुणालाही आपलंस करून घेण्यात पटाईत थेट चुलीपाशी ती मोकळेपणाने भिडू शकते. 'आजोबा, आम्ही तुमच्या गावाकडचे डोंगरीगड बघायला आलोत–पुण्याहून'

'सोनगड–भैरवगड कसले ढेकळाचे ! रांगणा बघा, गडात गड रागणो.'

अण्णांचे सस्नेह आमंत्रण नाकारताना पुरेवाट झाली आणि भर उन्हातच आम्ही भैरवगडाची वाट धरली.

शेतातील रानामुळे आसमंतात अधिकच उष्णता दाटली होती. घोट घोट पाण्याने घशाला ओल देत हठयोग्यासारखी वाट चालू लागलो

नरसिंहगड किंवा सोनगड उजवीकडे ठेवीत नरडव्याची भेदेवाडी दमत भागत गाठली. भैरवगडचा डोंगर कारवीच्या झाडोऱ्याने लपेटलेला होता पश्चिम दांडावरून धापा टाकीत वर पोहोचलो माथा चिंचोळा, तटबंदी फारशी नाही. पूर्वांगाला भैरवाचे कोकणी पद्धतीचे देऊळ

सायंकाळ होत आली तेव्हाच थकावा भासू लागला. सह्याद्रीची रांगही आता डोळे निववू लागली पूर्वेची सोपी वाट पकडून आम्ही पुन्हा भेदेवाडीत उतरलो. विहिरीजवळच्या घराच्या अंगणात मुक्काम टाकला

प्रफुल्ल घाणेकर इतिहासज्ञ आणि वनस्पतीशास्त्रज्ञ त्यामुळे गावकऱ्यांची मनं जिंकायला फारसे प्रयास पडले नाहीत.

पहाटे डोळा किलकिला करताच सोनगडाचा माथा उजळलेला दिसला. सह्याद्रि ओलाडून सूर्यकिरणांनी तो गड खरोखरीच सोनेरी केला होता.

भेदेवाडीकरांना रामराम करून त्याचे अगण स्वच्छ करून पुढे प्रस्थान ठेवले. ओढ्यातून दगडगोटे तुडवीत खोरे ओलांडीत सोन-गडाच्या दुर्गवाडीत जाईतो उकाड्याने जीव उबले. आणखी दीड तासाने आम्ही सोनगड चढून माथ्यावर थकून पहुडलो.

सोनगडात पाण्याचा टिपूस नव्हता. झाडीमुळे थोडाफार गारवा.

भैरवाची छोटीशी मूर्ति याखेरीज गडपण शून्य. दुर्गसाखळीत एक ठाणे एवढेच सोनगड-भैरवगडचे महत्त्व.

सोनगडाचे एक नाकाड सरळ घोटग्याच्या वेशीत उतरले आहे. त्यावरून चटके खात उतरलो. पायांना फोड येणेच बाकी राहिले होते. ओढ्याच्या डोहात आम्ही स्वत.ला झोकून दिले आणि म्हशी जशा स्थिर दृष्टि ठेवून पाण्यात बसतात तसे आम्ही कितीतरी वेळ ओढ्यात पडून राहिलो.

आम्ही आलो आहोत हे अण्णांना कसे कळले कोणास ठाऊक ! कडकडीत उन्हात अण्णा ओढ्यावर आले होते. भारी धैर्यवान हो तुम्ही पण रागणो जावयास मी एक माणूस बघून ठेवलाय. भारी रान, जनावर आहेत तुमास काही झाल तर या अण्णांच्या तोंडात लोक शेण घालतील ते !

वाटाड्याची आम्हांला गरज नव्हती. पण अण्णाची आपुलकी लाथाडणेही शक्य नव्हते. पुढच्या दिवशी घोटग्याच्या भटवाडीतून आम्ही पुन्हा सह्याद्रि चढू लागलो. अण्णा निघताना पाणावलेल्या डोळ्यांनी म्हणाले "जपून जावा. गेली २५ वर्षे आमच कुटुंब अंथ-रुणाला खिळून आहे नाहीतर खर मीच तुम्हांला सोबत यायला हवं."

तळ्याच्या पाजेने घाटमाथा गाठला. सर्वत्र घनदाट जगल सामोरे आले त्यातील 'आंब्याच पाणी' आकंठ शांति देऊन गेले.

सपाटीवर आलो आणि चक्क ट्रकरस्ता लागला. जिथे केवळ गवांड आढळणार तिथे कोळसा कंत्राटदारांनी ट्रकची वाट केली होती.

जिथे आम्ही अरण्यमित्रांच्या खुणा शोधीत अरण्य वाचू शकलो असतो तिथे परिचित टायरखुणा बघाव्या लागल्या 'पर्यावरण' केवळ पुस्तकात, प्रत्यक्षात बेसुमार जंगलतोड

सिद्ध डोंगराच्या पायथ्यात मात्र जगल टिकून होते. खिंडीमार्गे पश्चिम माथा गाठणे सोपे होते जांभ्या दगडातील काही नैसर्गिक गुहा बघत आम्ही सर्वोच्च माथ्यावरील कातळावर पोहोचलो. पिटात बसून सिनेमास्कोप दृश्य पहावं तसं एक विस्तृत दृश्य समोर पसरले.

पश्चिम क्षितिजावर एक अखंड निळी रेषा पसरली होती. तिथपर्यंतचा कोकणभूभाग लख्ख दिसत होता. पायथ्याला सह्याद्रि रांग वेलांटी घेत रांगणागडापर्यंत भिडली होती.

पूर्वेला भूधरगड, दक्षिणेला मनोहर–मनसंतोष–महादेवगड आणि उत्तरेला नरसिंह–भैरवगड दर्शन देते झाले हवा छान होती. कातळा-रोहणाचा थरार अनुभवण्यासाठी मुबलक जागा जवळ होत्या. पण पाण्याचा अभाव आणि 'गडात गड रांगणो'चे आकर्षण यामुळे सिद्ध डोंगर उतरून पुन्हा जगलपट्टीत आलो.

चिकेवाडी तब्बल चार तासांनी आली आणि तिथून अर्ध्या तासात घाटमाथा.

रांगणादर्शनाने आम्ही हुरळलो आम्ही मानेसारख्या भागावर उभे होतो धारेपुढे रांगणा डोंगर डौलात उभा होता. दोन्ही बाजूंनी खोल कोकणात असलेल्या दऱ्यांत हिरवी गर्दाई होती रांगण्याचा माथाही अद्यापही हिरव्या कुंचल्याने रंगलेला होता नशीब आमचे!

इकडून प्रवेश सुलभ असल्यामुळे उत्तम तटबंदी बांधून गड संरक्षित केला आहे. दारातून आत गेल्यावर गडाचा विस्तार दृष्टीत भरला. रांगणाईच्या देवळाच्या ओटीवर पाल टाकले. जवळ पाणी होतेच. पूर्वेला पूर्णचंद्रमा वर आला होता चुलीवरच्या खिचडीच्या नुसत्या वासाने आम्ही सुखावू लागलो प्रत्यक्ष चवीने जागच्या जागीच आडवारलो.

चकुचकुऽऽ करीत रानमिश्र साद घालीत होते  रातकिडे किर-किरत होते पण त्या विस्तृत एकाकी दुर्गावर  आम्ही  चौघे  प्रसन्नपणे निद्राधीन होतो.

जागही कोल्हेकुईनेच आली. खरे म्हणजे दुर्ग एक दिवस राहण्या-सारखा. दक्षिण टोकावर कोकणाचे दृश्य सुखद. हवा  चाखीत पहुडणे किंवा रानवाटा धुंडाळत तटावरून भटकणं यात दिवस सहज स्मरणीय होईल.

रांगण्याबाहेर आलो.  पश्चिमेकडील  वाट  नारुरच्या  दुकान-वाडीस जाते. आम्ही चिकेवाडीवरून तांब्याची वाडी गाठली. सिद्धाचा डोंगर आमच्या डावीकडे ठेवीत 'हणमते' गावापर्यंत सुखात  चाललो. वेदगंगा  खोऱ्याच्या  शेवटी सह्याद्रीच्या ऐन धारेवर  हणमते वसले आहे.

मनोहर-मनसंतोषकडे जाण्यासाठी हणमंने  घाट  उतरू लागलो. मारुतीच्या देवळापासून घाटमाथा सुटला आणि पुन्हा  एकदा  दाहक निसर्गाच्या तडाख्यात सापडलो. वाशी-अंजीवडे  ही  घाटपायथ्याची गावे मागे टाकली  तेव्हा  दुपार  टळली  पण घामाच्या धारा थांबत नव्हत्या.

निसर्गश्रीमती केवळ डोळ्यांनाच जाणवत होती पऱ्ह्याचं पाणी, माडा पोफळीच्या बागा, नितांत स्वच्छ वाड्या, जागोजागी पाणथळी.

एकदाचे शिवापूर  आले.  गाव  अतिशय  देखणे  सह्याद्रीच्या पायथ्याशी अंतर्भागात हे वसले आहे.  मनोहरगडाने  सह्याद्रीपासूनच निघालेल्या  एका  धारेवर  ठाण मांडले आहे  शिवापूरच्या  भैरोबा देवळापर्यंत त्याची नाकाडं उतरली आहेत

सावंतवाडीहून येणारा गाडीमार्ग एका  चिंचोळ्या  भागातूनच मनोहर-मनसंतोषच्या पायथ्या पायथ्याने शिवापुरी थडकतो.

सकाळी हवा दमटच होती. मनोहरगडच्या मनोहारी निसर्गाचा त्यावर इलाज नव्हता. अवघ्या दीड तासाच्या चढणीत नाकीनऊ आले. माथा त्रिकोणी. सदर व पाण्याचे कोरडे टाके  याशिवाय  अन्य वास्तु नाही. पश्चिम टोकावर उभे ठाकलो तर पलीकडे ५० मीटरवर  मन-

संतोषगड दिसला. सरळसोट कडे आणि धोकादायी घसारा, दगड-मातीनें बनलेला.

प्रकरण अवघड होते तरीही प्रयत्न करण्याचे ठरविले. मनोहरच्या कातळकड्याना उजवीकडे ठेवीत बारीक नागमोडीनें मनो-मन खिंडीत पोहोचलो

दिलीप निंबाळकरची सराईत दृष्टि मनसंतोष चाचपू लागली. खिंडीकडे ठिसूळ कडा होता. कडा डावीकडे ठेवीत आम्ही पुढे गेलो. कंबरेला दोर बांधून दिलीप पुढे झेपावला. कड्याचे दगड सुटत होते. धोका जाणून २० मीटर चढून तो परतला

खिंडीतून आता कडे उजवीकडे ठेवीत आम्ही पुढे सरकलो. अचानक पायऱ्या गवसल्या. मातीनें झाकल्या गेल्या होत्या. आशा पालवली पण क्षणभरच !


पायऱ्या तुटल्या होत्या. पाऊलवाट कड्याला चिपकली होती. माजरपावलाने आम्ही पुढे सरकलो. पण पाय जणु तापल्या तव्यावर होते चटक्यामुळे शाळेतील कदमताल आठवू लागलो उपलब्ध सामग्रीनिशी मनसंतोषचे गिर्यारोहण शक्य नव्हते. पाच मीटरवर माथा सोडून आम्ही पुन्हा शिवापूराकडे उतरू लागलो.

सुजलेले आणि पोळलेले पाय ठसठसत होते ते पुन्हा परत न येण्यासाठी. पण आमच्यातला गिर्यारोहक मनसंतोषचा माथा झुकवायला कधी ना कधी पुन्हा शिवापूराकडे पायाना वळवणार हे निश्चित.

□　□

# १७. निवडुंगाचे डोंगर

कितीही दूरवर पाहिले तरी सर्वत्र माळ दिसत होता. भुरी माती, दगडगोटे अन् त्यावर फक्त निवडुंग तग धरून होते. या पृष्ठभूमीवर उभी होती अनेक कातळशिखरे ! ही सातमाळा रांग. पथराच्या वर दुर्गांची बांधणी यात झाली आहे. याशिवाय तितकीच इतरही शिखरे इथे आहेत.




पायथ्यापासून माथा अवघा तीनसाडेतीनशे मीटर. पण भिंतीसारखे उभे कातळ माथ्यावर चढताना जेरीस आणतात. यातीलच कांचना, कोळदेहेर, राजदेहेर, इंद्राई आणि चांदवड या पाच गिरिदुर्गांचा समूह आता आमच्या डोळ्यासमोर होता. यांची बांधणी मुसलमानपूर्वकालीन निश्चित पण अनेक राजवटींचा साजही त्यावर चढलेला. मनमाडहून चांदवडमार्गे देवळे गावच्या गाडीतून आम्ही खेळदरी फाट्यापाशी उतरलो होतो.

समोर दिसत असलेल्या भाऊड खिंडीच्या डावीकडे दुसरे शिखर होते कांचनगडाचे. पहिले बाफाळचाचे. कांचना हा खरा जुळा गड. या

दोहोंच्यामधील खिंडीची दिशा पकडून आम्ही वाट तुडवू लागलो. सुमारे दोन तासातच नागमोडी चढ चढत आम्ही कांचनाखिंडीत पोचलो उजवीकडे पिंडसदृश शिखर होते त्याच्या पोटातील दहा टाकी जणू अमृतकुंभ घेऊनच पुढे आली. पोटपूजा करून गुहेबाहेर पडलो.

काचनमाथ्याला खिंडीतून उत्तम वाट आहे. विजय महाजन, रवि पालकर, दिलीप निंबाळकर आणि नाशिककर हे इतर मित्र होते. पश्चिमेला अचला-अहिवत-सप्तशृंगीपर्यंत पसरलेली डोंगरांची रांग आम्हाला सुखवून गेली. कांचनचा सुळका वेळेअभावी सोडून आम्ही परत खिंडीत आलो पश्चिमेच्या भागावर चांगली वाट उत्तर अथवा खानदेश बाजूने आहे. दक्षिणेची पायऱ्याची वाट उद्ध्वस्त आहे. हा माथा अधिक विस्तृत व देखणा आहे. एक थडगे, काही वास्तुअवशेष, गुहा, टाकी येथे आहेत पाच वाजता काचना सोडला. खेळदरी फाट्याकडे दौडत निघालो. अजस्र काळ्या पत्थरातील सौंदर्यवान् शिल्प पाहायचे असेल तर, काचनाला भेट द्यायलाच हवी. विहिरी-शेजारी मोकळ्यावर पथाऱ्या पसरल्या. चुलीसाठी तुरीच्या वाळक्या काटक्याच उपलब्ध होत्या.

रात्री चांदणे सर्वत्र पहुडले होते मंद वारा गीत गात होता. कांचनापासून निघालेली रांग कोळदेहेरवरून इंद्राईपर्यंत उचावली होती पाठीला टोचणाऱ्या खड्यांची पर्वा न करता त्या रांगेकडे बघत निद्रिस्त होण्यात सुख होते

पूर्वा किलकिलली आम्ही रस्ता ओलांडून तिरक्या वाटचालीत वाकणात प्रवेशलो जुन्या गावाचे अवशेष, हनुमंत मूर्ति असे सर्व मागे गेले. ओढ्याच्या काठाने छोटीशी हिरवी पठारे चढीत समोर दिस-णाऱ्या उत्तरखिंडीत पोचलो खिंडीतून पलीकडे गेले की खानदेशा-तील कापशी गाव आहे. कोळदेहेर डाव्या बाजूला तर राजदेहेर-वाडीची वाट उजवीकडे. कोळदेहेरकडे दोन टप्पे चढल्यावर एकावर एक दोन कातळपट्टे समोर आले कड्यात एक भेग दिसली मुद्दाम खोदल्यासारखी झपाट्याने चढत तिथे पोचलो तर पायऱ्याच गवसल्या. सपाटी नव्हतीच. गडाच्या मध्यात २०–३० मीटर उंचीचा

कातळमाथा उठावला आहे. याच्या पोटातील गुहेत आम्ही पसरलो. ऊन रणरणू लागले होते. माथ्याच्या पोटातून प्रदक्षिणा घालूनही पाणी हाती लागले नाही. माथा गाठण्याची वाटही मिळाली नाही.

दुर्ग सा खळीतला एक छोटा दुवा एवढेच याचे महत्त्व उवर-खिडीतून राजदेहेरची वाटचाल सुरू केली. दीड दोन तासातच सपाटी-वरून राजदेहेर डावीकडे अन् इन्द्राई उजवीकडे. अशा चिंचोळ्या खोऱ्यात आम्ही पोचलो. खोऱ्याच्या मध्यावर राजदेहेरवाडीशेजारी बांध घालून एक तलाव निर्मिला आहे. दोन्ही गड त्यात आपले प्रति-बिंब न्याहाळतात.

काळ्याकभिन्न कातळकड्यांची मालिका बघत असतानाच असे निळे पाणी मनाला ओढ लावतेच. आम्ही अर्थातच तिकडे धावलो आमच्या उड्यांनी तलावातले पाणी उसळू लागले ते सायंकाळीच शांत झाले.

राजदेहेरचा माथा गांधी टोपीसारखा आहे. सर्व बाजूंनं ४०–५० मीटर उंचीचा कातळपट्टा वेढून आहे या पट्टयापर्यंत पोचणे तीव्र चढण अन् काटेरी जाळ्या यामुळे त्रासदायक आहे. पूर्व टोकाला वाडीच्या बाजूला १५ मीटर कड्यातील पायऱ्या इंग्रजांनी तासून काढल्या आहेत तिथे दारापाशी गावकरी दोर बांधतात दोराचा उपयोग करण्यापेक्षा आमच्या तंत्रावरच वर पोचण्याची इच्छा प्रबळ होती कड्याच्या पोटातून त्याला डावीकडे ठेवीत वायव्य टोकापाशी पोचलो. ऐंशी अंशात वाकून उभा होता तो कडा ! अंगावर काही ठिकाणी निवडुंगाची झाडे लेवून बसलेले त्याचे कभिन्न स्वरूप मनात किंचित् दचका भरवीत होते. माथा सुमारे ९० मीटर उंचीवर आभाळ स्पर्शतोय. चढणमार्ग अगदी नाकाडाने आहे. डोळे वळवले तर दृष्टि सरळ दोन तीनशे मीटर गोता खाईल.

विजय ४० मीटरवर गेला तेव्हा दोर संपत आला होता एक छोटासा आधार मिळताच त्याने स्वतःला जखडून घेतले (अँकर) दिलीपला तो साहाय्य देऊ लागला. दिलीपला तिथे पोचण्यास अर्धा

तास लागला. माथ्याचा अंदाज त्यांना तिथूनही येत नव्हता. या पद्धतीने आम्ही सर्व अंधाराच्या आत वर चढणे अशक्य होते.

कड्यावरच्या त्या दोन ठिपक्यांना निरोप देऊन आम्ही पूर्व दाराखाली आलो. ४०–५० मीटर उंच क्षोणवता कडा दोराला पकडून चढणे किती अवघड असते ते अनुभवल्याशिवाय कळणार नाही. अनेक वेळा प्रयत्न केल्यावरच आम्ही वर चढलो. सामान दोराने वर ओढले. विजय-दिलीप अवघड कडे चढत तटबंदीखाली पोचले. तिथून तट उजवीकडे ठेवीत नागमोडी चालीने तटाच्या फुटलेल्या भागातून आत आले.

राजदेहेरचा माथा सुंदर आहे. खडकाळ आणि गवताळ असे त्याचे मिश्र रूप आहे. एक मोठा तलाव, सुबक गुहा आणि एक मुसलमानकालीन इमारत व पीर या गडावरच्या वास्तु. इमारत पूर्व टोकाकडे आणि तिला तीन कमानी आहेत.

पहाट उगवली ती धुक्याचा स्पर्श देऊन. राजदेहेर–इंद्राईच्या दरीत मुलायम धुके पसरले होते. त्यामागे हिरवट–काळसर इंद्राई आळसावल्यासारखा लांब पसरला होता. उत्तरेकडे चौल्हेर दुर्ग, तर वायव्येला साल्हेर-मुल्हेर विविध रांगांतून दृष्टीस येत होते.

दोर असल्याने सरसरत उतरणे अवघड नव्हते. राजदेहेरवाडीतून उसाच्या मळ्यातून खोरे ओलांडले. इंद्राईचा चढ साधारणच होता. मधल्या टप्प्यात इंद्राईचा कातळ माथा उजवीकडे ठेवून वळसा घातला. इंद्राईचा कोपरा उभ्या कड्याचा असला तरी दुरवरूनही त्यातील खोदीव वाट स्पष्ट दिसत होती. राजदेहेरच्या विरुद्ध अंगाला ही वाट आहे.

मारुतीच्या मूर्तीजवळून वर चढत गेलो तो कड्याचा पायथाच लागला. खोदीव उंच पायऱ्यांवरून चढताना गोळे येत होते. वाटेत १ ओळीचा फार्सी लेख खोदलेला दिसतो तर दार पूर्णपणे उद्ध्वस्त. राजदेहेरच्या दारापाशीही एक फारसी लेख आहे.

माथ्यावरून गोदावरी खोऱ्याचे जे सुरम्य दर्शन झाले, ते अविस्मरणीय. राजदेहेर, कोळदेहेर, कांचना, त्रिखारा, धोडप, रवळ्या,

जंवळच्या, मार्कंडेय, सप्तशृंगी, अचला, अहिवंत अशा दुर्गमोत्यांनी सातमाळा गुंफली होती. दक्षिणेला साडेतीन रोडगा, चांदवड दूरवर अणकाई–टणकाई आणि पश्चिमेला पसरले होते गोदावरीचे सुपीक खोरे.

असा हा इंद्रगड. उत्तम तलाव, पुरातत्त्वदृष्ट्या महत्त्वाची लेणी, सुरेख हवा असूनही उपेक्षित राहावा हे त्याचे दुर्दैवच.

रोडगा व इंद्राई याच्यामधील तसराळ्यासारख्या दरीत उतरलो तेव्हा दुपार कलली होती.

उतारावरून भराभर उतरत मुंबई-आग्रा रस्त्यावर डोंगराच्या जगातून बाहेर आलो. पण पलीकडचा चांदवड शिल्लक होता. अर्थात् चढाई सुरू केली वाटेत चंद्रेश्वर महादेव हे अहिल्यादेवी होळकरांनी बांधवलेले देऊळ आहे. जवळच उत्तम तलाव होता. पाण्याचे टाके होते. संध्याकाळी त्या प्रसन्न स्थळी आजूबाजूचे डोंगर निरखीत आम्ही पहुडलो ते मुक्कामासाठीच.

पहाटेच्या गार वाऱ्यात मंदिरामागेच चढणीला लागलो. चढण तीव्र होती. चांदवडही कड्याने परिवेष्टित पठार आहे चांदवड गावाच्या बाजूला या कड्याची उंची सर्वांत कमी यामुळे इथे पायऱ्या खोदून मार्ग बनविलेला. इंग्रजांनी या पायऱ्या तासून काढल्या. यामुळे आता प्रस्तरारोहण हे एकच उत्तर चांदवड दुर्गाच्या आव्हानाला देता येते

गवत कापणाऱ्यांनी लावलेला दोर समोर होताच. दोराचा उपयोग करून पहिले ३ मीटर चढल्यावर पुढे खोवणी पकडीत आरामात वर चढता आले.

माथ्यावर लांबचलांब सपाटी, वास्तु अवशेष बरेच चांगले पाणी नव्हतेच. तळातले चांदवड गाव एखाद्या चित्रातल्यासारखे स्तब्ध दिसत होते त्याचे दोहो बाजूंनी दोन रस्ते एकत्र येऊन, गाड्यांचा प्रवाह नाशिककडे घेऊन चालले होते.

चांदवड उतरून त्या प्रवाहात सामील होण्याशिवाय गत्यंतर नव्हतेच. भूतकाळात रमता येते, भविष्यकालाची स्वप्ने बघता येतात. वर्तमानकालात मात्र प्रत्यक्षच जगावे लागते.

□ □

# १८. सात पहाडांच्या सावलीत

आगटीची धग मंदावली तोवर पहाटेचा उजेड फुलारला होता. काळोखात डुबलेले संगमनेर स्थानक प्रकाशले अन् गजबजलेली इगत-पुरीची एस.टी प्रवरेच्या काठाने निघाली. राजूर, कातळापूर मागे गेले अन् रंधा धबधब्यापाशी चार भरगच्च पिशव्या घेऊन गाडीतून खाली उतरलो. आठ दिवसाच्या धकाधकीत टिकून राहण्यासाठी घेतलेल्या सामानाचे ते ओझे होते दख्खनच्या पठारावर सह्याद्रीचा माथा म्हणून उचावलेली कळसुबाई राग दूरवर दिसत होती. अनेक दिवस ऐकलेले माथ्याचे कौतुकच आम्हाला आज इकडे घेऊन आले होते


प्रवरेचा निळाझार प्रवाह खोलवर कोसळत होता. दहा कि.मी. पश्चिमेला तिच्यावर बांधलेल्या भंडारदरा तलावाच्या भोवतालीच सात पहाड उभे आहेत. त्यातील सहाना लटबंद करून दुर्ग बनवलेले तर कळसुबाई मात्र मुक्तपणे उभी आहे. या साती पहाडांच्या सावलीत गर्द वनश्री अन् माथ्यावर तुडुंब पाणी आहे. माथ्यावर जाणे मात्र अत्यंत अवघड अर्थात् यातलीच थरारकता पुन:पुन्हा या पर्वताकडे आरोहकाना ओढून नेते समोर पावरगडचा माथा टप्प्याटप्प्याने उंचा-वला होता. पावरच्या उत्तर पायथ्याच्या गुहीरे गावात एक तासा-भरात पोहोचलो. आमची नजर पावरचे खडकाळ कडे अजमावू लागली.

'गडावर काय काय आहे दादानु!'


"बहिरोबा आहे, पाण्याचे हौद अन् गडदापण पर हे ओझे घेऊन नाही जमायच एक सायब असाच मधूनच परतला" साती पहाडाच्या पायथ्याला आमची अशीच बोळवण झाली अर्थातच त्या सायबाचे अपयश धुवून काढण्याच्या उद्देशानेच आम्ही गुहीरे सोडले. दोन तासाची तीव्र चढण पावरच्या माथ्यावर घेऊन गेली. पहिला पहाड बाकला होता.

# गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून

'मढीमहाल' कडा – ऑर्थर सीट, महाबळेश्वर ढवळ्या घाटाच्या माथ्यावरून



'चद्रगड' ढवळ्या घाटाच्या तळात




# गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून



अजस्त्र पहाड,
दुर्गशृंखला
→ कळसुबाई
रांग

भंडारदरा धरणाचा विस्तृत जलाशय पार तळात गेला होता. पण त्यामागची कळसुबाई रांग अधिकच आभाळात गेली होती.




सह्याद्रीत रतनगडापासून निघालेल्या बाळेश्वर रांगेचे पाबर हे उत्तर प्रसरण माथ्यावर वेताळ अन् बहिरोबा ही देवस्थाने. गडावर एकूण पाच हौद. माथ्याखालच्या खडक भिंतीत गुहाही आहेत.

तटबंदीच्या काही खुणाच याचे गडत्व दर्शवितात. इतिहासाच्या पानावरही याची केवळ एक ठाणे म्हणूनच नोंद आहे

तासाभराने रध्यापाशी संगमनेर–इगतपुरी गाडी जणू आमच्या-साठीच समोर उभी राहिली आणि वाटेत बारी गावापाशी उतरलो तेव्हा चार वाजले होते.

कळसुबाई शिखरावर कलती उन्हे पडली होती. त्यामागचे किरणांचे वलय अंधुक होत गेले अन् आम्ही पायास गति दिली आणि संध्याकाळच्या वेळी चढणीस प्रारंभ करणाऱ्या आमच्याकडे बारीकर आश्चर्याने पाहातच राहिले.

बारीतून दोन वाटा आहेत. गुराची वाट लांबून जाते. तेव्हा धाकट्या कळसुबाई शेजारून सरळ नाकाडाने वर चढणारी वाट आम्ही पकडली. दिवसभरच्या रगीमुळे सरावलेले आमचे पाय एका लयीत पडू लागले अन् मग कातळकडा लागला साखळदंड असला तरी पाठचे ओझे छाती दडपत असताना चढणे अवघडच आहे.

साखळी पार झाली तेव्हा लख्ख चांदणे सांडले होते. माथा अजून कितीतरी उंच होता. आणखी पाऊण तासाची चढण चढलो तेव्हा वाटे-वरील विहीर लागली. चुलीसाठी लाकडे इकडे कोणत्याच माथ्यावर नाहीत तळातून घेऊन जाणे चांगले वाळके गवत अन् काटक्यांवर क्याऊम्याऊ झाले अन् पिशवी परत चढवली खांद्यावर।

महाराष्ट्राचा हा माथा म्हणजे दहा मीटर उंचीच्या कातळाचा समूह त्यावर कळसुबाईचे मंदिर. दूरवर नाशिक शहरचे दिवे लुक-लुकत होते ! शांत वारा अन् आम्ही निद्रेत डुबलो.

आकाशाचे दार किलकिले झाले मंदिर जेमतेम चारजण मावतील एवढे आहे. देवळाशेजारी सर्वेक्षण खात्याने उभारलेला चौथरा आहे त्याची उंची १६५० मीटर.

वाढत्या प्रकाशाबरोबर बाजूची सृष्टीही उलगडत गेली भंडार-दऱ्यामागे पाबर, रतनगड अन् त्यामागे हरिश्चंद्रगड, नैऋत्येला सिद्ध-गड, पश्चिमला कळसुबाई–२, किर्डा, अलंग मदन, कुलंग अन् कोकणात

माथेरान, उत्तरेला इगतपुरीजवळ त्रिगलवाडी आणि त्यामागे त्रिबक, अजनी, हर्ष व भास्करगड तर पूर्वेकडे वितन, पट्टा, आड औंढा, दिसू लागले.

कळसू ही एका कोळयाची लहान मुलगी. जिने या सह्याद्रीच्या माथ्यावर जन्मभर तपश्चर्या करून हे शिखर 'कळसुबाई' म्हणून अजरा-मर केले.

तिच्या जिद्दीचे पोवाडे गातच हळुवारपणे माथ्यावरून उतरलो, अधिका-धिक कठीण पहाडाकडे वळण्यासाठी आमचे पाय आता सरावले होते. दुपारच्या कडकडीत उन्हात आंबेवाडी गाठली.

तिथल्या पारावर पडल्यापडल्याच आमच्या नजरा समोर गेल्या. कळसुबाई, बैलघाट, किर्डा, देव्हारा, नवरानवरी, अलग, मदन व कुलंग भेदक दर्शन देत होते तळात वृक्षसभार, माथ्यापाशी दोनशे मीटर्स प्रचंड कातळ ठोकळे अन् गरगरणाऱ्या दऱ्या, अशी त्याची अजोड रचना आहे.

पुजारामला सागाती घेऊन आंबेवाडी सोडली आणि कुलंगवाडी रस्त्यावरून भुसदिशी जंगलात घुसलो. मळलेली छान वाट होती. कुलंगची दाट सावली पडली होती मदन-कुलंगमधील दरीतून कातळ-कडा चढल्यावर घसाऱ्याची वाट ती चढून मधल्या माळावर आलो तेव्हा मदनमाथ्यावरील नेढयातून सोनाळ ऊन डोकावत होत.

कुलंगचा उत्तर दांड सरळ खाली आला आहे. त्यावरच्या तीव्र चढणीवर आमची ताकद झपाट्याने सपली वरचा दोनशे मीटर कातळ राहिला तेव्हा सूर्यानेही डोळे मिटले होते.

कड्यात सुबक पायऱ्या खोदल्या आहेत.

प्रकाश कार्येकर अन् दिलीप निंबाळकरची विजयी आरोळी ऐकू आली आणि मी व चंदु अभ्यंकरही भराभर वर गेलो.

अर्धवर्तुळाकार सपाटीवर चांदणे आरामात पहुडले होते. उजवीकडे वळली तो छोटीशी चढण माथ्यापासच्या गुहेत घेऊन गेली.

गुहा प्रशस्त आहे. दोन दालनाचे खोदकाम हजार वर्षांपूर्वीचे तर निश्चितच.

कुलगच्या पश्चिम टोकावर राजवाडा आहे. वाड्याच्या जोत्याची घडण रेखीव आहे. वाडा पेशवेकालीन, गडाच्या मध्य भागात ओळीने दहा हौद आहेत. एक गणेशाची भग्न मूर्ति टाक्याशेजारी आहे. पूर्व भागातही एका घळीत बांध घातलेला आढळतो.

पूर्व टोकापासून मदनगड जेमतेम पाव कि. मी. वर आहे. मदन-गड ओळखावा तो त्याच्या कड्यातील नेढ्यावरून. कुलग उतरून मदन व अलग यामधील खाडीत पोहोचलो तेव्हा सायकाळचे पाच वाजले.

मागे वळून पाहिले तो आलेली वाट डोळे ताणूनही दिसत नव्हती. कातळ अन् कारवीचे शब्दश. उभे कडे आमची पावले उमटून घेण्या-एवढे मऊ थोडेच होते.

'पुंजाराम, मदनगडची वाट कुठाय ?'

"गड येंगाया वाटच न्हाई. पायऱ्या तोडल्यात."

समोर दहा मीटर उंचीचा तासलेला कडा पाहून मोकळ्या पोटातला खड्डा अधिकच वाढला. कड्याखाली मोजकीच जागा होती आणि पाठीमागे ३०० मीटर खोल गरगरणारा नाला ! अतिशय थकावट आली होती पण हातपाय गाळून चालणार नव्हते. पुण्याच्या गिरिमहर्षि डॉ. पटवर्धनानी दिलेला दोर हातात घेताच मतरल्या-सारखाच उठलो. कड्यावर योग्य पकड मिळेपर्यंत किंचित् थरथर झाली पण मग व्यवस्थित वर चढत गेलो. पायरीला पडलेले बीळ गवसले आणि शेवटची दाब पकड वर घेऊन गेलो.

माथ्याच्या वर आणखी एक बीळ होते. त्यात प्रथम दोर बांधला अन् दुसरे टोक खाली फेकले. दोराचे साहाय्य असल्यामुळे चद्रु, दिलीप अन् प्रकाश तिघाना कडा चढणे थोडे सोपे गेले तरी त्यातली थरा-रकता कमी नव्हती. आमच्या निर्जीव पिशव्या मात्र न घाबरता दाराला बांधून वर आल्या अन् तोवर मावळतीची किरणे अलगचे पश्चिमेकड उलगडत होती.

माथा अजून उंचच होता. कड्याच्या डावीकडून नागमोडी वाटेनें मग पुढे पायऱ्यांपासून छोटीशी गुहा सापडली.

माथ्यावर पाणी गवसले, पण लाकडे नव्हती. तरीही दिवस-भराचा थकवा अर्ध्याकच्या खिचडीतदेखील विरला.

मदनगड मुख्यत कैदी ठेवण्यासाठी उपयोगात आणला गेला होता आणि कैद्यांना पळण्यापासून परावृत्त करण्याचे सामर्थ्य मदन-गडात निश्चित आहे. मदनच्या कड्यातील गडदेतून चांदणी वाटेनें खोल कुहरात डोकावताना त्या रात्री एक अनामिक समाधान मिळाले होते आहेत बहु परि यासम हाच !

उन्हानी धक्के मारले तेव्हाच उठलो. माथ्यावरून दिसणारा भव्य देखावा आमची वाटच पाहत होता पश्चिम टोकावरून पाहिले तर पलीकडे कुलंग पक्ष पसरून छाताड पसरून उभा होता. तर अलगची बळकट भिंत आव्हान देत होती.

पिशव्या पुनश्च पाठीवर चढविल्या. माथ्यावरची थोरली गुहा निरखली गाळाने भरलेल्या टाक्यातून कसेबसे पाणी मिळाले.

बिळातून दोर ओवून, सावधानतेने स्कंध-सरसरत पायथा गाठला. (शोल्डर रॅपेलिंग) दोर ओढून घेतला.

मदन-अलगच्या खाडीतून पुजाराम परतला अन् अलंगच्या वायव्य टोकाखालचा नागमोडी उतार झपाट्याने झाडीत घेऊन गेला उबराखालच्या पाण्यापाशी टेकलो असताना अलगचा पहाड अशक्यप्राय वाटू लागला होता. अलगच्या दक्षिण टोकापाशी एक सुळका आहे. याच्या जवळील साधारण तिसऱ्या खाचेतून गडाची वाट आहे. माळा-वरच्या गर्द झाडीतून पुढे कारवीशी झटापट करूनच त्या खाचेशी पोहोचलो तो पाच मीटर कातळ पुन्हा एक शहारा देऊन गेला.

कातळातील बेचकी पाहून गवतकर्तकांनी एक भला मोठा झाडाचा वासा तिथे उभा केला आहे जुन्या पायऱ्या इंग्रजांनी १८१८ मध्ये उद्‌ध्वस्त केल्या.

वरती चढून सामानही वर घेतले. समोर घडीव प्रवेशद्वार, वरती गणेशपट्टी इतक्या अवघड गडाला इतके उत्तम द्वार बांधले कुणी हे

मांगता येत नाही. दार चिणले असल्याने बाजूचा कडा चढल्याशिवाय आत प्रवेश होत नाही तासभराची भयाण नागमोडी अलंगच्या गुहेत घेऊन गेली. उन्हाच्या तडाख्यात कातळासारखेच आम्ही तापलो होतो. पण माथ्यावरच्या बारा टाक्यांनी थकवा अन् उकाडा केव्हाच पळवला. पाणी वाहून गुहेत नेले तोवर चंद्र वर आला होता मोहिमेतली चवथी रात्र. पाच कठीण पहाडावर विजय मिळविला होता

तयार अन्नब्रह्म केव्हाच फस्त झाले होते. धगधगणाऱ्या चुलीवर दुसऱ्या दिवशीच्या पोटाचीही सोय करणे भाग होते. रात्र वाढत होती. पण किलोभर ओझेही कमी झाल्याचे समाधान काही कमी नव्हते. पीठ, तांदूळ, मसाला, तेल, रॉकेल, चहाचे सामान, शिवाय न्याहारीसाठी रवा, पोहे असे रोजचे एक किलोप्रमाणे सात आठ किलोचे ओझे आमच्या पाठीवर वागवीत होतो.

इ. १७७६–७७ मध्ये धोंडो महादेव यांनी हे गड पेशवे सरकारात घेतले. त्याची नोंद अशी किल्ले अलग व मदनगड हे दोन किल्ले कोळ्यांपासून धोंडो महादेव याणी सरकारात घेतले. सदरील किल्ल्याचे बेगमीस कारसाई चूडवोढा वगैरे मशार निल्हेकडे देणे म्हणोन, तालुके कावनई निसबत परशराम त्रिंबक याचे नावे

कळसुबाई रांगेतून अलग दक्षिणेकडे चार किलोमीटर लांब पसरला आहे. गडाच्या उत्तर बाजूला आंबेवाडीची वाट आहे. पण इथल्याही पायऱ्या तोडल्या असल्याने दोरावरून सरसरतच उतरावे लागते. गडावर इतर किरकोळ टाक्याखेरीज बारा सलग टाकी एका खळग्यात आहेत याची खोदाई प्राचीन आहे टाक्यांशेजारी राजवाडा आहे त्याच्या पलीकडे उचवलाय सर्वोच्च माथा. याच्या पोटात गुहा, टाकी व काही ओबडधोबड मूर्तीही आहेत

माथ्यावरून आमचे डोळे आता दक्षिणेकडील रतनगडावर स्थिर झाले होते.

चढलेल्या वाटेनेच गड उतरून खालच्या माळावर येईतो दुपार झाली होती. अलगच्या दक्षिण टोकावर एक सुळका आहे. याला मधल्या माळावरून वळसा घालून प्रवरेच्या खोऱ्यात मोटेच्या डोंगरा-

अवळ उतरलो तेव्हा कळसुबाई रांग पाठीमागून निरोप देत होती. नवरानवरी खांड उंचच उंच गेली होती.

भंडारदरा–घाटघर रस्ता, शिंगणवाडी, धरणाचा फुगवटा भरा· भर मागे टाकून रतनवाडीत दाणदाण जाऊन पोहोचलो.

सगळीकडे शेकोट्या पेटल्या होत्या. उंचावरची थंडी इथे हळूच उतरली होती.

प्रवरेच्या उगमाकडील गर्द दाटव्यात अन् डोंगराच्या गराड्यात रतनवाडी वसली आहे. अमृतेश्वर महादेवाचे कोरीव मंदिर वाडीत आहे. एक पुष्करिणीही बघणीय आहे. दोन्ही बाराव्या शतकातले आहेत. येथे आमचे पाय आपोआप रेंगाळले अन् रतनगडाकडे मार्गस्थ व्हायला सकाळी दहा वाजले.

कळसुबाई रांग बोडकी, तर रतनगडच्या माथ्यापर्यंत वृक्षांची दाटीच. पूर्वीच्या मोळीच्या जागी कड्याला लोखंडी शिडी लावलेली आहे. एक लहानगे पण रेखीव द्वार आहे. रत्नादेवीची गुहा मुक्काम करण्याजोगी आहे.

गड सह्याद्रीच्या मुख्य रांगेत उभारला आहे. मध्यभागी कातळ· पट्टा. पूर्व भागात एक गोल बुरूज व एक टाके. उत्तरेकडे सामरदचे द्वार आहे पश्चिम भागात बरीच टाकी, अंधार कोठडी अन् कोकण दरवाजा.

माथ्यावरील नेढ्यातून अवघे कोकण नजरेत येत होते. पूर्वेला पाबर दुर्ग पुन्हा तोंड दाखवून गेला. दक्षिणेला कात्राबाई अन् अजा डोंगराचे काळेकभिन्न कडे पुढच्या वाटचालीची आठवण करून गेले आणि आम्ही गड सोडला.

गडाच्या वाटेवर मध्यातच सामरदपाचनई हा जुना रस्ता भेटला. वाटेतील पाण्याच्या टाक्यावरून झाडीत पावले शिरली. हरि· श्चंद्रगडावर रात्री पोहोचण्याचे मनात होते. कात्राबाई खिंडीपर्यंतची वाट सदाहरित जंगलातील आहे. समोर कुमशेतचा सुळका आभाळात

घुसला होता. त्याच्या पायथ्याला कुमशेतमध्ये पोहोचलो तेव्हा पाच वाजले होते.

या भ्रमणातील काही उत्कट क्षणात कात्राई खिंडीला मोठे स्थान आहे. मुळा खोऱ्यात आम्ही प्रवेशलो होतो पश्चिमेकडे अजोबा डोंगर निमंत्रीत होता, पण लोभस हरिश्चंद्रगडाची मोहिनी आम्हांस तिकडे वळवू शकली नाही.

भूपृष्ठात प्रचंड उलथापालथ होऊन मुळा खोरे वेड्यावाकड्या वळणांनी अन् खोल दऱ्यांनी बनले आहे. त्यातीलच एका दरीतील अंबितच्या वाडीला तासाभरात पोहोचलो होतो स्थ पाण्यात पडलेले डोंगराचे प्रतिबिंब पाहण्याशुभ्र बगळ्याने डहुळवले तेव्हा कुठे लक्षात आले अंधार चोरपावलाने येत आहे

अंधारात पाचनईची अर्थातच हरिश्चंद्रगडची वाट नेहमीप्रमाणे तेवढी पुढे गेलो अन् आम्ही एका उघड्या माळावर आलो. त्या दिवशी रानात रात्र काढण्याची हौस भुकेल्या पोटी चांगलीच जिरली.

झोप अन् थंग याचा रात्रभर खो खो चालला होता. स्वच्छ उजाडले तेव्हा हरिश्चंद्रगडाने अन् पाचनईनेही दर्शन दिले 'पाचनई' पार पूर्वेला गणेशधारेच्या तळात होती.

पाचनईच्या पुढे मंगळगंगेच्या उजव्या तीराने वर चढू लागलो पाय थकले होते पण ही शेवटचीच चढण होती.

गंगेच्या व्हाळातील हरिश्चंद्रेश्वर शिखर लवकरच डोकावले. चांगदेवासारख्या योग्याने नावाजलेले ते हे पुरातन स्थान.

गडाला तीन शिखरे, हरिश्चंद्र, तारामती अन् रोहिदास। रोहिदास तेवढे कोकणात आहे. हरिश्चंद्राला तट बांधून दुर्गम बनविले आहे तर तारामती हे सर्वोच्च शिखर उंची १४२५ मीटर.

शिखरावर एक शिवपिंडी आहे माळशेज घाट, नानाचा अंगठा. भिमगिरी, भैरवगड, जीवधन, सिद्धगड, अजा, बाळेश्वर रांग, कळसूबाई रांग एवढा विस्तृत देखावा दिसतो तारामतीच्या पोटातच विशाल गणेशगुहा आहे. अन् इथेच उगम पावलेल्या मंगळगंगेच्या पात्रासन

हरिश्चंद्रेश्वर हे पुरातन मंदिर आहे. केदारेश्वर हे गुहेतील स्थान आहे. जवळ रामतीर्थ आहे.


पण हरिश्चंद्रचे मोठे वैशिष्टय म्हणजे कोकणकडा हा अंतर्वक्र अन् अर्धवर्तुळाकार आहे. सरळ धार ५०० मीटर मावळत्या सूर्य-किरणात रौद्र सह्याद्रि इथून अधिकच गहिरा दिसतो. काळाकभिन्न महापुरुषच! सात पहाड वाकले होते, पण त्याची प्रेमाची सावली कितीतरी गद्द आपल्या पोटात साठविलेले थंड गोड पाणी, वृक्षराईचा गारवा त्यानी दिला होता. वज्रदेहावरील कठीण वाटावर त्यानी उदार होऊन तोलले होते या पहाडावरून उतरल्यावर हे पुन्हा गगनात शिखर उभवीत ताठ खडे राहणार होते. मस्तीत आव्हान देणार होते. अर्थातच पायथ्याला उभे राहिल्यावर त्यांचे आव्हान पेलवणार नाही असेच वाटणार होते आणि तसेच झाले टोलार खिंड, खिरेश्वर मार्गे मढ या माळशेज घाटानजीकच, गावापर्यंत जुन्नर गाडी पकडण्यासाठी दुसऱ्या दिवशी सहा तासांची दौड मारून आम्ही मागे न्याहाळतो तो हरिश्चंद्रगड कितीतरी उंच आभाळात घुसला होता


□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८८५
क्र. २५१७८
२५१११८
ग्रंथ शाखा (सदर प्रत)

# १९. सुळका लिंगाण्याचा – एक सभान साहस

रायगड जिल्ह्यात रायगडच्या पूर्वेला सह्याद्रीच्या मुख्य रांगेत उभ्या असलेल्या दुर्ग लिंगाण्याचा (९०५ मीटर) बेलागपणा १९७८ साली मुंबईच्या गिर्यारोहकांनी स्पष्टात आणला. तरीही लिंगाण्याचे दुर्गमत्व चिरंतनच आहे मात्र हे साहस आनंददायी ठरेल, ते काळजीपूर्वक अंगीकारले तरच



अशाच एका सन्मान चढाईची ही ओळख.

कितीही वेळा, कोणत्याही वेळी आणि कितीही वेळ न्याहाळा लिंगाण्याचे प्रथम दर्शन बधीर करणारेच असते. अती दूरवरून दिसतो तो केवळ काळाकभिन्न सुळका एका उच्च डोंगरावर रोवलेला, कुठलाही थाग न लागू देणारा! जवळ जावे तेव्हा कुठे त्याच्या अंगा-खांद्यावरील निरनिराळे टप्पे, खडपे, घळच्या, लिग्या, स्तंभ, झाडे झुडुपे यांची जाणीव होऊ लागते. तरीही हे सर्व दिसते ते एका ओळखा रेषेतच – अर्थात् असाध्यच!

असे हे दर्शन उत्तम घडते ते घाटमाथ्यावरील रायलिंग टोका-वरून. पुणे जिल्ह्यातील वेल्हे गावापासून ४ तास चालावे तेव्हा रायलिंगवर उभे राहता येते लिंगाण्याची अभेद्य भासणारी पूर्व बाजू समोर खोल दरीपलीकडे दिसते. उजव्या बाजूला पाठीमागे दूरवर रायगड दिसतो. तर उजव्या डाव्या हातांना सह्याद्रीचे करवती, काळे-काळ्या रंगातले सौंदर्य. लिंगाण्यावर चढण्याची ऊर्मि मनात येणाऱ्या प्रत्येकाने प्रथम लिंगाणा न्याहाळावा तो या इथूनच गिर्यारोहणाची जेमतेम मिसरूड फुटलेल्यांनी तरी हे ध्यानात ठेवायलाच पाहिजे. भावनेच्या भरात लिंगाणा चढायला येणाऱ्याचे हातपाय बहुधा इथे गळाठतीलच. पण अनुभवी सोबती असला तरी स्वत:चा सराव समोरचे २०० मीटर खडे आव्हान पेलायला पुरेसे आहे की नाही किंवा वेळप्रसंगी नेतृत्व स्वीकारण्याची क्षमता आहे की नाही हेही तपासावे आणि मगच पुढील पाऊल टाकावे. संघ चार जणांहून जास्त असू नये आणि सर्वांनी दोराचा उपयोग, आधार कोणता निवडावा, दोर साहाय्य (बिले BELAY) कसे द्यावे याचे ज्ञान आणि कडावरोहण करण्याचा सराव असणे आवश्यक आहे गिर्यारोहणाच्या साधनाशिवाय आम्ही चढाई केली अशी प्रौढी मिरविणे म्हणजे स्वत:ला फसविण्यासारखे आहेच. याशिवाय पूर्णत: एकानेच नेतृत्व करून चढाई पूर्ण करणे यातही खरीखुरी मजा नाहीच. 'सर्वप्रथम सुरक्षा' हा गिर्यारोहण खेळाचा मूलमंत्रच होय.

लिंगाणा सुळका चढण्यासाठी अद्यापपावेतो एकच मार्ग शोधला गेलेला आहे हा मार्ग आहे रायलिंगच्या दिशेने (पूर्व) कललेल्या धारेवरून

रायलिंग टोकावरून ओणवे होऊन पाहिले की ८० मीटर सरळ खोलवर डोळे गरगरत जाऊन स्थिरावतात, ते लिंगाणा आणि सह्याद्रि यामधील लिंगाण्याच्या खिंडीवर – हिच्या दोन्ही अंगांनी गर्द झाडीतून ओढे उतरत गेले आहेत. सह्याद्रीने या दोन्ही ओढ्याच्या हातांनीच लिंगाण्याला पुढे कवेत घेतले आहे. या खिंडीपर्यंतची समुद्र-सपाटीपासून सातशे मीटर उंची तशी सोपीच म्हणजे इतर डोंगरां-सारखीच लिंगाण्याच्या पश्चिमांगाला २० मीटर अधिक उंचीपर्यंतही सोपीच पण घसाऱ्याची चढाई लिंगाणावाडीकडून एका गुहेपर्यंत करता येते.

सातशे मीटर समतल रेषेच्या वरचा २०० मीटर भाग मात्र शिवलिंगाकृतीच आहे. रायलिंगच्या दिशेने ओळंबा सोडून जरा कल-लेली जी धार आहे तिचा उपयोग शिवकालातही या शिवलिंगावर चढण्यासाठी केला गेला आणि आताही हाच मार्ग चढला गेला आहे.

या कलत्या धारेचे नीट निरीक्षण केले तर खिंडीनंतर खडकांचे आडवे पट्टे आणि गवत झुडुपाचे भाग आढळतात यांतील पाचव्या टप्प्यानंतर एक गुहा दिसते. हृया गुहेला हत्तीच्या गंडस्थळासारख्या कातळकड्याने पोटाशी धरलेले आहे. याच पातळीत गुहेच्या विरुद्ध अंगाला पाण्याच्या तीन टाक्या आहेत तर पश्चिमांगाला सुळक्याच्या पोटात खोदीव कोठ्या आहेत लिंगाणावाडीकडील गुहेपासून तसेच पुढे पाण्याच्या हौदापासून एका झाडाच्या आधारे ढासळल्या पायऱ्या चढीत इथे येता येते. इथे पूर्वी कैदखाना होता. हणमंत बुरूज, जिभीचा पहारा इ दुर्गातील स्थानांची नावे आणि कैद्यांची नावे ऐतिहासिक कागद-पत्रात आढळतात. मात्र पश्चिमेची ही माची आणि पूर्वेकडील टाक्या यांना जोडणारा मार्ग मात्र पूर्ण उद्ध्वस्त आहे

लिंगाण्यावर पोहोचण्यासाठीचा सर्वांत अवघड अडथळा म्हणजे टाक्याजवळील हत्ती खडक. गुहेच्या विरुद्ध अंगाने टाक्यांकडून (राय-

लिंगवरून हा भाग दिसत नाही.) एका घळईतून या खडकावर चढण्या-साठी मार्ग आहे

यानंतर सपाट धारेवर दोन टप्पे चढले की शेवटचा ९ वा टप्पाही अवघडच आहे.

"एकावर एक लगोरीच्या सोंगट्या मांडाव्या तशी ही दहा टप्प्याची चढाई कठीण आहे ती मुख्यत्वे एकाच गोष्टीमुळे–चढताना दोन्ही बाजूंना दिसते ती भेडसावणारी शेकडो मीटर खोली." दिलीप-निंबाळकर आम्हांला रायलिंगवर हे सांगत होता आणि आम्ही प्रत्य-क्षात ती खोली बघतही होतो. शशी हिरेमठही दिलीपबरोबर लिंगाण्यावर पूर्वी चढलेला पण दोघेही लिंगाणावाडीकडून नागमोडीमार्गे मुख्य चढण मार्गावर आले होते. लिंगाणा खिंडीमार्गे तोपावेतो यशवंत साधलेंचा संघच गेला होता, आमच्यातला चवथा आरोहक आदित्य पोंक्षे हत्ती खडकापासून परत फिरला होता.

आम्ही अर्थातच दोर वापरणार होतो. आमच्या चुकीला दोरच क्षमा करू शकणार होता.

'मोहरी' गावात आम्ही बाबू मोरे यांच्या अंगणात विश्रांति घेत असताना आमचे दोर वगैरे साहित्य बघून बाबुदा म्हणाले होते,

"आमाला नायबा तुमच्यासारकं येंगाया जमायचं. दोराला धरून येंगायचं, तरीबी लै चढण हाये "

" दादा, आम्ही दोराला पकडून थोडेच चढणार आहोत. माकडं जशी हातापायावर चढतात तसेच आम्हीही चढणार. दोर फक्त संरक्षणाकरिता."

दुपार टळल्यावर मोहरी सोडली. घाटमाथ्यावरून लिंगाण्याचा फक्त वरचा सुळका दिसत होता. बोराटा नाळेत शिरल्यावर तो दिसेनासा झाला आणि दगडधोंड्याच्या ओढ्यातून हातपाय ढिले होईपर्यंत उतरल्यावर उजवीकडे एकदम पुढ्यातच आला.

उजव्या बाजूला रायलिंगची सरळसोट भिंत होती. डाव्या बाजूला आसनाळेचा शेकडो मीटर वहाळ आणि समोर लिंगाण्याचे २००

मीटर आव्हान निश्चल उभे होते. त्या अचेतनपणामुळे आम्ही बधिर झालो. कड्यातील आडव्या पन्हाळीतून लिंगाण्याच्या खिंडीत पोहोचे-पर्यंत लिंगाणा सूर्याला पाठीमागे दडवून दडपण वाढवीतच राहिला.

सर्व साहित्य आणि दोर तपासल्यावर, कंबरेला लटकविलेल्या कॅरॅबिनरमध्ये (धातू कडी) दोराचे टोक अडकवून दिलीप पुढे सरसावला.

निवडुंगाच्या खोडाचा आधार घेऊन शशी त्याला दोर पुरवू लागला. चढण मुरमाड घसारा आणि खडकटप्पे अशी संमिश्र होती. त्यामुळे हात दोन हात चढण्यासाठीही काळजी घ्यावी लागत होती. मार्ग साफ करण्याचे काम दिलीप करू लागताच मातीची ढेकळे अंगावर येऊ लागली चुकून जरी दगड आला तरी खैर नव्हती.

१० मीटर दोर पुढे सरकला, तेव्हा दिलीप माथ्याशी दिसणाऱ्या कड्यातील घळईच्या जवळ असलेल्या लिंगीकडे गेला होता. लिंगी आणि कडा यामधील फटीत शरीर जखडून तो वर चढू पहात होता. त्याचा डावा भाग आम्ही ओझरता पाहात होतो

उपडा असा खोल ध्वनि तिकडून आला. आम्ही नखशिखांत कापलो.

'मोठा दगड हातात आलाय रे! खाली टाकतोय, बाजू व्हा' आम्ही बाजूला होतोय तोवर वरून दगड सुटलाही. दगड सरळ खाली गेला नाही, तर पहिल्या टप्प्यात त्याच्या ठिकऱ्या उडाल्या आणि दोन तुकडे आमच्या कानाजवळून सणकन निघून गेले.

दिलीप लिंगीच्या पलीकडे गेल्यावर मात्र सफाईने वर पोहोचला. छोट्या झाडाच्या बुंध्याला त्याने स्वत:चा दोर बांधला आणि तो सुरक्षित झाला.

'पोहोचलो रे! अशी खाली साद आली.

'हापस रे! अशी आदित्यने आरोळी ठोकीत स्वत:च्या कंबरेला एक टोक बांधले. दोर भराभरा वर खेचला गेला आणि आदित्यपाशी ताणला गेला.

'मी आदित्य रे !' आदित्यने लोंबकळून दोर साहाय्य व्यवस्थित आहे की नाही हे तपासले.

'ठीक आहे, ये !' अशी वरून साद आली आणि 'चढतो रे!' असे म्हणत आदित्य चढू लागला

हळुहळू दिलीप-आदित्यमधील दोर शून्य झाला अशाच तऱ्हेने दोर साहाय्य घेऊन शशी आणि मी चढलो. पाठीवरच्या पिशव्यांनी लिंगीपाशी थोडा त्रास दिला पण इलाज नव्हता.

पुढचे दोनही टप्पे ६० अंश उताराचे पण जरा सोपे तरीही दोर वापरणेच श्रेयस्कर होते.

लिंगाणावाडीकडून येणारी नागमोडी भेटताच आम्हाला हायसे वाटले. खिंड चांगली २० मीटर खोल गेली होती प्रकाश कमी होतोय हे चढताना लक्षातच आले नाही. पण बघता बघता डोंगरउतार पिवळे बनले आणि काळवंडलेही. भराभरा दोर गुंडाळला आणि लिंगाणा उजवीकडे ठेवीत नागमोडीवरून गडाला वळसा घालीत लिंगाणावाडीच्या अगाच्या गुहेत पोहोचलो अंधारात खोलवर वाडी-तील दिवे लुकलुकत होते. गुहेपासून थोडा पलीकडेच कडा होता. पाण्याच्या टाक्यावर अंधारात जाणे म्हणजे कसरतच होती इतकी वाट नाजूक. खरे म्हणजे कुठेतरी दोराला लटकून टिचभर जागेत डुलक्या टाळीत बैठा मुक्काम करण्याच्या तयारीने आम्ही आलो होतो अथरूण-पांघरूण आदि सुखसोयी मोहरीतच सोडल्या होत्या. त्यामुळे गुहेपुढच्या सपाट कातळावर पाठी टेकविणे ह्यात स्वर्गसुखच मिळाले होते

चंद्राने लिंगाण्याचा सुळका सहज ओलांडला आणि चांदणे आमच्यावर पाझरू लागले. पापण्यांना स्पर्श करून चंद्राने आम्हांला खडबडून उठविले.

रानडे बंधूंचा संघ बाटाड्या बबन्याला घेऊन याच गुहेत मुक्कामाला होता (बबन्या हा एकमेव स्थानिक तरुण जो लिंगाण्या-वर चढू शकला आहे) त्यांची आवराआवर व्हायला वेळ होता. त्यामुळे आम्ही नागमोडी पकडून चालायला लागलो. आदल्या दिवशी

सायंकाळी नागमोडीची भयावहता जाणवली नव्हती. पण त्या उभळत्या पहाटे माथा झाकणारा कडा आणि तळ दिसू न शकणारी खाल दरी याच्या रेषेवर आम्ही भयचकित झालो होतो.

दोन मीटर भाग केवळ हाताच्या पकडीवर लटकत पार करून आम्ही पुन्हा खिंडीच्या माथ्यावर २० मीटर उंचीवर आलो. जोरदार थंड वाऱ्यानी आमचे स्वागत केले. रायलिंग खिंड आणि लिंगाणा यांची सावली लांबवर खानुच्या डोंगरावर पडली होती. त्या सावलीची उंची जसजशी उणावणार होती तसतशी आमच्या दृष्टीपुढील खोली वाढणार होती काल खिंडीपासून केलेल्या चढाईमुळे आमचे स्नायु रुळले होते. मात्र डोळ्याना अजून अशा खोलीची सवय व्हायची होती. दोर चार ठिकाणी विभागून आम्ही चौघेही त्या चार स्थानी दोरबद्ध झालो मात्र आम्ही एकाच वेळी हलणार नव्हतो. आमच्यातील तिघे-जण कायम सुरक्षित स्थानी असणार होते. दिलीप चढू लागला. पहिल्या टप्प्यानंतर एखादे उघडे पुस्तक उभे करून ठेवावे तसे दोन खडक होते. त्याच्या मध्यातून तो सफाईने चढला. त्याची पाठ, पार्श्वभाग आणि बुटाचे तळवे क्रमाक्रमाने अदृश्य झाले.

जेमतेम बसता येईल अशी तिरकी जागा त्याला मिळाली. कड्याला अल्लद स्पर्श करून वाकून वर न्याहाळले तर कड्यातला एक जाड खांब अंगावर झुकत होता. त्याच्या डावीकडील घळईतून वर चढायला जागा होती पण तो टप्पा उंच होता. त्यामुळे आहे तिथेच एका वर आलेल्या खडकाचा आधार घेऊन शशीला त्याने वर घेतले.

शशी सुरक्षित दोर साहाय्य देऊ लागला आणि दिलीप तिथून पुढे चढू लागला. घळईच्या दोन्ही बाजूवर हातपाय दाबीत तो खांबावर पोहोचला पण दिसेनासा झाला आणि ऐकूही येईनासा झाला.

वाऱ्याचा जबर आवाज आणि आघात होत होता दिलीप-शशी मधील दोर हेलकावत होता. त्यामुळे दिलीप पुढे चढतोय की थांबलाय हे कळत नव्हते. थोड्याच वेळानंतर दोराच्या ताणावरून लक्षात आले की दिलीप सुरक्षित आहे.

# गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून



पक्ष्याचा
डोंगर
कर्नाळा दुर्ग
◄

झुझार
टकमक टोक
रायगड
►



पहाऱ्यातून



सह्याद्रीतील
प्राचीन घाट मार्ग
'नाणेघाट' आणि
'नानाचा अगठा'
जिवधन दुर्ग
वादरलिंगी-
कोकणातून

शशीने मला व आदित्यला वर घेतले आणि तोही खांबावर दिसेनासा झाला. त्याला दिलीप दोर साहाय्य देत होता तर मी दोर पुरवीत होतो. इकडे मी आणि आदित्य जेमतेम जागेत बसलो होतो. आमच्या पायाच्या अगठ्यापासून डोळे ५०० मीटर दरीत झेपावत होते. कड्यातील भेगेतून छान गरम हवा मात्र सुखावह होती.

आदित्य खांबाच्या वर पोहोचला आणि पाठोपाठ मीही. घसारा आणि ढिल्या खडकांमुळे हा टप्पा 'जास्त अवघड' श्रेणीचा होता. डाव्या हाताला दृष्टि खोल भिरकावली जात होती.

चौघाना बसायला ती काही सुखकर जागा नव्हती. दोन्ही बाजूना खोल दऱ्या. खिडीपासून आम्ही आता ८० मीटर उंच आलो होतो. लिंगाण्याचे शिखर दिसत नव्हते

आता आदित्य पुढे निघाला. दिलीप दोर पुरवीत होता. उतार फारसा तीव्र नाही पण घसारा फार. वाटेत दोर ओवण्यासाठी झुडुपही नव्हते. खडकाचा एक ढिला टप्पा पार झाल्यावर तो हत्ती खडकाच्या पार्श्वात विसावला

झाडाला स्वतःला जखडून त्याने आम्हाला दोर साहाय्य दिले. ते २० मीटर पार झाले आणि मग प्रथमच आम्ही सर्वजण पूर्ण निर्धास्तपणे हत्तीखडकाला टेकून पाय पसरू शकलो.

समोर रायलिंग टोक आता समपातळीत येऊ पहात होते. तो प्रचंड कडा बोराटा नाळेपर्यंत पसरला होता. माथ्यावर मोहरीच्या जननीचे टेकाड उचावले होते थंड वाऱ्याने आम्ही गारठलो तेव्हाच उठलो पलीकडे एक मानवनिर्मित गुहा होती. छोटीशी पण बसून मुक्काम करण्याजोगी हत्तीखडकाला वळसा घालून पलीकडे गेल्यावर पाण्याची तीन टाकी मिळाली थैल्यातून आणलेला खाऊ खाऊन आम्ही पुन्हा सज्ज झालो

हत्तीखडकाला लागूनच घळईत १० मीटर उंचीवर एक छोटे झाड घट्ट उभे होते. त्यावरचा कडा झुकला होता. डावीकडे दृष्टि विस्फारत चढत होती ती खडकांच्या समूहावरून, फुगीर कड्यावरून, पण शिखर दिसत नव्हतेच.

कबरेला दोर बांधून शशी चढू लागला. आदित्य सुरक्षित जागे-तून दोर पुरवू लागला. पहिल्या ३ मीटर उचीतच अवघडपणाचा ताण जाणवला. काळजीपूर्वक तो झाडापाशी पोहोचला

खोडाला मिठी मारून एक छोटी दोरी त्यात अडकविली. का.रॅ-बिनर बसवीत शशीने मुख्य दोर त्यातून ओवला. या 'रनिंग बिले' मुळे शशी घसरला तरी झाडाशी लटकला असता. उजवीकडे पाय लावबीत शशीने कड्याच्या झुकलेल्या भागाखालची एक अक्षरश. देव-तारी पकड प्रयासाने मिळविली तोल सांभाळत दोन्ही हात ताणून कड्याच्या वरच्या भागाला पकडीत शशी क्षणभर कप पावला पण क्षणातच उजवीकडे घसरत तो ढाग टाकून हत्ती खडकावरच पोचला. आमचे श्वास मोकळे झाले.

एव्हाना सूर्य तळपला होता. लिंगाण्याची सावली दरीच्या पाय-थ्याला आली होती. पण वारे मात्र जोरातच होते. आम्ही आता राय-लिंगच्याही वरती पोहोचलो होतो. लिंगाणा शिखरासाठी मात्र अजून तीन टप्पे बाकी होते.

आपल्या नाकाची जशी धार असते तशा डोंगरधारेवरून शशी पुढे निघाला. खडकांचे बारीक तुकडे घसरवीत होते दोन्ही बाजूंना ७०० मीटर खोल दरी होती

कपाळपट्टीसारखा खडक समोर होता. उभे गध असावे तशा भेगेतून शशी वर चढला. एका मोठ्या दगडाभोवती दोर टाकून त्याने स्वत.ला आधार घेतला.

अखेर शिखर दृष्टिपथात आले आणि धारही थोडी सपाट झाली. सततच्या ताणामुळे दुखणाऱ्या हातापायांच्या बोटांना क्षणभर उसंत मिळाली.

तीन मीटर उचीच्या वाटोळ्या खडकाने आम्हाला पुन्हा एकदा काळजी शिकविली आणि शेवटच्या अवघड टप्प्याच्या पायथ्याशी आम्ही आलो एक छोटासा गोल उचवटा. पूर्वी पहारा असावा मात्र आता आडोसा नसल्यामुळे आम्ही खाली बसलो. जबर वाऱ्यामुळे तोल जात होता.

समोरच्या चार मीटरी पायऱ्याच्या कड्यासाठी दिलीपचीच आवश्यकता होती व दोर साहाय्य घेऊन त्याने पहिला टप्पा पार केलाही. उजवीकडे सरकून तो जेव्हा पायऱ्यावर शरीर तोलू लागला तेव्हा गार वाऱ्याने शरीर कप पावले. दोरही वाऱ्यामुळे ताणला गेला. आतापर्यंतची सर्वात जास्त खोली उजव्या पायाला अनुभवायला मिळत होती ७५० मीटर. अनुभवी दिलीप त्यातून बाहेर पडला आणि झुडुपाच्या वरच्या कड्यात खिळा ठोकून स्थिरावला

थोडासा घसारा आणि शेवटचा छोटा खडक चढून आदित्यने आघाडी घेतली ती थेट टोकापर्यंत माथ्यावर २०/२५ माणसे बसतील एवढी जागा आहे. अवशेष मात्र काही नाहीत. ९०५ मीटर उंचीतील २०० मीटर खड्या चढाईचे आव्हान संपले होते. हे सर्व उतरायचे आहे आणि जे जास्त धोकादायक आहे हे आम्ही क्षणभर मनातून काढून टाकले कारण एका अद्वितीय दृश्याने आम्ही हरखून गेलो होतो. सह्याद्रीची कित्येक किलोमीटर दूर पसरलेली करवती भिंत त्या-पाठीमागे तोरणा-राजगड आणि पश्चिमेला रायगड.

लिंगाणा उतरण्याचा ताण शारीरिकच जास्त होता. कारण आधाराला जखडणे, दोर साहाय्य देणे, वरचा दोर नतर ओढून घेणे इत्यादि कवायतींमध्ये आम्ही सुरक्षित आहोत ही भावना सुखकारक होती.

आम्ही सावधपणे उंची सोडीत होतो. तेव्हा शिखराची सावली सहजपणे रायलिंगचा कडा चढत होती लिंगीच्या टप्प्यात अंधाराने आम्हांला गाठलेच. तिघेजण दोर साहाय्य घेऊन दोरावरून सरसरत उतरली पण दोर खालून ओढून निघेना तेव्हा दिलीप दोर साहाय्य घेतच उतरला

शेवटच्या क्षणापर्यंत जपलेले पाणी घशात उतरविताना रात-किड्यांची पार्श्वभूमीसुद्धा दचकवीत नव्हती कारण आता श्वास मोकळेपणाने घेता येत होता कसरतीची गरज नव्हती. दोर फक्त पाठीवर असणार होता पायावर चालता येणार होते हात मोकळे ठेवीत' स्वच्छ चांदण्यात बोराटा नाळ आम्ही चढू लागलो

☐ ☐

# २०. निळे पाणी-हिरवी जमीन

मुक्काम देवबाग !

पांडुरंगाचे देऊळ ! साध्या जांभ्या दगडांत बांधलेले. माथ्यावर माडांच्या झावळ्या डोकावतात. प्रशस्त सभामंडप आम्हा तिघांना पुरेसा होता. पथाऱ्या पसरल्या. आमच्या पाठीवरच्या पोतड्यांत आठ दिवस कुठेही पाले टाकण्याची सिद्धता होती. समुद्रकिनारी भटकणे एवढाच आमचा उद्देश होता

अथांग दर्या आणि कर्ली नदीची खोल खाडी यांच्या दुबेळक्यात देवबाग वसले आहे दिवस बुडायला थोडा वेळ होता. दिवसभराच्या चालीने आंबलेले देह मोकळे करायला समुद्रस्नान हवेच होते देवळा-पासून दोन पावलातच पुळण लागली अन् मग सागर आणि आमची भेटाभेटी झाली.

समुद्रपातळीतून किनारा कसा दिसत होता ! ओतप्रोत हिरवा! माडांच्या गर्द राईचे प्रतिबिंब ओल्या रेतीवर पडून तीही हिरवळली होती. एकीकडे पाण्याची अथांग निळाई तर दुसरीकडे जमिनीची हिरवळ !

भानावर आलो तो माडांच्या शेंड्या चंदेरी होताना बघून. असे भान हरपण्याचे प्रसंग आजच्या पहिल्याच दिवशी कितीतरी आलेले होते.

मुंबई-गोवे मार्गावरील कुडाळमार्गे 'भोगवे' गाठले. वलाटीने चढू लागलो तर पऱ्ह्याच्या काठी आंबे-कोकमाची लयलूट होती. सड्यावर येताच करवंदीच्या रसात आम्ही न्हाऊन निघालो आणि दुर्ग 'निवती'च्या पश्चिम टोकावर उभे राहून आम्ही स्तब्धच झालो.

'ब्लॅक स्टॅलिअन' चित्रपट तर आम्ही पहात नव्हतो ना? म्हणून चिमटा घेऊन पाहिला. अहं ! दृश्य सत्यच होते. तळात

करवतलेल्या कड्यांनी विविध शिल्पे निर्मिली होती. दृष्टि वर केली तेव्हा अथांग शब्दाचा अर्थ कळला तीनशे अंशात दृष्टि फिरवीत आम्ही सागर बघू शकत होतो. समुद्रात हिरव्या-निळ्या रंगांच्या कित्येक छटा होत्या. दक्षिणेला वेंगुर्ले-रेडी-तेरेखोल तर उत्तरेला सिंधुदुर्गापर्यंत किनारा दिसत होता. त्यातल्या भोगवे किनारपट्टीची शुभ्र पुळण तांबड्या डोंगरउतारावरील हिरव्या ताडामाडाच्या काठाने अधिकच मोहक वाटत होती.

सावतवाडीकराच्या इतिहासात 'नेवती'ला महत्त्व होते. डोंगरमाथ्याच्या बाजूला वैशिष्टयपूर्ण खोल खदक आहेत. बुरूज आणि राजवाड्यांचे अवशेष प्रेक्षणीय आहेत.

नेवतीवरून किनाऱ्यापाशी उतरलो आणि खलाटीने भोगवे गाठले. कर्ली नदी अन् सागराच्या मीलनाचं दृश्य पहाण्यासारखे होते. पलीकडे देवबागेत विठ्ठल मंदिरात झोपेतही सागराचा आवाज साद घालीत होता.

मुक्काम सिंधुदुर्ग !

सिंधु सागरात शिवछत्रपतींनी बांधलेल्या सिंधुदुर्गातील सर्वोच्च अशा टेहळणी बुरुजावर आम्ही पहुडलो होतो. तटाच्या गवाक्षातून घुसणारे भन्नाट वारे झोंबरे मात्र नव्हते चहू अंगांनी सागर उसळत्या फेन या जलदुर्गाला गिळू पहात होता. आकाशात पूर्ण चंद्राची ढगांशी झटापट चालली होती. तिचे सावट दर्यावर पडत होते चमचमणारा शुभ्र फेस काळ्या खडकावर उठून दिसे पण चंद्र झाकला गेला की सागर गहन वाटायचा. पण त्याचे चलनवलन, खळबळ, घुमळण यामुळे जाणवणारे चैतन्य मनाला तजेला देत होते अशाच एका चैतन्याने आज आम्ही स्तिमित झालो होतो.

देवबाग सकाळी सोडल्यावर तासाभरात 'तरकर्ली' आली. ओल्या रेतीवर चालण्यात अनुपम सुख होते. केवढा मुक्तपणा आम्हाला मिळाला होता. सुलट-उलट चालणे, उड्या मारणे आणि काही वेळा लोळणे देखील मात्र भुसभुशीत रेतीतून चालणे म्हणजे हिमावरून

चालण्यासारखेच होते. अर्थात काही पावलांतच आम्ही दमून खाली बसत असू

अशाच एका बसकंतीत दर्याचा घुमणारा आवाज, त्यावरची डुलणारी तारवे बघून आमची समाधि लागली वाळत घातलेल्या मासळीचा घमघमाट आमच्या शाकाहारी नाकांना झोंबत होता.

एका हास्याच्या खळखळाटाने आमची भावसमाधि भंगली. समोर एक कोळीण होती.

'का बाई हसता ?'

'चांगल्या घराक दिसतात, अन् असा का फिरता ?'

गाडीला द्यायला पैसे नाहीत म्हणून पायी फिरतो झाल'

'खुळचां च्या खुळचा ! माका फशिवतोस. पैका नाय म्हून म्हापुसांसमोर सपथ घेतो ? माका फशिवणारा अजून जलमला नाय तू तर माझा झीलसारखा.'

निसर्गाबरोबरच कोकणच्या माणसानीही आम्हांला असे आपलेसे केले.

आंबा-काजू-फणस यांच्या समिश्र सुवासात मालवण गाठले कोलंब गावचा सर्जेकोट पाहून परतायला दोनतीन तास लागले. सर्जे-कोटाच्या पश्चिमेकडील सागरी कड्याचे रौद्ररूप पहाण्यासारखे

मालवणच्या राजकोटपासून पद्मदुर्ग आणि सिंधुदुर्ग जवळ दिसत होते वास्तविक या दोहोमधील समुद्र होडक्याशिवाय उल्लंघिता येत नाही. पद्मदुर्गापर्यंत ओहोटीच्या वेळी जाता येते.

होडीने बंदर सोडले अन् आम्ही रोमांचित झालो

"आम्ही पाणियातील संपूर्ण जजिरे पाहिले पण चौऱ्याऐंशी बंदरी ऐसी जागा नाही, मार्ग सर्पाकार. तराडी होडी मात्र चालतात आमचे विलास ही जागा आली. इथे जलदुर्ग उभारावा" एका बखरकाराने उद्धृत केलेले हे शिवछत्रपतींचे दुर्ग-वर्णन आठवत होते पण अशा सिंधुदुर्गात जाण्यापूर्वी सागराच्या लाटा मात्र मनात धडकी भरवीत होत्या.

खडक चुकवीत सर्पाकार मार्ग काढीत नौका प्रवेशद्वारी पोचली. तटाचे भलेमोठे दगड पाहूनच चक्रावलो अन् मग त्यावरून प्रदक्षिणा घालताना तर आम्ही वेडेच होऊन गेलो.

रात्री सागराला असीम भरती आली होती. लाटा तटाच्याही वरती उसळत होत्या. सागर बेहोश होऊन उसळत होता. ते दृश्य आमची झोप उडवीत होते

वेंगुर्ले, मालवण तालुका ओलांडून देवगड तालुक्यातीलच नव्हे तर अवघ्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात अजोड अशा शिवमंदिराच्या प्राकारात पहुडणे यासारखे अन्य सुख कोणते ! उत्कृष्ट शिल्पांची रंगरंगोटी करून मूळ सौंदर्याचा नाश करणाऱ्या मानवाला कुणकेश्वराचा निसर्ग मात्र बदलता आला नव्हता नशीब आमचे !

पण आज दिवसभर ते नशीब एस. टी. गाडीशी बांधलेले होते. मालवणहून हडी गाव तर पार करून कालावल खाडी काही मिनिटात ओलांडली. कणकवली एस टी प्रतीक्षा कंटाळवाणी आचरे तिठ्या. वरून चालत आचरे पार छोट्या पुलावरून आचरे खाडी ओलांडून मुणगे गावी गाडीची पुनश्च वैताग आणणारी प्रतीक्षा पण खाडी ओलांडताना मिळणारे सुख अमाप होते. खाडीच्या तीरावर छान कौलारू घरे, त्यावर गर्द माड. पाठीमागे डोंगरउतारावर आंबा, फणस यांची झाडी शिवाय खाडी ओलांडायच्या 'तरी'ला पैसे अगदी नाममात्र.

निसर्गाने अजिबात चिक्कूपणा केलेला नाही पण रेवस-रेडी महामार्ग झाला की हा सर्व निसर्ग स्वत ला बंदिस्त कोशात गुरफटून घेईल.

मुणगेहून रात गाडी मिळून दहिबावमध्ये उतरलो तेव्हा संध्याकाळ फार दूर नव्हती. या गावाचा एस टी गाडीने विकास केला आहे निश्चित पण आम्ही मराठीत बोलूनही उत्तरे मात्र हिंदी वा इंग्रजीत मिळाली. काही किलोमीटरवरच्या कुणकेश्वरची वाटही कुणाला माहीत नव्हती. त्यात सार्वजनिक ठिकाणी झिंगून येण्याचे प्रमाण सार्वत्रिकच वाढले आहे.

अर्थातच कुणकेश्वर नो रूट जंगल बहुत है। यू गो एस. टी. रोड अशा एका झिंगलेल्या उत्तरावर आम्ही कपाळावर हात मारून घेतच पश्चिम दिशा पकडली. आम्हाला समुद्राची दिशा माहीत होती. पाठीवर सर्व साहित्य होते आणि जगलाची भीति घरी वसून एक-णाऱ्याला आम्हा भटक्यांना त्याचे काय! सडयावर उत्तम पाखाडी होती सूर्य आमच्यासमोरच सागरात डुबी घेत असताना घाटी उतरून आम्ही कुणकेश्वरात पोचलो

देवळाच्या प्राकारात टिपूर चादणे पडले होते. अथाग सागर चमचमत होता कातवण गावापर्यंत पाढरी शुभ्र पुळण पसरली होती. मंद वारा होता. गडद शातता आणि काय पाहिजे होते!

समुद्रावरची पहाटही अनुभवण्यासारखी असते.

पाघरूण बाजूला करीत किंचित् मान वर उचलून पडल्या-पडल्याच आम्ही ते उमलणे पाहू शकलो हे केवढे भाग्य!

वारा पडला होता. ओहोटी होती शांत समुद्रावर ठिपकाही नव्हता. पाढऱ्या रेतीवर कुणीही नव्हते एकच एक होडके पडले होते गावाच्या बाजूलाही शातता होती. हिरवी झाडीही स्तब्ध होती.

## तेजाळ समुद्र

हळुहळू पश्चिम क्षितिजावर चद्र पाढुरका होऊ लागला. सागर गर्द निळ्याची कात टाकून अस्मानी झाला खडकाचे काळेपण त्याला उठावदार दिसू लागले अन् अचानक समुद्र लख्ख तेजाळ बनला.

देऊळ ओलाडून उन्हाचा कवडसा अगावर पडला. मंदिराला भिडलेल्या डोगरावर चढून आम्ही देवगडची वाट धरली अवघी तासाची पायी वाटचाल पण डोगर अन् दर्या याच्या मिश्र झिलईने केवढी मजा भरली आहे या प्रवासात.

मीठमुंबरीला पुन्हा तर ओलाडून सडयावर वसलेल्या देवगड गावी आलो गावाच्या उत्तर टोकाला आहे दुर्ग, देवगड आणि बंदर. दुर्गात दुपारी पोचलो समुद्रात घुसलेल्या जमिनीच्या टेकाडावर देव-गड बांधलेला आहे. तटबदी भरपूर बाधलेली पण मुख्य वैशिष्ट्य

म्हणजे तटाला लागून असलेला बंदर. देवगड बंदर दुर्गाच्याच परिघात पण खाडीच्या सुरक्षित भागात आहे.

'वाडातर' गावी एस. टी ने आलो. खाडीवर गर्दीच गर्दी होती. गाडीत ज्या आवेशाने लोक धक्काबुक्की करीत ठासले जातात तसेच छोट्या होडीतही तुडुंब भरले त्यातून देवगडची ही खाडी रुंद होती अर्थात् आमचा जीव अधिक काळ मुठीत धरावा लागला. (या खाडी-वरील पूल नुकताच पुरा झाला आहे.)

वाडातर–विजयदुर्ग एस. टी ने विजयदुर्गला अंधार पडताना पोचलो.

खाडीत असंख्य हलते दिवे दिसत होते कोळ्यांचे हे संसार. होडी हेच घर आणि सागर ही त्यांची शेती. मासे पकडायचे, रात्री चूल होडीतच पेटवून त्यावर ते परतायचे पहाटे पुन्हा अथांग दर्यावर मासळी रापायला जायचे. हेच त्यांचे जीवन दर्याची याना भीति वाटत नाही. कारण दर्याच्या जागी त्यांना केवळ पोटच दिसत असते. आम्ही मात्र दर्याला भितो कारण आमचे पोट भरलेले असते दिसणारा दर्या असतो अथांग, अविश्रांत घुसळणारा !

## टेकाडावर विश्रामधाम

खाडीला लागूनच विजयदुर्गचे बंदिस्त जग होते. केवढ्या बळकट भिंती. अशा रेखीव तटबंदी अन्यत्र नाहीत. आत विहिरीपाशी समुद्राचा आवाजही बंद झाला. थोड्याच वेळात जाळावर थालीपीठे तयार झाली. अंधारात रंगरूप कोण पहातय आणि भुकेल्या जिभेला चवीचे सोयरसुतक नव्हते.

दुर्गातील उंच टेकाडावर विजयदुर्गचे विश्रामधाम आहे पण आम्हांला उघड्या आकाशाखाली दर्या बघतच डोळे मिटायची सवय झाली होती. अर्थात् बुरुजाचे दगड डोक्याखाली घेत दर्याचे तांडव बघत आम्ही चिडीचूप झालो.

भोंऽऽ अशा कर्णकटु आवाजाने दचकून जागे झालो एक लख्ख उजळलेले गाव अंधार कापीत समोर दिसताच अथरुणातून उडालोच.

लक्षात आले की, आजचा पाचवा मुक्काम आहे जैतापूरच्या खाडी-वरील मुसाकाजी बंदरात. ते गाव म्हणजे मुंबई-पणजी जहाज आहे.

जहाज परतले पडाव परतू लागला. अंधारात त्याच्यातील कंदिलाच्या हेलकाव्यावरून समुद्राच्या लाटांची कल्पना येत होती आज सकाळपासून समुद्र खवळलेला आम्ही बघितला होता तो विजयदुर्गच्या वाघोटण खाडीत

विजयदुर्गच्या जवळील रामेश्वर मंदिरातील चित्रकला आणि विजयदुर्गचे बळकट शिल्प पाहून आम्ही दुपारी छबिन्यातून बंदर सोडले होते दांडपागाऱ्याचा किनारा खाडीपलीकडे दूर होता

मध्यभागी नावाड्याने शिडे उभारली भन्नाट वारा पिऊन आज सागर काही वेगळाच वाटत होता लाटा मीटरभर उंचीच्या येत होत्या. पोटात खड्डा पडत होता.

## तांबड्या विजारी आणि

'अगस्ति भेलाय आता दर्याचा भरोसा नाय!' मुकाणूधारी असे म्हणतोय तो एक मोठी लाट आली पण आम्ही तोवर खाडीच्या सुरक्षित भागात पोचलो दांडपागारे ही अणसूर गावची वाडी. इथून जैतापूरपर्यंतचा रस्ता रम्य वनश्रीतून छोट्या छोट्या देखण्या वाड्यां-जवळून जातो तब्बल दोन तास चाललो तेव्हा जैतापूर आले. वाटे-तल्या जांभळांनी हे चालणे सुखकारक केले.

शशी हिरेमठच्या दृष्टीतून अशा गोष्टी कधीच सुटत नाहीत. दिलीप निंबाळकर वांदरासारखा सरसरत वर पोचला आणि काही क्षणातच माझे टोपडे जांभळे झाले.

तांबड्या विजारी आणि जांभळतोंडे जैतापूरच्या खाडीत धुवून तरीने पलीकडे गेलो. मच्छिमारी नौका 'नाटे' गावाकडे परतत होत्या. खाडीला खेटूनच दाट वस्ती आहे घरांची, पण त्यापेक्षा होड्यांचीच गर्दी जास्त.

वस्ती पार केली अन् यशवंतगडच्या बुरुजाचे पाण्यात पडलेले प्रतिबिंब दिसले. गडातील आंबराईत मोकळा श्वास घेत गड न्याहाळला.

खाडीपासून सड्यापर्यंत तट बांधलेला सड्याच्या अंगाला छान खंदक त्यात एक अंधार बाव, बघणीय

यशवंतगडहून मुसाकाजी एक तासाची गाडी रस्ता चाल

जहाज गेल्यावर बंदर पेंगुळले. आकाशात काळ्या ढगांची छटा-पट आणि धक्क्याशी उसळत्या लाटांची झुंज मात्र चालूच होती

## एस.टी ची होडी

सहाव्या दिवशी गावखडीपर्यंत एस.टी. गाडी. होडीने मुचकुंदी नदी ओलांडली शून्य ते पन्नास मीटर चढून पूर्णगडचा किनारी दुर्ग गाठला. सागराचे पुन्हा एकदा लोभस दर्शन झाले. पूर्णगड आकाराने अगदी छोटा. जणू प्रदर्शनात ठेवण्यासाठी प्रतिकृति करावी तसा ! अर्थात् प्रत्येक भाग डौलदार आहे.

रेटारेटी करीतच पूर्णगड भाटये गाडीत प्रवेश मिळाला. माडांच्या सावल्या मोकळ्या झाल्यावर खाडीपलीकडे रत्नागिरी दुर्ग व शहर दिसले पायी चालणे, होडीने खाडी ओलांडणे हे इतके अंगवळणी पडले होते की रत्नागिरी एस टी. च्या नियंत्रण कक्षात आम्ही आपोआप विचारले, 'पुण्या जावाक तर कित्ये वाजता !'

नियंत्रण अधिकारी अर्थात् आ वासून बघत राहिला होता. आमच्या डोळ्यासमोर मात्र रस्ता म्हणजे निळा समुद्र होता. एस टी. गाडी म्हणजे होडी होती.

□ □

# २१. लिदार घाटी

त्या संध्याकाळी आम्ही झपाझप पावले उचलीत चालत होतो. किंचित् अंधारलं होतं. हवेत किंचित् उष्मा. शेषनाग नदीवरचा पूल ओलांडतानाही धाप लागली. चेहऱ्यावरचा घाम लपत नव्हता. पाठी-वरच्या पोतड्या वारंवार खांदेपालट करीत होत्या.

गावापासून दूर लिदार नदीच्या काठी हिरवळीवर चार तंबू उभारलेले होते हिरव्याशार पार्श्वभूमीवर त्या तंबूचे विविध रंग उठून दिसत होते तंबूसमोर बरीच वर्दळ दिसत होती कुणी पिशव्यां-मधून सामग्री काढीत होते तर कुणी भरत होते, कुणी तंबूचे दोर आवळत होते समोरच्या बाजूला धूर येत होता त्यावर एक तिकाटणे. त्याला लटकणाऱ्या किटलीतून गरम वाफा येत होत्या. एक मध्यम-वयस्क माणूस जाळ करीत बसलेला शांत, मात्र कुणीच बसलेले नव्हते अगदी काही बाल पावलेदेखील इकडे तिकडे दुडदुड पळत होती. मात्र हे कुणा भटक्या जमातीचे पाल नव्हते

आम्ही पाळंदे, नाटेकर आणि देव कुटुंबीय मंडळी उन्हाळ्याची सुट्टी वेगळ्या पद्धतीने घालवायला पहलगाम मुक्कामी पोहोचलो होतो. कोलोहाई पर्वताच्या पायथ्याशी जायचं मनात होतं.

आम्ही आणि अंधार एकाच वेळी तिथे पोहोचलो. लिना, केदार आणि सुजित ही मुले उत्सुकतेने आमच्या पोतड्यातून काय आहे ते उचकू लागली आदित्य त्यामध्येच कुठेतरी लुडबुडत होता.

हवा दमट होती. त्यामुळे तळ सिद्ध होताच हायसे वाटले. तंबूवर नीर निवारकही पसरून झाले.

पूर्ण अंधार पसरला तेव्हा जंगलाच्या पार्श्वभूमीवर चुलीच्या पिवळ्या ज्वाळा छान दिसू लागल्या.

अरविंद देवानी थाळी वाजवून खिचडी शिजल्याचे सूचित केले सगळे चुलीभोवती गोळा. गारठा वाढला होता. गरम जेवणाला गरजेची लज्जत आली होती.

पहिल्या मुक्कामाची सध्याकाळ उत्तम पार पडली. बहुतेकाचा हा पहिलाच अनुभव. वडिलधाऱ्याच्या ताणलेल्या भुवयांकडे कानाडोळा करीतच सर्व आलेले—

"काय! काश्मीरला जाणार? मी सागतो त्या हॉटेलात जा, मस्त आहे."

"पहाडात कुठली हॉटेले?"

"मग?"

"आम्ही तबू घेऊन जात आहोत "

"मुलाना घेऊन आणि तबूत उघड्यावर साभाळा रे बाबानो!

पण आम्ही अढळ होतो. डोंगरयात्रेचा थरार बायकामुलांसह अनुभवणे हे अवघड नव्हते आम्ही सर्व सिद्धता ठेवली होती आणि काश्मीरच्या डोंगरीवाटा अशा यात्राना अगदी योग्य आहेत; हेही आम्ही जाणून होतो जेहलम, सिंध आणि लिदार या तीन खोऱ्यात लिदार घाटी तर नदनवनातली इद्रपुरीच!

तबूच्या कनाती बाधल्या आमचे छोटेसे जग शात झाले. मुले आरामात गाढ झोपी गेली चिंता होती ती थोराचीच थंडी वाढतीय का? बाहेर कुणी आलय की काय! खुसखुस आवाज येतोय इ

मात्र तो छोटा तळ शात बघून पर्वताने आळोखेपिळोखे दिले हे कोण बुवा? म्हणून माथा झुकवून त्याने पाहिले त्याबरोबर बर्फा-बरची गार झुळुक खाली उतरली साऱ्या पहलगामवर थड पाण्याचा रेशमी शिडकावा झाला

सुरेख सकाळ! तबूवर ऊन पडल चहूबाजूच्या शिखरावरचे हिम अधिकच शुभ्र झाले होते – कोणत्याही डिटर्जटशिवाय. शिख-राचा हिरवा उतार अधिकच खुलला होता. गवतावर पाण्याचे थेंब चमकत होते. प्रसन्न, भारून टाकणारे वातावरण.

मकबूल आणि अब्दुल हे दोघे बंधु त्यांच्या चार तट्टांना घेऊन आले. बशीर हा मदतनीसही येऊन ठेपला.

तरीही आमचे तळ आवरणे चालूच होते.

शेवटी १० वाजता पूर्व तयारी पूर्ण होऊन आम्ही लिदारच्या डाव्या (खऱ्या) किनाऱ्याने चालू लागलो प्रत्येकाच्या पाठीवर वैयक्तिक कपडे आणि अंथरूण-पांघरुणादि गोष्टी.

बिपिन, सुजित ही तरुण पोरे अर्थात् टणाटण चालू लागली. लिना आणि केदार लहान म्हणून त्यांना घोड्यावर पण नाखुशीनेच बसावे लागले आदित्य तर ३ वर्षीय पोर. घोड्याचा हट्ट पुरा होताच तो सरळ खाली उतरून अपर्णाचा हात धरून चालू लागला आणि अधून-मधून अर्थात् बाबाच्या पाठीवर.

अरविंद देव, शरद आणि लता नाटेकर हे पिछाडी राखून होते. रस्ता जीप जाण्यासारखा. उंच वृक्षांनी त्यावर छत्र धरलेले. ३।४ कि. मी. नंतर एक मोकळवन आले आणि लिदार घाटीचा सुरेख देखावा समोर उलगडला. नदीचे हिरवे निळे पाणी खळखळाट करीत पळत होते. तिच्या दोही अंगांना फर, चीड, पाईनच्या उत्तुंग वृक्षांनी गर्दी केली होती. पहलगामच्या पलीकडे हिरव्या रंगाच्या डोक्यावर धवल-शिखरे ढगात घुसली होती.

मुले आरामात चालत होती. घोडे बहुतेक वेळ मोकळेच. आम्ही मात्र आता वारंवार सृष्टिनिरीक्षण करू लागलो.' खरे म्हणजे पाय जड झाले होते

अखेर दुपारी आरू आले. लिदारला मिळणाऱ्या पूर्व-पश्चिम नाल्याच्या काठावर आरूचे रुंद पठार आहे. पोपटी रंगाचे अखंड गालिचे पाहून थकवा पळाला. तट्टे देखील सामान उतरवल्यावर उडारली. तंबू उभारेपर्यंत बशीरने चूल पेटविली पोतड्यातून खाद्य-पदार्थ बाहेर पडले.

दुपारीदेखील उन्हाचा शेक चांगला वाटत होता. आकाशे पडून उभावलेल्या पर्वतरांगा न्याहाळणे सुखदायी होते. अरमीनच्या दरीमध्ये खालपर्यंत हिम होते. हरमगबान शिखराकडचा मार्ग त्याच दरीतून

आहे. सर्वच पर्वतांचे उतार तीव्र होते. पण त्यावर उभे असलेल्या गगन-भेदी झाडाचे मात्र नवल वाटे.

पण निसर्ग नवलपूर्ण नाही का ! सर्व लहान मुले आजपर्यंतचा त्रास विसरून खेळण्यात मग्न झाली होती तर आम्ही मोठी माणसेच डोके दुखतय, अंग दुखतय म्हणत रडत होतो

निळ आकाश पांढुरक झाल. शिखरावरचे हिम वाऱ्यामुळे फवारू लागले. क्षणार्धात शेकोटीची ऊब गरज बनली. अर्थात् शेकोटी-साठी खाली पडलेल्या लाकडाचाच आणि चीड फळाचाच वापर केला गेला शेकोटीच्या हव्यासापायी वृक्षसंपत्ति नष्ट करण्याचे आमच्या मनात नव्हते.

गारठा वाढून ऊब कमी पडू लागली. तंबू पटापट बंद झाले. घोडेवाला मकबूल मात्र पहाडी ढंगात गात होता.

हाथ कमाई, नेक कमाई

मुफत खाना छो ऽ डो, भई मुफत खाना छोड दो ।

"लिदारवटको खडी चढाई है । मेमसाब कैसे चढ पाओगी" घोड्यावर आणि त्याच्या काही महिन्यांच्या दांडीवर पोट अवलंबून असणाऱ्या मकबूलने असे म्हणत आणखी एक घोडा वाढवला पण त्याचा फारसा उपयोग करण्याचे धाडस झाले नाही.

ठिकठिकाणी कड्याच्या ओठावरून जाणारी, दगडधोंड्याची आणि हिमसाठ्यामुळे घसरडी वाट म्हणजे घोड्यावरून घोड्याबाहेर अधांतरीच होण्याची शक्यता होती.

एका तीव्र चढणीनंतर एक सुरेख जंगल भाग आणि लिदार दरीतल्या एका अविस्मरणीय दृश्याला आम्ही सामोरे गेलो.

पोपटी रंगाने दरी सजली होती. तिला पाणथळीचा स्पर्श होता. पठार दृष्टिपलीकडे जात होते. डोंगरावरून घरंगळलेले हिम वाट ओलांडून डावीकडे खोलवर लिदारमध्ये हिमपूल बनवायला गेले होते. नदीपलीकडे पर्वत सरळ उठावला होता. त्यावरचे ओढे हिमाच्छादित होते डोळ्यांनाच जाणवणारे हिम लवकरच पायाला जाणवू लागले. सगळ्यांनीच वय विसरून त्या हिमउताराचा अनुभव चाखला.

लिदार समपातळीत आली. वाटेच्या कडेने आता तांबडी निळी फुले उमलली होती. दरी आता अरुंदही झाली होती. डोक्यावरची टोपी पाडणारे पर्वत वेढू लागले.

गुडघाभर हिमात पाय बुडवीत एक ओंडक्याचा पूल पार करून आम्ही लिदारच्या खऱ्या उजव्या तीरावर पोहोचलो आणि दमविणाऱ्या चढणीने लिदारवटच्या पठारावर पाऊल ठेवले. उंची ३०० मीटर.

न्यूझीलंडच्या कोलोहाई मोहिमेचा तळ आणि एकदोन युरोपियन ओंडक्यांचे तंबू आधीच पठारावर विराजमान झाले होते. सरकारी डाक बंगलाही होता. पठाराची बाजू ३१४ मीटर खड्या – खडकाळ पर्वताला भिडली होती. घळीमधून हिमाचे कित्येक ओघळ खाली आले होते त्यामुळे पठारावर ओल होती.

खडकाळ पर्वताच्या जवळून एक नाला भेदक आवाज करीत खाली येत होता. याच्या कडेने तारसर व मारसर तलावांच्या जवळून यमहार खिंडीतून सिंध खोऱ्यातील सोनमर्गला जाण्यास मार्ग आहे.

जवळ शिलाखंडावर रेडस्टार्ट पक्षी उड्या मारीत होता. या शिलाखंडाच्या आडोशाने आम्ही आमचा तळ उभारेपर्यंत काळ्या मेघांनी डोळे वटारले.

आरूच्या कोमल पार्श्वभूमीवर लिदारवट रौद्र बनले होते आणि अशा वेळीच सांघिक एकतेची गरज भासते.

अरविंद देवांनी वल्लवाचारी बनण्यात पुढाकार घेतला तर सौ. लता नाटेकर, अपर्णा पाळंदे या खरे म्हणजे स्वयंपाकातून सुटण्यासाठी घराबाहेर पडलेल्या त्याही त्यांच्या मदतीला धावल्या. बिपिन देव, केदार देव आणि सुजित देव ही मुले तंबू उभारण्यामागे लागली. शरद नाटेकर चौफेर लक्ष ठेवून होतेच.

न्यूझीलंड संघाचा ५१ वर्षीय नेता आपल्या साथीदारांना घेऊन आला. त्यांच्या मदतीला मुजरा

सकाळ उगाळच होती.

"मकबूल, तारसर-मारसर जा सकेंगे।" "तोबा! वहाँ तो बर्फका वर्षा है। घोडा जाएगा नही।" अर्थात् फक्त बिपिन, शरद व आनंदच कोलोहाई (५४२५ मी) मुख्य तळाकडे निघाले.

अति हिमवृष्टीमुळे लिदारवट सोडताच हिमात पाय बुडण्यास सुरवात झाली भोजपत्राची झाडे मागे गेल्यावर मात्र लिदार दरीत हिमाशिवाय काही दिसेना डावी उजवीकडच्या ग्रेनाईट कड्यांनी त्या शुभ्रतेला केलेला विरोध उठावदार दिसत होता.

ढगामुळे डोळ्यावर चष्मे नसल्याने फारसे बिघडणार नव्हते. हिमउतार पार करायला काठ्या पुरेशा होत्या कारण बर्फ लागण्याची शक्यता नव्हती लोकरी पायमोजामुळे त्या उचीवरचा गारठा सहन करण्याजोगा होता आणि ५।६ तासापेक्षा अधिक वेळ आम्ही हिमात नसणार होतो

अर्थातच आम्ही ११ कि. मी. हिमाच्छादित वाटचाल सुरू केली. मऊ हिमात पाय व्यवस्थित बसत होते. त्यामुळे उजवीकडच्या लिदारच्या खाईची भीति नव्हती नदीच्या पात्रापासून सरळ ४ मीटर उंच हिमथर होते. ठिकठिकाणी नदी त्या थराखालून वाहत होती.

सतरज नाल्याजवळ दरीने ९० अंशात वळण घेतले आता नदी नेमकी कुठे आहे याचा फक्त अंदाजच घेता येत होता. आम्ही खऱ्या डाव्या उतारावरच गेलो. कोलोहाई तळाची जागा कित्येक दूर अंतरावर दिसत होती. आता मात्र हिमाच्छादित दरी चढत जाणे अवघड होत चालले. पायाची संवेदना कमी झाली, डोळ्याना शुभ्रतेचा ताण, नांगरलेल्या शेतासारख्या उतारावर, भुसभुशीत, कडक, हिम होते.

निर्जलीकरणामुळे ओठ, घसा सुकला चार तासानी आम्ही मुख्य तळाजवळ आलो कोलोहाई शिखर (५४२५मी) ढगामुळे नीट दिसू शकत नव्हते

न्यूझीलंड सदस्याना शिखर चढाईच्या शुभकामना देऊन आम्ही परतीची वाट धरली.

....९

शेवटच्या उतारावर पावसाने आम्हांला गाठले. पाठीमागे उंचा-वर जोरदार हिमपात चालू झाला होता. एकूण ६ तासात कोलोहाई तळाला भेट देऊन परतण्यासाठी आम्ही २० कि. मी. हिम तुडविले होते. बिपिन, शरद यांनी आपल्या आयुष्यातील सर्वांत कठीण पण रोमांचकारी दिवस अनुभवला होता.

इकडे लिदारवटला सोसाट्याच्या वाऱ्याने पावसाशी संगनमत केले होते. त्यामुळे तंबूचा तळ गुंडाळून डाक बंगल्याचा आश्रय घेणे भाग पडले पण तिथे रात्र अधिकच थंड होती. दुसऱ्या दिवशी पहल-गामला परतायचा निर्णय घेणे आवश्यक ठरले.

काश्मीर हिमालयात जायचे म्हणजे जीवनदायी मेघांना डावलून चालतच नाही. पीर पंजालच्या पर्वतमाथ्यावर ते हिमपात घडवितात तर पायथ्याच्या दरीतून जलपात—जवळजवळ वर्षभरच.

पण याच पाणथळीने काश्मीरचा निसर्ग खुलवलाय. हिरवीगार अरण्ये, संतोषदायी पोपटी कुरणे, विश्रांत नीलवर्ण सरोवरे, डौलदार पुष्परचना आणि कमीत कमी उंचीवर हिमबर्फाचा कलात्मक विलास डोळ्यांचे पारणे फेडणारा.

याबरोबरच निसर्गाचा रुद्राविष्कार टाळता येत नाहीच. आम्ही अर्धे अधिकच यशस्वी झालो असू पण त्याने पुन्हा जाण्याची ऊर्मि कुठे-तरी खोलवर निर्माण केली आहे. पुढे-मागे पाय निश्चितच पुन्हा लिदार घाटीकडे वळतील तारसर-मारसर या निळ्याशार तलावांच्या दर्शनाने मने सुखावतील, यमहार खिंडीच्या पलीकडे सिंध खोऱ्याची पायपीट करतील.

□ □

# २२. हिमधारेच्या माथ्यावर

बियास नदीच्या खळाळत्या पाण्याचे, काठीच्या कड्यांवरून ओठगणाऱ्या रम्य वनश्रीचे दर्शन घेत आम्ही जेव्हा 'मनाली'त उतरलो तेव्हा चंडीगड कुलू मार्गाचा १९ तास प्रवास पूर्ण झाला होता.

पाईन, देवदारांच्या दाट हिरव्यागर्द राया पोटात लेवून पीर-पंजाल रांगेच्या धवल टोकानी आमचे स्वागत केले. पीरपंजाल रांग काश्मीर-लडाख व पंजाब-हिमाचलप्रदेश या राज्याची सीमा आहे. या रांगेतीलच 'शितीधार' हे ५३०३ मीटर (१७३०० फूट) उंचीचे शिखर आमचे लक्ष्य होते. श्री चंद्रकांत वाकणकर यांच्या नेतृत्वाखाली गिरिविज्ञानाने ही मोहीम ठरविली आणि इंडियन माऊंटेनियरिंग फाऊंडेशन, नवी दिल्ली यांनी तिला तत्काळ मान्यताही दिली. आणखी इतर अनेकांचे साहाय्य लाभून आम्ही ४०० किलो सामानासह 'मनाली'त सज्ज झालो

व्यवसायभिन्नता असूनही आता एकच ध्येय ठरवून आम्ही सदस्य एकत्र आलो होतो चंद्रकांत वाकणकर शिक्षकी पेशाचे, मनोहर मांधे वनस्पतिशास्त्राचे अध्यापक, उल्हास देशमुख बायो-केमिस्ट्रीतील प्राध्यापक, श्याम काळे यांचा वैद्यकीय व्यवसाय, अनिल नायक, अशोक जाधव व अस्मादिक नोकरदार तर गिरीश कोनकर विद्यार्थी या सर्वांना जोडणारे दोनच शब्द होते हिमालय अन् शितीधार!

एके सकाळी पावसाचा शिडकाव अंगावर घेऊनच आम्ही मनाली सोडले. बियास (व्यास नदी) च्या डाव्या काठाचा प्रवास सडक असल्याने सुखदायीच होता. खुद्द 'मनाली'त जरी शहरीपणाचा अनपेक्षित धक्का बसला असला तरी बाहेर पडताक्षणी निसर्गरम्यतेचा उलट सुखद धक्का बसून आम्ही आश्चर्यचकित झालो.

हिमालयात ट्रॅक्टर ही नुसती कविकल्पना नसून आम्ही खरेच त्यात बसून निघालो होतो. आशियातील सर्वांत जास्त उंचीवरून जाणारा पहाडी रस्ता म्हणून ज्या मनाली रोहतांग-किलाँग रस्त्याचे वर्णन केले जाते तिथे ट्रॅक्टर असणे हे अप्रूप नाही.

मनालीपुढे ८ कि. मी. वर 'पलचान' गावी हा 'हाय'वे सोडला. एका डगडगत्या पुलावरून बियास पार केली आणि पुढे 'सोलांग' नाला-पर्यंत दगडी गोटयाच्या 'लो' वे वर हाडे खिळखिळी झाली!

दिल्लीत हाडीमासी खिळलेली उष्णता अशी बाहेर पडली. ती बाहेर नसती पडली तर बरे झाले असते असे पुढच्या जीवघेण्या थडीत आम्हाला वाटले. एकूण आमची मनें व शरीरे याचा कुठेच मेळ बसत नव्हता. 'शितीधार'च्या माथ्यावर मात्र तो योग अचानक आला.

सोलांग नाला स्थानी ट्रॅक्टरला कोपरापासून हात जोडले अन् पुढे निघालो. वीस स्थानिक भारवाहक आणि आम्ही आठजण यांच्यात सामान विभागून व्यास नदीच्या उजव्या किनाऱ्याने आम्ही थाटेला लागलो. लांबून एखादी सैनिकी टोळीच वाटावी अशी आमची एकेरी रांग पुढे सरकत होती. मात्र बंदुकीऐवजी आमच्या हातात बर्फकुऱ्हाडी (आईसअॅक्स) होत्या त्याचा उपयोग आम्हाला बर्फाशी आमने सामने करताना होणार होता.

पाईनचे आकाशवेधी वृक्ष सूर्याला परतवीत होते. एखादाच चोरटा किरण तुरूतुरू उड्या मारणाऱ्या व्हाईट कॅप्ड रेडस्टार्टसारख्या सुरेख पक्ष्याला आमचे नजरेत भरवीत होता. उजवीकडे खोलात व्यासचा घनगंभीर नाद साथ देत होता.

हनुमान तिब्बा रांगेतून येणारे दोन नाले ओलांडले तेव्हा दोन तासाची वाटचाल संपली होती. दूरवर व्यास नदी हिरव्या मखराकृति वृक्षगुहेतून दृश्य होत होती.

'धुंदी' तळाची जागा तिथेच होती. तरीही तासाभी टुल्कावणी आली दरड कोसळलेल्या वाटेने जाण म्हणज धमालच असते. पाया-वर जोर पडावा तसतसा घसारा खाली खचत जातो. सरळ चालण्या-

साठी प्रत्येक वेळी ऊर्ध्वपातळीवर पाय ठेवावा लागतो. इथे तर पाईनची मोठी झाडे अन् शिळा एकमेकांना अडकून वाटेत पडल्या होत्या. हे सर्व पार करून व्यास नदी ओंडक्यावरून ओलांडली.

व्यासच्या डाव्या किनाऱ्यावर २० मीटर उचीवर एक प्रशस्त गवताळ पठार म्हणजे 'धुदी'तळ. मेंढपाळाचाही हा शेवटचा तळ.

पश्चिमेला आता हनुमान तिब्बा दिसू लागले. ह्या भागातील हे महत्त्वाचे शिखर होय. तळ उभारेपर्यंत ते काळ्या ढगानी झाकाळले. वरची दरी थोड्याच वेळात भरली. ढग आता आमच्या रोखाने येऊ लागले चोहीकडे काळोखले आणि सामानाची मांडणावळ अक्षरशः शुद्धपातळीवर करावी लागली.

पावसाची टपटप अन् खोलवर नदीचे संगीत ऐकीत आम्ही निद्राधीन झालो. २४०० मीटर उंचीच्या मनालीपासून आम्ही आता ३००० मीटर उंचीवर आलो होतो त्यामुळे गारठा सुखदायीच होता.

अचानक गदारोळ उठला. कुत्र्याचे भुकणे, घोड्याचे खिकाळणे अन् मेंढ्याचे किनरे आवाज यानी आम्ही जागे झालो. भारवाहक लाभचंद विजेरी घेऊन धावत गेला कुत्र्याचे भुकणे दूरदूर गेले. तंबूची कनात उघडून बाहेर जायचे धाडस मात्र झाले नाही

सकाळी कळले रात्री भालू(अस्वल) येऊन त्याने मेंढरू पळविले.

हवा फार सुरेख होती. हनुमान तिब्बा नजरेसमोर ठेवून व्यासच्या डाव्या किनाऱ्याने पुढे निघालो. डावीकडे हनुमान तिब्बा रांगेचे कडे आता अजस्र बनले होते उंची दीड हजार मीटर सहज असेल. सह्याद्रि आपला जेमतेम चार-पाचशे मीटरपर्यंत पोचतो.

व्यासला मिळणाऱ्या नाल्यावरील बर्फाचे पूल पार करताना खाली बोगद्यातून दिसणाऱ्या भोवरामय पाण्यामुळे आमची धडधड वाढे. ती पुढच्या चढणीमुळे अधिकच चढे. चार तासाची दमणीय चढण आम्हांला व्यास हिमोढांपाशी (मोरेन) घेऊन गेली. व्यासला उत्तरेकडून एक नाला येऊन मिळत होता. हिरव्या, तपकिरी डोंगरांच्या पार्श्वभूमीवर त्या नाल्यामागे 'फ्रेंडशिप' हे धवलशिखर उठून दिसत होते.

हिमोढावरून चढले की मोठी सपाटी लागते. व्यासकुंड इथेच सुमारे ३६५० मीटर उंचीवर आहे. व्यास नदीचे हे उगमस्थान पर्वत-रांगांनी वेढले असल्याने रम्य आहे.

आम्ही फ्रेंडशिप नाल्याकडे वळलो. उभी चढण लयबद्ध पाव-लांनी खाली जाऊ लागली. पाईनचे वृक्ष मागे पडले होते. भूर्जपत्र ओलांडले होते. ऱ्होडोडेन्ड्रॉनची लक्षणीय निळी फुले शेजारून गेली. आता केवळ ज्युनिपरची झुडपे तुरळक दिसत होती. आणि व्यासकुंड व फ्रेंडशिप नाला यांच्या खोऱ्यांना दुभागणाऱ्या एका कड्याच्या अजस्र भिताडाखाली आम्ही मुख्य तळ उभारला. उंची सुमारे ३६६० मीटर (१२००० फूट)

दगडाच्या कपच्यांची सपाटी करून निळे तंबू सज्ज झाले. ह्या तंबूतले छोटेसे मानव काय करणार आहेत हे पाहायला लख्ख निळ्या आकाशात एकच एक पांढुरका ढग विहरत होता. एका तंबूतून दुस-ऱ्यात जाईपर्यंत आमची मात्र दमछाक होत होती. छोट्याशा नाल्या-मधल्या बर्फील्या पाण्यात बोटे बुडवायला मन धजत नव्हते. कपड्यांची आवरणे चढविल्याशिवाय थंडीची थरथर कमी होत नव्हती. पहाटे लव-कर उठण्याचे ठरवूनही तंबूची कनात झाकून सूर्य लपवायचा वेडेपणा करण्यात सर्वजण तरबेज झाले होते.

लोथराम, लाभचंद अन् दिना हे तिघे भारवाहक मात्र थंडीला कस्पटासमान लेखीत होते.

दुपारी दोन वाजता मात्र सर्व काही विसरून आमचे नेत्र पैल-तीरी हनुमान तिब्बा रांगेवर रोखले जात.

तिथे होती ओघळती हिमनदी (हँगिंग ग्लेशियर). त्याखालचा काळा कडा अचानक बर्फाच्या मोठ्या ढगामागे झाकला जाई. तो ढग मग अतिवेगाने खाली उतरून पर्वत उतारावर आदळे. टनावारी बर्फाचे तुकडे तिथे उधळले जात. उतारावर नाचत ओघळत ते बर्फ तळापर्यंत फेकले जाई. नंतर येणाऱ्या प्रचंड धुम्मऽऽ आवाजाने आमचे मन आम्ही खूप दूर असूनही भयचकित होऊन शहारत होते.

हजारो पौंडाचा दाब असलेल्या त्या 'अॅव्हलांच' चे दृश्य कधीच न पुसले जाण्यासारखे आहे. त्याचं असं होतं–कड्याच्या वरती थोडी॰ शीच जागा होती. त्यावर अतोनात हिम जमा व्हायचे. उताराने ते हिम अतिशय हळू कड्याबाहेर सरकायचे आणि बाहेर आलेल्या भागाचे वजन जास्त झाले की तो भाग कोसळणारच. मात्र एकदा हिमाची धूळ खाली बसली की तो काळा कडा पुन्हा दिमाखात उभा राही.

वातावरणाशी दोस्ती केल्यावर एक दिवस आम्ही वरची उंची गाठण्यासाठी प्रस्थान ठेवले.

नाल्याच्या उगमाकडे चढत छोटयाशा खिंडीत येताच दृश्य पालटले. व्यासकुंडाचा विहंगम देखावा डोळ्यांसमोर पसरला. हनुमान तिब्बा पुन्हा एकदा मन प्रसन्न करीत होते. तिथून उजवीकडे दृष्टि भिरभिरत गेली ती ५३४२ मीटर (१७५२५ फूट) उंचीच्या लदाकी शिखरावर. त्याच्याच उजवीकडे बारीकसा खडकाळ त्रिकोण वर उठा॰ वला होता. शितीधार (५३०३ मीटर) शी आमची ती पहिली डोळाभेट! तिकडे पोहोचण्याचा मार्ग अनेक खाचखळगे अन् बर्फाने भरलेल्या दऱ्याचा होता.

खिंडीतून पलीकडे उतरून कडक बर्फामुळे निसरड्या बनलेल्या अनेक घळ्या ओलांडत आम्ही व्यासकुंडाकडे उतरणाऱ्या मुख्य नाल्यात आलो. तिथले बर्फाळ मैदान पार केले व चढण सुरू केली. दमछाक होऊ लागताच डॉ काळे यांनी थांबण्याचा निर्णय घेतला.

हिमालयीन मोहिमेत शरीरावर अति ईर्षेपोटी जास्त ताण देणेही हिताचे नसते. नेते चंद्रकांत बाकणकर यांना तर दुर्दैवाने आजारपणा॰ मुळे मुख्य तळावरच दिवस काढावे लागले.

पहिल्या तळाच्या जागेवर जाण्यासाठी फक्त २०० मीटर चढाई शिल्लक होती पण त्या हिमोढांच्या (शिलाखंड) डगडगत्या चढणी॰ वर पाऊल चढवणे महात्रासदायक होते दोन-अडीच तासांच्या कष्ट॰ कारक चढणीनंतर पहिल्या तळाची जागा निश्चित केली. उंची ४५७० मीटर (१५००० फूट)

गिरीश, अनिल, लाभचंद अन् दिना मुख्य तळाकडे परतू लागले तोच सोसाट्याचा वारा सुटला. लदाकी अन् शितीधार दोन्ही अदृश्य झाली. वातावरण बधिर झाले गोठविणारा गारठा घेऊन हिमवर्षाव सुरू झाला.

जेमतेम तंबू उभारून आम्ही चौघे आत घुसलो वेगवान वाऱ्याने तंबू डोलू लागला. चोहोकडून हिमाचा मारा तंबूच्या भोका-तूनही आत येत होता सर्व बाजूंनी ओल आम्हाला वेढत होती.

त्याही स्थितीत लोथराम प्रेशर कुकरमध्ये खिचडी बनवून घेऊन आला तेव्हा हायसं वाटलं पण क्षणभरच !

'चोलो ! नीचे ! मर जाएंगे ! लोथरामच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता आम्हाला काही कळेनाच नंतर लोथराम त्या वादळासारखाच भडाभडा बोलून गेला, "कई बरस पहले साब आये थे ना ! रातको साडेतीन बजे उनके प्राण चल गये ! कई दिन बाद उनके मुडदे दिखने आये-बर्फकी ढेरमेंही – मानो सोये हुएही है "

अशा शब्दांनी फुग्यातून हवा बाहेर यावी तसा इतका वेळ पकडून धरलेला आमचा धीर सुटला. पण खाली जाणेही शक्य नव्हते. बाहेर दृश्य काहीच नव्हते. निसर्गाचे ते तांडव बघतच शेवटी बसून राहिलो झोप येण्याचा प्रश्नच नव्हता

सकाळ मात्र स्वच्छ सूर्यप्रकाशातच उगवली. लदाकी अन् शिती-धार पण स्वच्छ उन्हात न्हाऊ लागली

लोथराम, उल्हास देशमुख, मनोहर मोघे, अस्मादिक आणि अशोक जाधव दोरबद्ध होऊन निघालो हिम कडक होते कॅम्पॉन्स (बुटांना जोडलेल्या खिळेपट्टया) मुळेच केवळ चढणे हलके जात होते. 'शितीधार'च्या खाली हिमभेगा (क्रिव्हास) व कठीण खडकाळ टप्पे होते मात्र आमचा मार्ग त्यांना दूर ठेवूनच जात होता. डावीकडे मोठी खडकाळ भिंत होती. दहा पावलावर आमची गति थांबत होती. चढण अधिकच तीव्र बनत चालली पायऱ्या बनविल्या असल्या तरी त्या निसूळ असल्याने पाय मधेच गुडघ्यापर्यंत आत जात दीर्घ श्वास घेण्याएवढी सपाटी पण कुठे मिळत नव्हती.

तीन तास झुंज घेत रांगमाथा (५१८० मीटर) गाठला. मोठे हिमपठार समोर पसरले होते 'लदाकी'चा खडकाळ दांड अन् त्या शिखराला जोडून पलीकडे 'मनाली' (५५८० मीटर) चा लोभस माथा हे दृश्य आमचे श्रम सार्थकी लावणारेच होते. त्यांच्या शिखर-धाराना असलेले हिमफणे (कॉर्निस) व खालच्या भेगा (क्रिव्हास) मात्र भेदी होत्या.

लदाकी-मनालीच्या बरोबर विरुद्ध अंगाला 'शितीधार' उभावले होते.

माथ्यावर रचलेली दगडांची उतरंड हाताला लागली समुद्रा-पासून ५३०३ मीटर (१७००० फूट) उंच आम्ही होतो. शिखरावरच मोठी भेग होती. त्यात न पडण्याची काळजी घेतच पलीकडे डोकावले.

खोली ! खोली ! अपार खोली ! चद्रा नदीच्या खोऱ्यात जवळजवळ दीड-दोन हजार मीटर दृष्टि खाली नेताना डोळे श्रमत होते. वाटेतल्या भेगामध्ये ती क्षणात गडप होई तर हिमकड्यावरुन घरंगळत जाई ढिबकशाच्या मनोऱ्यावर मात्र अलगद ठरत होती.

धुकट व हिमाच्या लाटांनी आम्हाला लवकरच उताराची दिशा दर्शविली. शिखर पुन्हा ढगांवर गेले मात्र कोणत्याही क्षणी आमच्या मनाची कवाडे उघडून आम्ही 'शितीधार' वर निश्चितच पोहोचू शक यात शंका नाही.

□ □

## २३. रुदुगैरा

आकाशाचा अस्सल निळा रंग न्याहाळायचा असेल, खळाळत्या पाण्याचा गभीर नाद ऐकावयाचा असेल, निस्सीम पण आनंददायी शांतता अनुभवायची असेल तर हिमालयात भ्रमण करायला हवे आणि काही क्षण स्वतःलाही पूर्णपणे विसरायचे असेल तर हिमालयातील शिखरावर चढून जावे.

अर्थातच हे सर्व गहिरे रंग स्पर्श करायला आम्ही गंगोत्रीकडे निघालो. स्थळ गंगोत्री फार सुदर्शन आहे. पुण्याहून दिल्लीमार्गे हृषिकेश, तिथून ट्रकवजा बसमधून उत्तरकाशी असा अडीच दिवसांचा कंटाळवाणा प्रवास आणि नंतर पुन्हा बुक्खीपर्यंत बस, ऋषीकुंड-गंगनानी मार्गे डबरानीपर्यंत पर्वतीय वाटचाल चांगलीच वाटा काढणारी, तर लंका गावापर्यंत घुसळून काढणारी बसची धाव. अशा दोन दिवसांचा प्रवास करूनही गंगोत्री चांगले दहा-पंधरा कि मी दूरच होते.

लंका अन् भैरवघाटी अगदी हातात हात घ्यायला उत्सुक अशा वस्त्या. पण मध्ये चांगली १५० मीटर खोल घळई. ती खाली उतरून जाडगंगा ओलांडली अन् भैरवघाटीस पुन्हा चढलो. वाटचाल सुरूच ठेवली. मणके ढिले होत होते पाय थकले होते आणि एका वळणावर सुदर्शन आणि थेलू शिखरांनी देवदारामधून माथा उचावला. 'गंगोत्री' जवळ आले होते. भागीरथी गंगेच्या तीरावरील पवित्र तीर्थक्षेत्र एवढीच गंगोत्रीची महत्ता नाही तर येणाऱ्या गिर्यारोहकांना अन् यात्रेकरूनाही एका वेळी रौद्र आणि सौम्य निसर्गाचा अनुभव देऊन आपलेसे करून घेणारे हे स्थळ आहे उंची ३१०० मीटर (१०१७० फूट)

आमची सदस्य संख्या चार भारवाहकांना धरून आठ होती. प्रकाश कार्येकर, दिलीप निंबाळकर, रवींद्र पालकर आणि अस्मादिक आम्ही सह्याद्रीत अनेक वेळा एकत्र भटकलेलो होतो स्वभाव अन् क्षमतेची जाण एकमेकांना होती एकदा रुदुगंगा खोऱ्यात शिरल्यावर

आम्हा चौघांना त्या विराट पर्वतराजीत एकमेकांशिवाय कोणीही भेट-णार नव्हते. मात्र पुण्याच्या भारत आऊटवर्ड बाऊंड पायोनियर्सचा पाठिंबा, इंडियन माऊंटेनिअरिंग फाऊंडेशनची मान्यता आणि इतर अनेकांचे साहाय्य आमच्या सदोदित पाठीशी असणार होते व डॉ. जी. आर पटवर्धन यांच्याशिवाय तर ही मोहीम अंकुरलीच नसती.

डॉ. पटवर्धन किंवा बापूकाकांची गंगोत्री ही कर्मभूमि. इथल्या प्रत्येक हिमनदीचा थडावा त्यांच्या हाडीमासी खिळलेला. यामुळे अवकाशयान जसे पृथ्वीवरील सूत्रचालनाप्रमाणे काम करते त्याप्रमाणे आमचे सूत्रचालनही जणू डॉक्टरच पुण्यातून करीत होते म्हणा ना.

"From Gangotry keep Bhagirathi on your right. After landslide and glaciated rocks, a big boulder and a cairn, follow the left hand rising track."

आमचा मार्ग असा तंतोतंत जुळत होता, पण अचानक तार तुटली. डोंगरातली वाट ही अवखळ असायचीच. त्यातून हिमालयात दरवर्षी वाटांना पुनर्जन्म घ्यावा लागतो. नकाशाचे होकायंत्र अन् आमचा वाटासंबंधीचा अनुभव यांतून आम्ही पूर्ववत् रुद्रगंगेची वाट मिळविली. पातगिनी धारेचा अखेरचा दांड चढलो, धार माथा डावी-कडे ठेवून देवदार भूर्जपत्राच्या दाट जंगलातून नागमोडी वाटचाल करीत किंचित् उघड्यावर आलो रुद्रगंगा खोऱ्याचे ते प्रथम दर्शन होते. उजवीकडे तळात रुद्रगंगेचा घनगंभीर आवाज लुप्त होत गेला होता. समोर भूर्जपत्राच्या पिवळ्या झाडोऱ्यात खोरे वर चढत गेले होते.

पुढे झाडीतून नागमोडी वाट. एका किंचित् कठीण अशा खड-काला आम्ही पार केले अन् रुद्रगंगा आमच्या पावलांना स्पर्शून गेली. हिमालयात मलिनता नाहीच सर्व कसं निख्खळ, स्वच्छ! आमचे पाय-देखील लोकरी मोजे अन् त्यावर पुन्हा चामडी मोजे यात गुरफटल्यावर मळतायत कशाला त्यामुळे पाय धुवायचा प्रश्नच नव्हता खरे म्हणजे ते शक्यच नव्हते. आता उंची वाढत चालली होती गारठाही वाढत होता.

पर्वतांच्या गराड्यातले पहिले जेवण तिथे झाले. साधी खिचडीच पण लोणच्याच्या सगतीत अन्नब्रह्म झाली. 'बल' आमचा आचारी होता. 'सोन' आणि 'धामे' त्याचे मदतनीस म्हणजे चूल पेटविणे, कांदे-बटाटे

चिरणे ही किरकोळ कामे मसाला-मिठाचे प्रमाण मात्र 'बल' च्या हाती होते आणि याचा सरदार 'हंस' ऐटीत एखादा खडक बघून त्यावर ऊन खात पडायचा

हिमालयातल्या नद्या फार जोरात वाहतात. त्या पार करणे कठीण असते ओंडक्याचा पूल ही त्यामुळे गरज असते. मेंढपाळ आणि नेहरू पर्वतारोहण संस्थेची वर्दळ इकडे असल्यामुळे इथला पूल सुस्थितीत होता. मात्र उजव्या बाजूला रुदुगंगा लगेचच खोल घळईत गडप होत होती. पुलावरून पलीकडे गेलो

रुदुगंगेच्या खऱ्या डाव्या किनाऱ्याने आता वाट हळुहळू चढू लागलो. तासभराच्या या वाटेत काही जीवघेणे क्षणही होते. जिथे छोटे ओढे येऊन डावीकडे खोल रुदुगंगेवर झेपावत होते, त्या ओढ्यांना पार करताना काळजी घेणे भाग पडत होते इथे हिमथर असता तर भबेरीच उडाली असती

खोरे उत्तर-दक्षिण आहे, त्यामुळे दुपारी दोन वाजताच सूर्य आमच्या उजवीकडच्या उत्त धारेच्या माथ्याला पोहोचला धारेची प्रचंड सावली वेगाने आमच्या दिशेला येऊ लागली वारा थंड बनला आणि आम्हीही नदीकिनारी सपाट जागा बघून तंबू उभारले उप-मुख्य तळ सिद्ध झाला. उंची ३६५७ मीटर (१२००० फूट)

आम्ही निवडलेले शिखर होते रुदुगैरा गंगोत्री समूहापैकी एक. उंची ५८१८ मीटर (१९०९० फूट) 'रुद्रगिरी'चे हे गढवाली रूप हे काही अजित शिखर नव्हते १९६५ मध्ये डॉ. पटवर्धनांच्या तुकडीने हे गाठले होते. अवघडपणाचा शिक्काही त्यावर नव्हता तरीही हिमा-लयातील शिखर हे सतत नवीनच बनत असते उंची हा मुख्य अडसर, हवामान हा दुसरा अटकाव, यामुळे आमच्या तयारीत उणेपणा खपला नसता थंडीचे कपडे, तंबू आणि बर्फकुऱ्हाडी (आईस अॅक्स) या बरोबरच दोर, कॅरॅबिनर (आकडी) पिटॉन (खिळे) आणि ८ जणांना १५ दिवस पुरेल इतका धान्यसाठा आमच्या सोबत होता

रुदुगंगेचा घनगंभीर आवाज रात्रभर साद देत होता. नदीच्या डाव्या काठावरून वाट चढत गेली होती आणि आम्ही जागीच खिळलो. डावीकडे पातंगिनीधार व उजवीकडे रुदुगैरा धार दोन्ही अजूनही

प्रकाशल्या नव्हत्या यामधूनच 'गंगोत्री–३' शिखर मात्र धर डोकावून आमचे स्वागत करीत होते नागफण्याच्या आकाराचे ते धवल शिखर उन्हात चमकत होते.

पुढे सरकलो तेव्हा 'गंगोत्री–३'ने डुबी घेतली. उजवीकडे दोन छोटे धबधबे होते कावळे काव् काव् करीत कड्यावर झेपावत त्याच्या फेसाशी खेळत होते भूर्जपत्राची झाडी पाठीमागे गेली होती. आता ऱ्होडोडेन्ड्रॉन व ज्युनियरची खुरटी झुडपेच सर्वत्र आढळत होती खोरे आता रुंदावले होते उजवीकडे रुदुगैरा धारेचे काळे कडे एका पठारात विसावले होते. पठाराचा उतार आमच्यापुढे होता नाकासमोर उतार चढलो असतो तर पठारावर पोहोचणे अवघड नव्हते पण रुदुगंगेच्या किनाऱ्यानेच आम्ही पुढे सरकलो. एका प्रचंड घसाऱ्याच्यामध्ये आल्यावर लक्षात आले की वाट चुकलो. पाठीवर खच्चून ओझे खादे चिरणारे! उभा घसाऱ्याचा उतार! पायतळीचे दगडगोटे माती खचत जाणारी ! उंचीमुळे धपापणारे ऊर ! मुख्य तळ पठारावर आम्ही उभारला खरा, पण हे सर्व जीवघेणे आठवणीत ठेवूनच.

'खरक-१' उंची ३९६२ मीटर(१३००० फूट) विस्तीर्ण पठार उतरत जाणारे. थंडी बोचू लागली. तबूतच पडावस वाटतय पण बदललेल्या दृश्याचा वेध घेण्यासाठीही मन आसुसलेले. भागीरथी म्हणजे गंगोत्रीची बाजू धुक्यात लपेटली होती समोर पातगिनी धारेत एक उंच पहारेकरी उभा आहे त्याच्या शुभ्र टोपीवरच्या सोनेरी उन्हाची रेषा हळुहळू लुब्ध होत चालली. रुदुगैरा अजूनही डोंगरा-आडच आहे. आड येत आहे ते 'खरक–३' चे पठार

'खरक–१' आणि 'खरक–२' यात एक नाला आहे. बर्फाने तो झाकलेला असता तर पार करणे अवघड झाले असते. पण बर्फ नसले तरी पाणी बर्फगार होते त्यात पाऊल न बुडावे अशी कसरत करीतच पलीकडे गेलो खरक–२ खरक–१ पेक्षा छोटे आहे खरक–२ पासून खरक–३ ला पोहोचण्यास एक तास लागला.

रुदुगैराचे पहिले दर्शन विशेष आनंददायी नव्हत खरक–३ हिर-वाळले होते. तिथून रुदुगैरापर्यंत केवळ काळपट तपकिरी रंगच पसरला होता. माथ्यावर मात्र शुभ्र हिमाने आवरण घातले होते. ४८७९

(१६००० फूट) मीटर उंचीने डोके जड झाले होते. पण नजर फेकावी तिकडे पर्वत शिखरेच दिसत होती. डावीकडून पाहात गेलो तर नीलांग, शेजारी एक मोठी खिंड अन् बर्फ प्रपात, पार्वती, टोकदार मात्री, १९६०० फूट भृगु पर्वत १ व २, मदा २१५४७ फूट, २१४२० फूट ही शिखरे दिसत होती तर पालगिनी धारेमध्ये डॉ जी आर. पटवर्धनांनी सर केलेली दोन शिखरे केदार खोऱ्यात जाण्याची खिंड, सेंटिनल आणि जोगीन २ व १. बुढाकेदार खिंड आणि गंगोत्री ३, २, १ ही शिखरे तर जणू हाकेच्या अंतरावर होती.

बरोबर आणलेले सामान मेंढपाळाच्या रचीव निवाऱ्यात ठेवून आम्ही मुख्य तळावर परतलो. वातावरण समरसतेसाठी हे आवश्यक होते. दुसऱ्या दिवशी पुन्हा वर येऊन खरक–३ वर तंबू उभारले. हा पहिला तळ पुढील वाटेची पाहणी करून तळावर परतलो तेव्हा आकाश लख्ख निळे होते. एकही ढग किंवा रेषाही त्या निळ्या रंगात मिसळली नव्हती. उन्हात पडल्या पडल्या रुदुगैरा न्याहाळणे सुखदायी होते आणि अक्षरश दुसऱ्याच क्षणाला रुदुगंगा दरी धुक्याने भरू लागली रुदुगैरावर बर्फाचा भोवरा निर्माण झाला होता धुळीतली धावटळ जशी असते तसा तो बर्फाचा उंच गरगरता स्तंभ आम्ही पाहतच राहिलो. उद्या काय होणार होते ?

चारही भारवाहकाना तळ १ वरच ठेवून आम्ही वर निघालो रुदुगैरा नाल्याच्या डाव्या किनाऱ्यावरूनच प्रथम चढून नंतर घसार पार केला नाल्याच्या उजव्या किनाऱ्यावरून आम्ही हिमोढ (मोरेन) अथवा शिलाखंड चढू लागलो ५ वाजले असावेत चढण संपून थोडीशी सपाटी लागली. हिमाचे थर काही ठिकाणी पसरले होते. आम्हास पुरेसे पाणी त्यातून सहज मिळणार होते तंबू उभारले, तळ–२ सिद्ध झाला उंची ५१८१ मीटर (१७००० फूट). रुदुगैरा समोरच दिसत होते आता जेमतेम सिंहगडाएवढेच उंच. उद्याचे यश निश्चित होते. पण अर्ध्या तासातच वातावरण बदलले. गंगोत्री समूह आणि रुदुगैरावर ढगानी आपले पाश टाकले. गार झोंबरे वारे सुटले. तंबूत घुसतोय तोवर हिमवृष्टि सुरूही झाली. स्टोव्हला तंबूत घेऊनही खिचडीचा दगड बनला होता आणि तंबूही अचानक कोसळला.

चौथाच्या आधाराने तो भुईसपाट झाला नाही एवढेच बाहेर सर्वत्र पांढरा रंग पसरला होता. अर्थात् केवळ अर्धा मग ड्रिंकिंग चॉकोलेट-वरच रात्र काढणे भाग पडले हिमवृष्टि चार तासानें बंद झाली, पण तंबूना पूर्णपणे झाकूनच. चढाई सुरू करायला आठ वाजले दृश्य एकदम बदलले होते. रुदुगैराचा उतार शुभ्र झाला होता. गंगोत्री समूहावरचे ताजे हिम चकाकत होते, पण आकाश निरभ्र निळे होते.

बर्फ आणि खडक यांच्या मिश्रणाने चढाई अवघड बनली होती. मुंगीच्या पावलानी आम्ही चढू लागलो. आज कार्यकर्ता एकदम खण-खणीत झाला होता दिलीप निंबाळकरही व्यवस्थित चढत होता मी अन् रवी जड डोक्याने सावकाश चढत होतो समोर आडव्या दिस-णाऱ्या दांडावर पोहोचेपर्यंत चार तास लागले. इथे खूण म्हणून दगडी स्तंभ होते. आता रुदुगैराच्या दिशेने उभी खडकाळ चढण होती.

पलीकडे तळात रुदुगंगा हिमनदी दिसत होती त्यावर हिमो-ढाच्या असंख्य रेषा होत्या. गंगोत्री ३, २, १ ही शिखरे त्यानंतर उभावली होती गंगोत्री—१ आणि रुदुगैरा यांना जोडणारी धार खड-काळ टोकानी करवतीसारखी दिसत होती.

उंची वाढत होती आणि छातीचे ठोके कानातून ऐकू यावे असे मोठे पडत होते आमचा वेग अधिकच मंदावत होता. रवी पालकर वाटेतच थांबला आम्ही तिघे पुढे झालो गंगोत्री १ वर आता मेघ-राजांनी झडप घातली होती. डोकेदुखी आणि छातीतले ठोके यांनी माझी गति खूपच मंदावली. प्रकाश आणि दिलीप याना मी पुढे जाण्यास खुणावले. ५७३० मीटर (१८,८०० फूट) उंची मी गाठली होती. उरलेले अवघे ४०–९० मीटरच, पण त्या दोघांचाही वेग माझ्यामुळे मंदावला असता आणि खालच्या तळावर त्या दोघांचे स्वागत करण्यासाठी मी मागे वळलो. मनाने मात्र मी रुदुगैराचीच वाटचाल करीत होतो. अगदी दिलीपच्या वर्णनासारखीच--

"आनंदा धारेवरच थांबला आहे. रवी त्या आधीच. तळ २ ही अंधुकच दिसतोय. आता आम्ही दोघेच चाललोत. या विराट हिमा-लयातील एका नगण्य शिखरांकडे. शिखर हळूहळू गंगोत्री शिखराना

पराभूत करून येणाऱ्या ढगाच्या आक्रमणाला बळी पडत आहे. अंतराचा अंदाज मात्र येत नाही, त्यामुळे त्वरा करायला पाहिजे. एक टेपाड पार झाले पुढे दुसरे टेपाड एखाद्या उद्ध्वस्त गावातल्या ढिगाऱ्यासारखे. त्यावरही चढलो आणि बापरे! गंगोत्री १ वरही भरपूर ढग गोळा झाले आहेत मस्तक भिन्न झालंय. पुढे जाणं अशक्य वाटतंय. मागे पाहिलो तो आईस ॲक्स रोवून प्रकाशने त्यावर मस्तक टेकवलंय. तरीही त्याने जिद्दीने मला नुसते पुढे व्हायला खुणावले.

अर्धवट बर्फाचे खडकाळ टप्पे अवघड जातायत. अक्षरश: मोजून पावले टाकतोय आणि गंगोत्री १ च्या बाजूने स्वच्छ सूर्यप्रकाश दिसू लागला. त्याचवेळी रुदुगैरावरील दगडी खांब उजळला.

दुपारचे ३-२०. शेवटचे ३० फूट पार झाले खांबाला मिठी मारताना खात्र विठ्ठल वाटतोय. मी स्वत:ला पुंडलिक समजतोय. हुर्रे! जिंकली! प्रकाशही पोहोचला अन् गंगोत्री १ वर सूर्याने झोत फेकला. सरकत आमच्याही वर आला. एकमेकांच्या चेहऱ्यावरील दाढीतून वाट काढलेले आनंदाचे हसू आम्ही निरखू लागलो. आजूबाजूचे भव्य दृश्य जेवढे डोळ्यात साठवता येईल तेवढे साठवीत खाली पळालो.

जोरदार वाऱ्यात खडकाळ बर्फात दाड उतरणं चांगलेच अवघड होते. तळ दिसत नव्हता, पण पावले आपोआपच तळाकडे उतरत होती."

रवी सुन्न होऊन पडलेला! तंबूची कनात दूर करून मी मिनिटा मिनिटाला बाहेर बघतोय. अंधारू लागलय रुदुगैरा आता भयाण वाटतय त्या पर्वतात दोन ठिपके दिसणे अशक्यच, पण तरीही वेडे मन सतत त्याचा डोळ्याच्या मार्गे मागोवा घेतेय.

हिमवृष्टि सुरू झालीय तंबूवरचा त्याचा आवाज ऐकून मन दचकल. डोळे मिटले गेले आणि अचानक बाहेर पावले वाजली. हिमवृष्टीतच बाहेर आलो. दिलीप-प्रकाश दोघेही पांढरी फुले अंगावर झेलत समोर उभे होते आम्ही एकदम रुदुगैराच्या दिशेने पाहिले. एक छोटासा सोनेरी कवडसा त्यावर दिसत होता. आम्ही नि:स्तब्ध उभे राहिलो. यशस्वितेच्या समाधानात आणि आनंदात पोकळ शब्दांची गरजच नव्हती.

□ □

८९ २५५९८ १४१८

REFBK-0025176